
# सॉमरसेट मॉम



# मेजवानीपूर्वी व इतर कथा

अनुवाद

वृषाली जोशी

short story by W. Somerset Maugham

# BEFORE THE PARTY

# मेजवानीपूर्वी

## व इतर कथा

मूळ इंग्लीश लेखक – सॉमरसेट मॉम

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

पत्ता - ७, अक्षय, २०, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ४११००९

दूरभाष ०२० – २४२२१०३८ ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

# मेजवानीपूर्वी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मेजवानीपूर्वी व इतर कथा

## लेखक : सॉमरसेट मॉम

अनुवादक : वृषाली जोशी

पत्ता - ७, अक्षय, २०, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ४११००९

दूरभाष ०२० – २४२२१०३८ चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १४ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# वृषाली जोशी



मी मुलांकडे अमेरिकेला गेलेली असताना छान सोयी असलेल्या वाचनालयातून चांगली इंग्रजी पुस्तके आणून वाचायचा योग आला. त्यांचे भाषांतर करण्यात वेळेचा सदुपयोग करून हे भाषांतरीत पुस्तक तयार केले आहे. ई पुस्तक बनविताना संगणकनिष्णात असलेल्या माझ्या नवऱ्याची, शरदची, मदत मिळाली. टंकलेखन मी केले तरी फाईल बनविणे व इतर बऱ्याच गोष्टी नव्याने शिकायला लागल्या.

B Sc, M A, M Ed, Ph D (Education)

सुमारे २५ अनुवादित कथा मराठी मासिकांमधून प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी शाळाकॉलेजमध्ये अध्यापन, संशोधन प्रकल्पात सहभाग , कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजविण्याचा व मराठी /इंग्रजी शब्दकोडी बनविण्याचा छंद

संपर्क

वृषाली जोशी

७, अक्षय, २०, तुळशीबागवाले कॉलनी, पुणे ४११००९

दूरभाष ०२० – २४२२१०३८

चलभाष : ९९२१७४६२४५

# अर्पणपत्रिका

प्रिय अभिजित व कनिष्क

या माझ्या मुलांना

ज्यांच्याकडील वास्तव्यात

मी या कथा वाचल्या

# समरसेट मॉम W. Somerset Maugham

इंग्लीशमधील सर्वाधिक लोकप्रिय क्लासिक लेखकांमध्ये समरसेट मॉम हे नाव घेतले जाते. त्याच्या कथांवरून अडतीस सिनेमे, शेकडो नाटके यांची निर्मिती झाली. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या यांचे काही हजार एडिशन्स आहेत. जगातील जवळपास सर्व भाषांमध्ये त्यांच्या कथांचे अनुवाद झाले आहेत.
त्यांच्या कथांवरून निर्मिती झालेल्या सिनेमांची खाली दिलेली यादी वाचली तरी त्यांच्या लोकप्रियतेची कल्पना येईल.

1. The Land of Promise (1917) directed by Joseph Kaufman and starring Thomas Meighan. Based on the 1913 play of the same name.

2. Smith (1917) directed by Maurice Elvey, based on the 1913 play of the same name.

3. The Divorcee (1919) directed by Herbert Blaché, based on the 1907 play Lady Frederick.

4. East of Suez (1925) directed by Raoul Walsh based on the novel of the same name.

5. The Circle (1925) Directed by Frank Borzage, based on the 1921 play of the same name.

6. The Canadian (1926) directed by William Beaudine. Based on the 1913 play, "The Land of Promise," this was a remake of the 1917 film of that name, with Thomas Meighan reprising his role as protagonist Frank Taylor.

7. The Magician (1926) Based on the 1908 novel of the same name.

8. Sadie Thompson (1928), a silent movie starring Gloria Swanson and Lionel Barrymore. Based on the short story "Miss Thompson", which was later retitled "Rain".

9. The Letter (1929) featuring Jeanne Eagels, O. P. Heggie, Reginald Owen and Herbert Marshall. Based on the play of the same name.

10. Rain (1932), the first sound version of the short story "Miss Thompson" (retitled as "Rain"), with Joan Crawford and Walter Huston.

11. The Narrow Corner (1933) directed by Alfred E. Green and starring Douglas Fairbanks, Jr. Based on the novel of the same name.

12. Of Human Bondage (1934) starring Leslie Howard and Bette Davis. Based on the novel of the same name.

13. The Painted Veil (1934) featuring Greta Garbo and Herbert Marshall. Based on the novel of the same name.

14. Secret Agent (1936) with John Gielgud, Peter Lorre, Madeleine Carroll, and Robert Young, directed by Alfred Hitchcock. Based on Ashenden.

15. The Vessel of Wrath (1938) starring Charles Laughton; released in the United States as The Beachcomber. Based on the novella of the same name.

16. The Letter (1940) featuring Bette Davis, Herbert Marshall, James Stephenson, Frieda Inescort and Gale Sondergaard. Based on the play of the same name.

17. Too Many Husbands (1940) featuring Jean Arthur, Fred MacMurray, and Melvyn Douglas. Based on the play "Home and Beauty".

18. The Moon and Sixpence (1942) with George Sanders. Based on the novel of the same name.

19. Christmas Holiday (1944) starring Deanna Durbin and Gene Kelly, based on the novel of the same name.

20. The Hour Before the Dawn (1944) starring Veronica Lake, based on the novel of the same name.

21. Dirty Gertie from Harlem U.S.A.(1946). Unauthorized film version of "Miss Thompson" with an all-black cast, directed by Spencer Williams.

22. The Razor's Edge (1946) featuring Tyrone Power and Gene Tierney. Based on the novel of the same name.

23. Of Human Bondage (1946) version starring Eleanor Parker.

24. Quartet (1948) Maugham appears as himself in introductions. Based on four of his short stories.

25. Trio (1950) Maugham appears as himself in introductions. Another collection based on short stories.

26. Encore (1951) Maugham appears as himself in introductions. A third collection of Maugham short stories.

27. Miss Sadie Thompson (1953), a semi-musical version in 3-D, featuring Rita Hayworth and José Ferrer.

28. The Seventh Sin (1957) with Eleanor Parker. Based on the novel The Painted Veil.

29. The Beachcomber (1958). Based on the novella The Vessel of Wrath; not to be confused with the 1938 film.

30. Julia, du bist zauberhaft (1962) starring Lilli Palmer and Charles Boyer. Based on the novel Theatre.

31. Of Human Bondage (1964) with Laurence Harvey and Kim Novak.

32. The Letter (1969) starring Eileen Atkins. Based on play of the same name. (Made for television.)

33. Theatre (1978) starring Vija Artmane. Based on the novel of the same name.

34. The Letter (1982) featuring Lee Remick, Jack Thompson and Ronald Pickup. Based on play of the same name. (Made for television.)

35. The Razor's Edge (1984) with Bill Murray. Based on the novel by the same name.

36. Up at the Villa (2000) starring Kristin Scott Thomas and Sean Penn, directed by Philip Haas. Based on the novella of the same name.

37. Being Julia (2004) featuring Annette Bening. Based on the novel Theatre.

38. The Painted Veil (2006) with Naomi Watts and Edward Norton. Based on the novel of the same name.

# मेजवानीपूर्वी (Before the Party)

---------------------------------------------------

Before the Party ही मॉम यांच्या अत्यंत गाजलेल्या कथांपैकी एक. त्यावर अनेक दिग्दर्शकांनी नाटके बसवली व तीही यशस्वीपणे आजवर चालत आहेत. केवळ अर्ध्या तासात घडणारी ही कथा मानवी जीवनातील योग्य- अयोग्य, नीती- अनीती, सोज्वळ- ढोंग या सर्व कल्पनांच्या ठिकऱ्या उडवते. वाचकाला काही काळ नक्की काय म्हणावे तेच सुचेनासे होते.

मा. वृषालीजी जोशी यांनी आपल्या समर्थ लेखणीतून त्या कथेचा तितकाच नेमका अनुवाद करून मराठी साहित्याला एक खास भेट दिली आहे.








# William Somerset Maugham
# 25.01.1874 - 16.12.1965


- Born in Paris, in a family of a lawyer, who served in a British embassy in France
- Maugham spoke only French until at the age of 11 he lost his parents and moved to England, where his relatives lived
- Before becoming a writer he studied literature, philosophy and medicine
- William worked in a hospital of Saint Thomas, placed in a poor block of London; the experience found its reflection in the 1st novel
- During World War I served as a spy and was sent to Russia








Rondo Theatre Company Presents
RONDO THEATRE
Before The P
By Rodney Ackland
7.30pm, Wed 22nd - Sat 25th March 2017
Rondo Theatre, Larkhall, Bath
333 666 3366
recompany.org


A Salisbury Playhouse Production in the Main House
BEFORE TH
PARTY
BY RODNEY ACKLAND
FROM THE SHORT STORY BY W. SOMERSET MAUGH
THURSDAY 4 - SATURDAY 27 MAY
THE CAST
SHERRY BAINES
ELEANOR BENNETT
PHILIP BRETHERTON
ROBERTA KERR
KATHERINE MANNERS
BATHSHEBA PIEPE
MATTHEW ROMAIN


BEFORE the Party
by RODNEY ACKLAND
SOMERSET MAUGHAM
4 - 27 MAY 2017
SALISBURY PLAYHOUSE


Before the Party
W. Somerset Maugham


THEATRE Written by RODNEY ACKLAND Directed by ROB CROSER
re
THE
RTY
a gleefully vicious skewering of
upper middle class manners
from the short story by
Somerset Maugham
The Goodwood Theatre - 166A Goodwood Road
Bookings www.independenttheatre.org.au or BASS 131 246
tickets from $18 - $35 generous group concessions 8299 9155
APRIL 21-29
THEATRE


At a dinner party one should
eat wisely but not too well, and
talk well but not too wisely.
W. Somerset Maugham

# कथानुक्रम

मेजवानीपूर्वी

चर्च कामगार

लॉर्ड मार्क

श्रीयुत सर्वज्ञ

अनोळखी प्रदेशात

# मेजवानीपूर्वी



मिसेस सोफियांना छान रहायला आवडायचं. त्यांनी त्यांचे वय लपविणारा काळा रेशमी ड्रेस घातला होता. त्यांच्या जावयाच्या शोकप्रदर्शनार्थ तो काळा ड्रेस होता. आणि आता त्या त्यांची छोटी टोपी घालणार होत्या. त्यांच्या जावयाने ती त्यांच्यासाठी खास बोर्निओ, मलेशियाहून आणली होती व ती

त्यांना नक्की आवडेल असा त्याचा अंदाज होता त्यावर इग्रेट पक्ष्यांची पिसे दिमाखात झळकत होती. इतकी सुंदर टोपी मेजवानीच्या वेळी घातल्याने इतरांचा जळफळाट तर होणार नाही ना अशी भीति त्यांना वाटत होती पण ती न घालणेही त्यांना कठीण वाटत होते. अशा वेळी, विशेषतः मध्यंतरी जे काही घडले त्यानंतर तर नक्कीच अशी नखरेल टोपी आपल्या आईने घालणे केयाला फारसे पटले नव्हते. शेवटी मिसेस सोफियांनी ती त्यांची सुंदर टोपी डोक्यावर चढविली. कोणी जर त्याबद्दल काही म्हणालेच तर असे सांगायचे त्यांनी ठरविले की असली टोपी विकत घेणे शक्यच नव्हते पण मागच्या वेळी जेव्हा माझा जावई इथे आला होता तेव्हा त्या बिचाऱ्याने ती मला दिली होती.

हे ऐकून लोकांना दिलासा मिळेल. लोक तसे समजूतदार असतात. मिसेस सोफियांनी खणातून रुमाल काढून त्यावर यु डी कोलन शिंपडले. त्याचा वास खूपच ताजातवाना करणारा होता. आता त्या जवळजवळ तयार झाल्याच होत्या. आरशामागील खिडकीतून त्यांनी बाहेर नजर टाकली. कॅनॉन हेवूड यांच्या बागेतील मेजवानीसाठी त्यांनी अगदी छान दिवस निवडला होता. फार थंडी नव्हती, आकाश निळसर होते. बागेतील स्वतःच्या फुलांच्या वाफ्याची खुरपणी करणाऱ्या त्यांच्या लहानग्या नातीकडे पाहिल्यावर त्या हसल्या. या मुलीला आपण इतके दिवस बोर्निओसारख्या उष्ण प्रदेशात ठेवले ही चूक झाली. ती किती अशक्त दिसते आहे असे मिसेस सोफियांना वाटले. ती छोट्या मुलीप्रमाणे इकडेतिकडे बागडत नसे. शांतपणे एकटीच खेळत राही. स्वतःच्या वाफ्याला पाणी घाले. मिसेस सोफियाने स्वतःचा ड्रेस ठाकठीक केला व मोजे घेऊन जिन्यावरून खाली आल्या.

केया खिडकीशी असलेल्या टेबलाशी बसून लेडीज गोल्फ क्लबचे सामने सुरु होणार असल्याने, त्यासंबंधी काही यादी तयार करत होती. तीदेखील मेजवानीसाठी तयार झाली होती.

“शेवटी तू तुझा हा ड्रेस घातलास तर!” मिसेस सोफिया म्हणाल्या. मेजवानीच्यावेळी केयाने हा ड्रेस घालावा की काळा शिफाँनचा ड्रेस घालावा याबद्दल त्यांनी चर्चा केली होती. तिने आता घातलेला ड्रेस काळापांढरा होता. तो केयाला चांगला वाटत होता पण तो फारसे शोकप्रदर्शन करत नव्हता. मारियाला मात्र तो ठीक वाटत होता.

“आपण जसे काही आताच दफनविधीहून आलो आहोत असे भासविण्याची काही जरुरी नाही. त्याला जाऊन आता आठ महिने झाले आहेत. ” मारिया म्हणाली.

हे बोलणे मिसेस सोफियांना फारसे रुचले नाही. बोर्निओहून आल्यापासून मारियाचे वागणे जरा विचित्रच वाटत होते.

“ प्रिय मारिया, अजून तू तुझे शोकवस्त्र (विधवेचे काळे कपडे) घालणे सोडून द्यायचे काही कारण नाही, नाही का?” मिसेस सोफिया विचारत्या झाल्या. त्यावर मारियाने लगेच उत्तर दिले नाही. थोड्या वेळाने मारिया जेव्हा म्हणाली की पूर्वीसारखे आता असे कोणीच करत नाही तेव्हा तिचा स्वर मिसेस सोफियांना अगदी वेगळाच वाटला. केयालादेखील तो तसाच वाटला कारण तिने बहिणीकडे आश्चर्याने पाहिले. “खूप काळपर्यंत मी काळे कपडे घालून शोक करावा अशी हॅरीचीदेखील इच्छा नसणार. ” असे ती पुढे म्हणाली.

तिच्या आईचे जे निरीक्षण होते त्याला उत्तर म्हणून केया बोलती झाली, “मला मारियाशी काही बोलायचे आहे म्हणून मी लवकर तयार होऊन बसले आहे.”

“हो का? ”

केयाने काही स्पष्टीकरण दिले नाही. तिने हातातील यादी बाजूला ठेवली. मिसेस सोफियांनी त्यांचे मोजे चढवायला सुरवात केली. खिडकीच्या पडद्यांमुळे खोली थंड व अंधारी वाटत होती. हॅरीने रंगविलेला लाकडी हॉर्नबिल पक्षी दिवाणखान्यात फारसा शोभून दिसत नव्हता तरीही मिसेस सोफियांनी तो ठेवला होता. टेबलावर हॅरीने दिलेल्या चांदी व ब्रासच्या शोभिवंत वस्तूही दिसत होत्या. त्यांना हॅरी आवडायचा. त्यांची बहीण, बहिणीचा मुलगा, दोन्ही मुली, जावई व नात यांचा पियानोवर असलेला फोटो त्यांना तिथे दिसेना.

“केया, हॅरीचा फोटो कुठे गेला? ” त्यांनी विचारले.

“कुणीतरी उचलला असावा.” केया म्हणाली.

नवल वाटून ती उठून पियानोजवळ गेली. कुणीतरी इथून हलवलेला दिसतो आहे असे पुटपुटतानाच मिसेस सोफिया म्हणाल्या, “मारियाला तो तिच्या झोपायच्या खोलीत हवा असेल.”

“माझ्या हे लक्षात नाही आले. पण मारियाकडे तर हॅरीचे खूपच फोटो आहेत. ते ती कपाटात ठेवते. ”

आपल्या मुलीने नुकत्याच वारलेल्या जावयाचा एकही फोटो दिसेल असा ठेऊ नये हे त्यांना जरा विचित्रच वाटले. त्याबद्दल त्या मारियाशी एकदा बोलल्यादेखील, पण मारियाने काहीच उत्तर दिले नाही. बोर्निओहून आल्यापासून मारिया विचित्र तऱ्हेने शांत होती व मिसेस सोफियाने काही सहानुभूती दाखवलेली तिला फारशी रुचत नव्हती. तिला फार दुःख झाले आहे असे देखील काही दिसत नव्हते. अर्थात प्रत्येकाची दुःख सहन करायची पद्धत वेगवेगळी असते. मिस्टर लॉकवूडने, मुलींच्या वडिलांनी, मिसेस सोफियाला, म्हणजे त्यांच्या बायकोला, असे सांगितले होते की मारियाला एकटीलाच सोड. जावयाचे विचार डोक्यातून काढून टाकून मिसेस सोफियाने मेजवानीसंबंधी विचार करायला सुरवात केली. या प्रसंगी

मिस्टर लॉकवूडने डोक्यावर हॅट घालावी की नाही, काय बरे दिसेल, असा विचार त्या करू लागल्या.

मेजवानी तर जंगी होणार होती. खूप निरनिराळे पदार्थ, पेये बाहेरून मागविली होती. काहींची घरीच तयारी सुरु होती. सगळेजण तिथे जमणार होते. कॅनॉनच्या कॉलेजच्या दिवसात हाँगकाँगला त्याच्याबरोबर रहाणारा, बिशप मित्र येणार होता. तो चीनच्या विशेष कामगिरीबद्दल बोलणार होता. मारिया आठ वर्षे बोर्निओमध्ये राहिली होती व जावई बोर्निओचा रहिवासी असल्याने त्याना या समारंभात जास्त रुची होती. परदेशी ज्यांचे कुणीच नातेवाईक कधीच नव्हते त्यांच्यापेक्षा मिसेस सोफियाच्या कुटुंबाला त्यामुळेच थोडे जास्त कुतूहल होते.

“आपल्यासारखी त्यांना इंग्लंडबद्दल फारशी माहिती नसेल.” मिस्टर लॉकवूड म्हणाले व आत आले. त्यांच्या वडीलांप्रमाणेच ते वकील होते. रोज सकाळी ते लंडनला कामासाठी जात व संध्याकाळी परत येत. कॅनॉन यांच्याकडील मेजवानी त्यांनी सूज्ञपणे शनिवारी ठेवल्यामुळे बायको मुलींबरोबर ते तिथे जाऊ शकणार होते. मिस्टर लॉकवूड यांचा सूट व्यवस्थित दिसत होता. ते कपड्यांबाबत फारसे चोखंदळ नव्हते पण नीटनेटके रहात असत. ते एक दक्ष वकील होते. त्यांच्या क्षेत्रात त्यांना मान होता. खोटेपणाबद्दल त्यांना चीड होती. ते तसे करड्या शिस्तीचे होते. एखादी त्रासदायक केस म्हणजे खरच गुन्हा केलेला पक्षकार त्यांच्याकडे केस घेऊन आला तर ते त्याला सरळ बाहेरचा रस्ता दाखवत. त्यांना टक्कल होते. त्यांनी गुळगुळीत दाढी केली होती. त्यांचे पातळसर ओठ घट्ट मिटलेले असत व निळया डोळयात थोडी लाजरी छटा दिसे. चेहरा थोडा सुरकुतलेला होता.

“अरे वा ! तुम्ही नवीन सूट घातलेला दिसतो आहे.” मिसेस सोफियांनी म्हटले.

“हा घालायला आजचा प्रसंग चांगला आहे असे मला वाटते. कोटावर फूल लावावे का? ”

“नको डॅडी. फक्त कारकून लोकच तसे करतात. ” केया म्हणाली.

मिसेस सोफियाने दुजोरा दिला.

“आपल्या सगळयांच्या वतीने दहा शिलिंग द्यावेत की एक पौड? काय बरे दिसेल? ”

“जर तुम्हाला काही द्यायचे असेल तर निदान एक पौड तरी कमीत कमी द्याच ” इति केया

“बघीन. चार लोक काय करतात ते बघून मी ठरविन. फार जास्त द्यायला नकोत व कमीही.” मिस्टर लॉकवूड उद्गारले.

केयाने तिचे कागद ड्रॉंवरमध्ये ठेवले व ती उठली. तिने मनगटावरील घड्याळाकडे पाहिले.

मिसेस सोफियाने विचारले, “मारिया तयार झाली का? ”

“अजून खूप वेळ आहे. आपल्याला चार वाजता बोलाविले आहे. आणि मला नाही वाटत की आपण साडेचारच्या फार आधी जावे. मी डेव्हीडला सव्वाचार वाजता गाडी घेऊन बोलाविले आहे.”

सहसा केयाच गाडी चालवीत असे पण अशा काही खास प्रसंगी त्यांचा डेव्हीड नावाचा माळी गणवेष घालून शोफरचे काम करत असे. जेव्हा केया छान कपडे घालून तयार होई तेव्हा तिला गाडी चालवायची नसे. आईला मोजे घालताना बघून तिला वाटले की आपणही घालावे. त्यांना वास तर येत नाही ना हे तिने पाहिले. अगदी थोडासा येत होता पण ते कुणाला कळणारही नाही असे तिला वाटले.

शेवटी दरवाजा उघडून मारिया आत आली. तिने विधवेचे कपडे परिधान केले होते. तिला अशा कपड्यात बघायची मिसेस सोफियांना सवय नव्हती. पण एक वर्षभर तिने तसाच वेष करणे योग्य ठरले असते. काही लोकांना तसे कपडेही शोभून दिसतात पण तिला तसे दिसत नव्हते. मारिया फक्त छत्तीस वर्षांची होती आणि या वयातच ती विधवा झाली हे क्लेशकारक होते.

केया पस्तीस वर्षांची होती व आता तिचे लग्न होईल असे वाटत नव्हते. मागच्या वेळी मारिया व हॅरी इथे आले तेव्हा केयाने त्यांच्याबरोबर जावे असे मिसेस सोफियाने सुचवून पाहिले. हॅरीला ते मान्य असल्याचे वाटले पण मारिया राजी नव्हती. का नव्हती कुणास ठाऊक? तिलाही थोडा बदल झाला असता. तिला घरातून बाहेर काढायला ते उद्युक्त झाले होते असे नाही पण मुलीचे लग्न खरे तर व्हायलाच हवे असे त्यांचे मत होते. त्यांना ओळखीमध्ये कुणीच योग्य मुलगा सापडला नाही. दोघींमध्ये मारिया दिसायला चांगली होती असे आता कुणीच म्हटले नसते. केयाचे वय वाढत चालले तशी ती जून दिसू लागली होती पण आता तिने केस कापले होते व गोल्फ खेळून तिचे गाल लालबुंद झाले होते. त्यामुळे मिसेस सोफियांच्या मते ती बरी दिसत होती. पण मारिया मात्र तिचा बांधा पूर्णपणे घालवून बसली होती. ती उंच कधीच नव्हती व आता जाड झाली होती. फारच फुगली होती. उष्ण कटिबंधातील उकाड्यामुळे तिचे व्यायाम करणेही बंद झाले होते. तिचे खूप छान असलेले निळे डोळे आता निस्तेज दिसत होते.

“तिची मान फारच रुतत चालली आहे. तिला काहीतरी करायलाच हवे.” मिसेस सोफिया विचार करत होत्या.

त्यांनी त्यांच्या नवऱ्याजवळ एकदोनदा हा विषय काढला होता. त्याच्या मते ती आता पूर्वीसारखी तरूण राहिली नव्हती पण तिने स्वतःला नीटनेटके ठेवायला हरकत नव्हती. तिच्याशी गंभीरपणे याबद्दल बोलावे पण वर्षभर तिला तिच्या दुःखातून आधी बाहेर पडू द्यावे, असा विचार मिसेस सोफियानी केला.

त्यामुळे त्यांना थोडे उदास वाटले. मारिया नक्कीच बदलली होती. तिच्या चेहेऱ्यावर तिच्या मनात काहीतरी धुमसत असल्यासारखे भाव दिसत होते. त्यामुळे तिच्याबरोबर नेहमीचा मोकळेपणा वाटत नव्हता. डोक्यातले सर्व विचार तिच्यासमोर भडाभडा मांडावेत असे मिसेस सोफियांना वाटत तर होते पण जणूकाही, काही ऐकलेच नाही असे भासवून नुसतेच गप्प बसून रहाण्याच्या मारियाच्या प्रतिक्रियेमुळे तसे केले जात नव्हते. कधीकधी त्यामुळे मिसेस सोफिया एवढ्या चिडत पण हॅरी वारल्याला आठच महिने होत आहेत हे आठवून त्या मारियाला टोचेल असे काही बोलणे टाळत होत्या.

मारियाच्या पडलेल्या चेहेऱ्यावर खिडकीतला उजेड आला होता. केया तिचासमोर उभी राहून तिच्याकडेच बघत होती.

“मारिया, मला तुझ्याशी काहीतरी बोलायचे आहे. मी ग्लॅडीबरोबर आज सकाळी गोल्फ खेळत होते.” केया म्हणाली. मारियाने विचारले, “तू तिला हरवलेस का? ”

ग्लॅडी ही कॅनॉनची एकुलती एक अविवाहित मुलगी होती.

“ती मला काय म्हणाली ते मला तुला सांगितलेच पाहिजे. ”

मारियाची नजर तिच्या बहिणीवरून पलीकडे फुलांच्या वाफ्याला पाणी घालत असलेल्या तिच्या मुलीकडे गेली. “ममी, तू जोनला स्वयंपाकघरात बोलावून चहा द्यायला ॲनीला सांगितलेस का? ” तिने विचारले.

“जेव्हा नोकरमंडळी घेतील तेव्हाच तीही घेईल. ” ममी बोलली.

केयाने थंडपणे तिच्या बहिणीकडे पाहिले.

“बिशपने घरी येण्यापूर्वी सिंगापूरमध्ये दोनतीन दिवस घालविले. त्याला प्रवास करायला फार आवडतो. तो बोर्निओला गेला होता व तू ज्याना ओळखतेस त्यातील बऱ्याचजणांना तो ओळखतो. ” केया म्हणाली.

मिसेस सोफिया उद्गारल्या, “प्रिय मारिया, तुला भेटावे असे त्यांना नक्की वाटत असणार. बिच्चाऱ्या हॅरीला तो ओळखत होता का? ”

“हो. तो कुआलासोलरमध्ये त्याला भेटला होता व ते त्याला चांगले आठवते आहे. त्याच्या निधनाची बातमी ऐकून त्याला धक्का बसला असे तो म्हणाला ” इति केया

मारिया खाली बसून तिचे काळे मोजे घालू लागली. हे सगळे बोलणे ती अगदी शांतपणे ऐकत होती. ते मिसेस सोफियांना जरा खटकलेच.

“अग मारिया, हॅरीचा फोटो कुठे दिसत नाही. तू तो घेतलास का? ”

“हो मी तो घेतला व ठेऊन दिला.”

“मला वाटले तो तुला सतत नजरेसमोर ठेवायला आवडेल. ”

परत एकदा मारिया काहीच बोलली नाही. ही खरच चीड आणणारी सवय होती. केया थोडी वळून बहिणीसमोर उभी ठाकली व बोलली,

“मारिया, तू आम्हाला असे का सांगितलेस की हॅरी तापात गेला म्हणून!“ त्या विधवेने चेहेरा कोराच ठेवला व केयाकडे एकटक बघताबघता क्षणार्धात तिचा चेहरा काळवंडला. ती गप्प राहिली.

मिसेस सोफिया आश्चर्याने म्हणाल्या, “काय म्हणते आहेस काय तू?“

“बिशप म्हणतो आहे की त्याने आत्महत्या केली. ”

मिसेस सोफियाच्या तोंडून अस्फुट हुंदका बाहेर पडला. त्यांच्या नवऱ्याने त्यांना सावरले.

“मारिया, हे खरे आहे का ? ”

“हो हे खरे आहे. ”

“पण तू आम्हाला सांगितले का नाहीस? ”

मारिया क्षणभर थांबली. टेबलावरील तिच्या बाजूला असलेली, हॅरीने दिलेली ब्रासची फुलदाणी हातात घेत बोलू लागली, “तुझे वडील ताप येऊन वारले असे जोनला सांगणे मला योग्य वाटले. याबाबत तिला अजून काही माहिती व्हावे असे मला वाटले नाही.”

नापसंती व्यक्त करत केया म्हणाली, “तू आमची स्थिती काहीच्याकाही विचित्र केली आहेस. ग्लॅडी हेवूडला मी खरी गोष्ट न सांगणे तिरस्करणीय वाटले. मला खरंच काही माहिती नव्हते याबद्दल तिची खात्री पटविताना माझ्या नाकी नऊ आले.” ती म्हणाली. “तिचे वडील नाराज झाले. “इतकी वर्षे आपण एकमेकांना ओळखतो, आपले संबंध चांगले आहेत तर तुम्ही मारियाच्या नवऱ्याच्या बाबतीत निदान आमच्याशी खोटे बोलायला नको होते. तुम्हाला जे घडले ते सांगायचे नव्हते तरी निदान खोटे तरी बोलायचे नाही. हे आपापसातल्या विश्वासाला तडा देण्यासारखे झाले.” असे ते म्हणाले.”

मिस्टर लॉकवूड नाराजीने म्हणाले, “मी त्यांच्याशी सहमत आहे हे त्यांना सांगितले पाहिजे. ”

केया बोलली, “अर्थात मी ग्लॅडीला सांगितले की यात आमचा काही दोष नाही. तू आम्हाला जे काही सांगितलेस तेच आम्ही त्यांना सांगितले ”

मारिया म्हणाली, “यामुळे तुझ्या गोल्फच्या खेळावर काही परिणाम झाला नसावा.” तिचे वडील उद्गारले, “बरं का मारिया, हे असले बोलून मूळ विषय तू टाळते आहेस.” असे म्हणून ते उठून खोलीत अस्वस्थपणे येरझारा घालू लागले.

मारिया तोऱ्याने म्हणाली, “हा माझा प्रश्न आहे. जर काय घडले हे मला माझ्याजवळच ठेवायचे असेल तर मी तसे करू शकते. ”

मिसेस सोफिया म्हणाल्या, “तुला आईजवळही मन मोकळे करावेसे वाटले नाही. म्हणजेच तुला माझ्याबद्दल काहीच प्रेम वाटत नाही. ”

मारियाने खांदे उडविले.

केया म्हणाली, “सत्य कधी न कधी उजेडात येणारच हे तुला माहिती हवे होते.”

“चहाटळपणे बडबड करणाऱ्या दोन व्यक्तींना मी सोडून इतर काही विषयच नसतील अशी अपेक्षा मी केली नव्हती. ”

“जेव्हा बिशप म्हणाला की तो बोर्निओमध्ये होता तेव्हा तो तुला व हॅरीला ओळखतो का असे हेवूड्नी विचारणे अगदी सहज होते. ”

“हे इकडेतिकडे घुटमळणे बास झाले. तू नक्कीच खरे काय घडले ते आम्हाला सांगायला हवे होतेस आणि मग त्यातून मार्ग कसा काढायचा ते आम्ही ठरविले असते. मी एक वकील आहे आणि मी तुला नक्की सांगू शकतो की तुम्ही काही लपवायला गेलात तर पुढच्या दृष्टीने त्याचा आपल्यालाच त्रास होते.” मिस्टर लॉकवूड म्हणाले.

मिसेस सोफिया सुस्कारत म्हणाल्या, “बिचारा हॅरी! ” त्यांच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. “हे भयंकर आहे. तो माझ्यासाठी नेहमी एक चांगला जावई होता. अशी काय गोष्ट घडली ज्याने तो मरणाकडे ओढला गेला ? ”

“वातावरण! ”

“मारिया, जसे घडले तसे तू आम्हाला सांगावेस ते बरे.” तिचे वडील म्हणाले.

“केया तुम्हाला सांगेल.”

केया कांकू करू लागली. तिला खरे काय ते सांगायचे होते. ते महाभयंकर होते. त्यांच्यासारख्या एखाद्या कुटुंबात असे घडावे हे खरच भयंकर होते. शेवटी ती कसेबसे बोलली,“ बिशप म्हणाला, त्याने स्वतःचा गळा चिरून घेतला.”

मिसेस सोफिया तोंड उघडे टाकून बघत राहील्या. त्या त्यांच्या भान हरविलेल्या मुलीकडे खेचल्या गेल्या. त्यांना तिला मिठीत घ्यायचे होते.

“बिचारं माझं कोकरू! ” त्या हुंदके देत म्हणाल्या.

पण मारियाने स्वतःला सोडवून घेतले व पुटपुटली, “उगीच जास्त प्रदर्शन करू नकोस. मला इतकी जवळीक खरच सहन होत नाही.”

कपाळाला आठ्या घालत वडील उद्गारले, “खरच का मारिया?” तिचे वागणे बरोबर आहे असे त्याना वाटेना.

मिसेस सोफियांनी रुमालाने काळजीपूर्वक त्यांचे डोळे पुसले आणि डोके हलवत परत खुर्चीवर येऊन बसल्या.

गळयातील लांब माळेशी अस्वस्थपणे चाळा करत केया हताशपणे म्हणाली, “माझ्या बहिणीच्या नवऱ्याच्या मृत्यूची हकीगत मला मैत्रिणीकडून सांगितली जावी ही फार विचित्र गोष्ट होती. त्यामुळे आम्ही सगळेच मूर्ख ठरलो. मारिया, बिशपना तुला भेटायचे आहे व तुझ्याबद्दल कणव व्यक्त करायची आहे.” ती थांबली. मरिया काहीच बोलली नाही. “तो म्हणाला की मारिया छोट्या जोनबरोबर बाहेर होती परत आली तेव्हा बिचाऱ्या हॅरीला पलंगावर मरून पडलेले पाहिले.”

मिस्टर लॉकवूड म्हणाले, “हा जबरदस्त धक्का असणार.”

मिसेस सोफिया परत रडायला लागल्या पण केयाने हळूवारपणे त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. ती म्हणाली, “ममी, रडू नकोस. त्याने तुझे डोळे लाल होतील व लोक तुला हसतील.”

ते सर्वजण शांत होते. मिसेस सोफियाने डोळे पुसून स्वतःला आवरण्याचा प्रयत्न केला. हॅरीने दिलेली सुंदर टोपी यावेळी आपल्या डोक्यावर असावी हे त्यांना नकोसे वाटत होते.

केयाने पुढे चालू ठेवले, “अजून काहीतरी आहे, जे मला तुम्हाला सांगितलेच पाहिजे.”

मारिया परत सावकाशीने बहिणीकडे पाहू लागली. तिची नजर स्थिर होती. ती लक्षपूर्वक बघत होती. एखाद्या माणसाने काही ऐकायचे राहू नये म्हणून जसे जीवाचे कान करून ऐकावे तसे ती ऐकत होती.

केया पुढे म्हणाली, “प्रिय मारिया, तुला दुखवायच्या उद्देशाने नव्हे पण तुला हे माहिती हवेच म्हणून मी सांगत आहे. बिशप म्हणत होता हॅरी पित असे. ”

मिसेस सोफिया किंचाळल्या, “माझ्या प्रिय मुली मारिया, हे फारच भयानक आहे. फारच धक्कादायक!”

“काय ग केया, ग्लॅडी हेवूडने हे तुला सांगितले का? तू त्यावर काय म्हणालीस? ”

मी म्हटले, “हे धादांत खोटे आहे. ”

मिस्टर लॉकवूड चिडून म्हणाले, “काही लपवून ठेवले की नेहमीच असे होते. तुम्ही जेव्हा एखादी गोष्ट लपविता तेव्हा खऱ्या सत्यापासून दहापट वाईट असलेल्या अनेक अफवा उठतात.”

“त्यांनी बिशप सिंगापूरला असताना त्याला असे सांगितले की हॅरीला तापामध्ये वात झाला होता व बुद्धिभ्रम होऊन त्याने स्वतःला ठार केले. मला वाटतं मारिया, आमच्या सर्वांसाठी तू हे नाकारले पाहिजेस.” इति केया.

मिसेस सोफिया म्हणाल्या, “मृत व्यक्तीबद्दल असे बोलणे बरोबर नाही आणि जोन मोठी झाल्यावर तिच्यासाठी हे फारच वाईट आहे. ”

तिच्या वडिलांनी विचारले, “पण या सर्व गोष्टींमागे पार्श्वभूमि काय होती, मारिया? ”

मिसेस सोफिया उद्गारल्या, “हॅरी तर नेहमी संयमशील होता. ”

“हे बघा! ” ती विधवा म्हणाली.

“तो प्यायचा का? ” केया विचारती झाली.

“वाट्टेल तसा! ”

तिचे उत्तर इतके अनपेक्षित होते व स्वर इतका उपरोधिक होता की ते तिघेजण अवाक झाले.

“मारिया, तू असे कसे काय बोलू शकतेस? मला तुझे काही कळतच नाही तू इथे आल्यापासून तुझ्या मेलेल्या नवऱ्याबद्दल फार विचित्रपणे वागते आहेस. माझी मुलगी तिचा नवऱ्याचे मरण अशा रीतीने घेईल यावर माझा विश्वासच बसत नाही. ” त्यांचे मोजे घातलेले हात एकमेकावर दाबत मिसेस सोफिया ओरडल्या.

मिस्टर लॉकवूड म्हणाले, “ हे बघ, इतकं मनावर घेऊ नकोस. आपण ते सर्व नंतर बघू.” ते चालत खिडकीपाशी जाऊन बाहेरील उन्हाकडे पाहू लागले व परत खोलीत चालत आले. डोळयांवर चढवायच्या उद्देशाने नव्हे पण त्यांनी खिशातून त्यांचा चष्मा काढला व तो हातरुमालाने पुसला. मारिया त्यांच्याकडे अगदी सरळसरळ उपरोधिक नजरेने बघत होती. मिस्टर लॉंकवूड चिडले होते. त्यांचे आठवड्याभराचे काम करून झाले होते. आता सोमवार सकाळपर्यंत ते रिकामे होते. जरी ही बागेतील मेजवानी म्हणजे त्यांच्या दृष्टीने एक प्रकारचा त्रासच होता व ते बायकोला म्हणालेही होते की स्वतःच्या बागेत निवांतपणे चहा पीत बसणे खरे पहाता त्यांना आवडेल, तरीही ते हेवूडकडील मेजवानीला जाण्याची वाट बघत होते. चीनच्या विशेष कामगिरीबद्दल ऐकण्यात त्यांना फारशी रुची नव्हती पण बिशपला भेटायला त्यांना आवडले असते. आणि आता मध्येच हे काय ? मध्येच उपटलेली ही गोष्ट त्यांना चमत्कारीकच वाटत होती. स्वतःच्या जावयाच्या दारूबाजपणाबद्दल व आत्महत्येबद्दल सांगितले जावे हे फारच दुःखद होते. मारिया मोठ्या गंभीरपणे तिच्या ड्रेसच्या हातावर हात फिरवीत होती. तिच्या थंडपणाची त्यांना चीड आली पण तिच्याशी बोलण्याऐवजी ते त्यंच्या धाकट्या मुलीला उद्देशून म्हणाले, “केया, तू खाली का बसत नाहीस? खोलीत नक्कीच खूप खुर्च्या आहेत. ”

केयाने एक खुर्ची ओढून घेतली व काही न बोलता त्यावर बसली.मिस्टर लॉंकवूड मारियाच्या पुढ्यात जाऊन उभे राहिले.

“अर्थात तू आम्हाला हॅरी ताप येऊन वारला असे का सांगितलेस ते कळले. मला वाटते ती चूक होती. सत्य आज ना उद्या उजेडात येणार होतेच. बिशपने हेवूडना सांगितलेले कितपत सत्य आहे मला माहिती नाही पण प्रसंगवशात, तुला जसजसे सांगणे शक्य होईल, तसतसे तू प्रत्यक्ष काय घडले ते आम्हाला सांगावेस असा सल्ला मी तुला देईन. कॅनॉन हेवूड व ग्लॅडी यांच्याकडून ते इतरत्र पसरणार नाही याची खात्री आपण देऊ शकत नाही. या अशा ठिकाणी लोकांमध्ये चर्चा सुरु होणारच. आम्हाला पूर्ण सत्य माहिती असेल तर ते आमच्यासाठी सर्वथा चांगले ठरेल. ”

मिसेस सोफिया व केया याना वाटले की ते अगदी बरोबर बोलत आहेत. ते मारियाच्या उत्तराची वाट बघत थांबले.तिने सर्व निमूटपणे ऐकून घेतले. क्षणभर तिचा चेहरा भावनामय झाला व परत नेहमीप्रमाणे निस्तेज व रापलेला दिसू लागला.

“मी तुम्हाला सत्य सांगितले तर ते तुम्हाला आवडेल असे मला वाटत नाही.” ती म्हणाली.

केया थंडपणे म्हणाली, “आमच्याकडून तुला नेहमीच सहानुभूती मिळेल व समजूतदारपणा दिसेल याची खात्री बाळग. ”

मारियाने तिच्याकडे एक कटाक्ष टाकला आणि तिचा घट्ट मिटलेल्या ओठांवर हास्य तरळले.

तिने सावकाशीने तिघांकडे पाहिले. एखाद्या कपड्यांच्या दुकानातील पुतळे ते आहेत असेच तिला वाटते आहे की काय असा अस्वस्थ भाव मिसेस सोफियांच्या चेहेऱ्यावर उमटला. त्यांच्यापेक्षा वेगळयाच जगात ती पोचली आहे व त्या तिघांशी तिचे काहीच लागेबांधे नाहीत अशी ती दिसत होती.

“तुम्हाला माहिती आहे का की हॅरीबरोबर माझे लग्न झाले तेव्हा मी काही त्याच्या प्रेमात नव्हते. ” ती उत्तरादाखल म्हणाली.

मिसेस सोफिया काहीतरी उद्गार काढणार होत्या पण इतक्या वर्षांच्या लग्नानंतरच्या विशिष्ट सहवासाने, त्यांच्या नवऱ्याच्या नुसत्या कटाक्षाने, त्यांना गप्प बसविले. मारियाने पुढे चालू ठेवले. तिच्या बोलण्यात अजिबात चढउतार नव्हते. सावकाशीने व संथपणे एकसुरी आवाजात ती बोलत होती.

“मी सत्तावीस वर्षाची होते व माझ्याशी लग्न करायला कोणीच तयार नव्हते. तो चव्वेचाळीस वर्षांचा म्हणजे जरा वयस्कच होता पण एकदम चांगल्या हुद्द्यावर होता, नाही का? याहून चांगले स्थळ मला मिळायची आशा नव्हती. ”

मिसेस सोफिया परत रडायच्या बेतात आल्या पण मेजवानीला जायचे त्यांच्या लक्षात होते. त्या विषण्णपणे म्हणाल्या, “आता माझ्या लक्षात आले त्याचा फोटो तू का उचलून ठेवलास. ”

“ममी, मध्ये बोलू नको. ” केया म्हणाली.

मारियाबरोबर त्याचा साखरपुडा झाला तेव्हा काढलेला तो फोटो होता व तो खूप छांन फोटो होता. मिसेस सोफियांच्या मते तो नेहमीच एक उमदा मनुष्य होता. तो चांगला मजबूत बांध्याचा, उंच, कदाचित थोडा जाड होता पण तो स्वतःला व्यवस्थित ठेवे. त्याच्या सहवासात प्रसन्न वाटे. त्यावेळी त्याला थोडे टक्कल पडायला सुरवात झाली होती पण अलीकडे पुरुषांना लवकर टक्कल पडत असे. सूर्याचे उष्ण कटिबंधातील तळपते ऊन व त्यामुळे डोक्यावर चढविलेले शिरस्त्राण हे अनिवार्य होते. ते केसांसाठी वाईट होते. त्याच्या छोट्या काळया मिशा होत्या आणि चेहरा रापलेला होता. अर्थात त्याचे जोनसारखे असलेले तपकिरी, मोठे डोळे खूपच छान होते. त्याचे बोलणे वैविध्यपूर्ण होते. केयाच्या मते तो सर्व पोकळ डामडौल होता. पण मिसेस सोफियांना तसे वाटत नव्हते. एखाद्या माणसाने थोडी शिस्त

मोडली तरी विशेष काही बिघडत नाही असे त्यांचे मत होते. थोड्याच दिवसात त्यांच्या लक्षात आले की त्याला मारिया आवडते आहे. मग त्यांना तो अधिकच पसंत पडला. तो मिसेस सोफियाकडे नेहमी लक्ष देत असे व त्या देखील तो सांगत असलेले सर्व लक्षपूर्वक ऐकत असत. केयाच्या मते त्याला स्वतःबद्दल जास्तच अभिमान होता पण मिसेस सोफियाच्या पिढीतील लोकांना ते काही गैर वाटत नसे. वारा कुठल्या दिशेने वाहतो आहे हे थोड्याच दिवसात मारियाला कळले. मारिया तिचा आईला काही बोलली नाही तरी आईला हे कळले की हॅरी म्हणेल त्याला मारिया नक्की मान्यता देणार.

बोर्निओमध्ये गेली तीस वर्षे रहाणाऱ्या लोकांबरोबर हॅरी रहात होता आणि ते त्या देशाबद्दल चांगले बोलत. तिथे स्त्रीने आरामात रहावे असाच तो देश होता. अर्थात तिथे शिक्षणाची चांगली सोय नसल्याने मुले सात वर्षांची झाली की त्यांना घरी परतावे लागे. पण त्याबद्दल आताच काही बोलणे मिसेस सोफियांना गरजेचे वाटले नाही. त्यांनी हॅरीला एकदा घरी जेवायला बोलाविले आणि चहाला तो त्यांच्याकडे कधीही येऊ शकतो असे देखील सांगितले. जेव्हा त्याच्या जुन्या मित्रांच्या भेटीगाठी संपल्या तेव्हा त्याने पंधरा दिवस इथे येऊन राहिलेले त्यांना आवडेल असे त्यांनी सांगितले. याचा शेवट हॅरी व मारियाचा साखरपुडा होण्यात झाला. त्यांचे लग्न खूप छान तऱ्हेने झाले. मधुचंद्रासाठी ते व्हेनिसला गेले. मग ते पूर्वेकडे जायला निघाले. जहाज ज्या बंदरावर थांबे तिथून मारिया पत्र पाठवी. ती सुखी वाटत होती.

“कुआलासोलरचे लोक माझ्याबरोबर खूप चांगले वागत होते. सेम्बुलूमधील ते मुख्य शहर होते.” ती म्हणाली. “आम्ही तेथील रहिवाशांबरोबर राहिलो. प्रत्येकाने आम्हाला जेवायला बोलाविले. एकदोनदा लोकांनी हॅरीला दारू घेण्याचा आग्रह केला पण त्याने नकार दिला. आता तो विवाहित मनुष्य आहे, आता सर्व बदलले आहे असे तो म्हणाला. ते का हसले ते मला कळले नाही. तिथे रहाणाऱ्या एकाची बायको, मिसेस ग्रे मला म्हणाली की हॅरीने लग्न केल्याचे ऐकून

त्या सगळयाना खूप आनंद झाला. परदेशी बोटीवर एकट्याने रहायचे हे फारच भयंकर रीत्या एकटे वाटायला लावणारे असते. जेव्हा आम्ही कुआलासोलर सोडले तेव्हा मिसेस ग्रेने इतक्या आनंदाने माझा निरोप घेतला की मला आश्चर्यच वाटले. जणू ती हॅरीला पूर्णपणे माझ्या हवाली करत होती. ”

ते सर्वजण तिचे शांतपणे ऐकून घेत होते. केयाने तिची नजर बहिणीच्या बोलणाऱ्या चेहेऱ्यावरून जराही हटविली नाही पण मिसेस सोफिया बसलेल्या सोफ्याच्या वर टांगलेल्या पँरँग(तलवार) वगैरे शस्त्रास्त्रांकडे बघत मिस्टर लाँकवूड तिथे चालत जाऊन उभे राहीले.

“मी कुआलासोलरला परतल्यापासून जवळजवळ दीड वर्षाने माझ्या लक्षात आले की तेव्हा ते असे विचित्र का वागले.” तुच्छतेने हसल्यासारखा आवाज काढत मारियाने पुढे चालू ठेवले. “मला माहिती नसलेले खूपसे मला त्यानंतर समजले. हॅरी तेव्हा इंग्लंडला लग्न करण्यासाठी आला होता. कोण मुलगी आहे त्याच्याशी त्याला विशेष देणेघेणे नव्हते. ममी, त्याला जाळयात पकडण्यासाठी आपण कसे प्रयत्न करत होतो तुला आठवते आहे का? आपण इतका त्रास घ्यायला नको होता. ”

“मारिया, तू काय म्हणते आहेस मला कळत नाही. तो तुझ्याकडे आकृष्ट झाल्याचे मला दिसत होते.” अप्रत्यक्षपणे धोरणपूर्वक आखलेल्या बेतांना नावे ठेवलेले ऐकून मिसेस सोफिया खवचटपणे म्हणाल्या.

मारियाने खांदे उडविले.

“तो पक्का दारुडा होता. प्रत्येक रात्री तो व्हिस्कीची बाटली घेऊन झोपायचा व सकाळी उठण्यापूर्वी ती रिकामी करायचा. जर त्याने पिणे थांबविले नाही, तर त्याला नोकरी सोडावी लागेल असे त्याच्या वरिष्ठ ऑफिसरने सांगितले होते. अजून एकच संधी हॅरीला तो देणार होता. तो रजा घेऊन इंग्लंडला जाऊ

शकत होता. त्या ऑफिसरने त्याला असा सल्ला दिला की येताना लग्न करून बायकोला बरोबर घेऊन ये म्हणजे ती तुझी काळजी घेईल. हॅरीने माझ्याशी लग्न केले कारण त्याला सांभाळणारी एक बाई हवी होती. मी किती काळ त्याला चांगले वागायला प्रवृत्त करू शकते याबद्दल त्यांनी एकमेकांशी पैजा लावल्या होत्या. ”

मिसेस सोफियाने तिचे वाक्य तोडत म्हटले, “पण तो तुझ्या प्रेमात होता. तुझ्याबद्दल तो माझ्याशी कसे बोलायचा तुला महिती नाही आणि जोनला जन्म देण्यासाठी तू कुआलासोलरला गेलीस तेव्हा त्याने मला तुझी खूप स्तुती करणारे पत्र लिहिले होते.”

मारियाने आईकडे पाहिले व कपाळावरील आठ्या परत काळवंडल्या. मांडीवर ठेवलेले तिचे हात थोडे थरथरू लागले. तिच्या वैवाहिक आयुष्यातील पहिले काहीं महिने तिला आठवले. सरकारी बोटीने ते नदीच्या मुखाकडे गेले होते. हॅरी विनोदाने म्हणाला होता की हा आपला समुद्राकाठचा बंगला आहे. त्यात ते रात्री राहिले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ते बोटीने प्रवाहाच्या वरच्या बाजूला गेले. कादंबऱ्यांमध्ये वाचल्याप्रमाणे बोर्निओची नदी गडद काळी व अशुभ असेल अशी तिची कल्पना होती पण आकाश निळसर असून छोट्या पांढऱ्या ढगांनी भरलेले होते. पाण्याच्या कडेची खारफुटीची झाडे हिरवीगार होती. त्यांच्या मुळांची माती पाण्याच्या माऱ्याने धुऊन निघाली होती व ती झाडे उन्हात चमकत होती. दोन्ही बाजूला दाट जंगल होते. थोड्या अंतरावर डोंगरांच्या सावल्या पडल्या होत्या. पहाटेची हवा ताजी तरतरीत होती. एका सुपीक छानशा जमिनीवर शिरत असल्याचे मुक्त स्वातंत्र्य ती अनुभवीत होती. झाडांच्या वेड्यावाकड्या फांद्यांवर माकडे बसलेली त्यांनी पाहीली आणि अचानक हॅरीने ओंडक्यासारखे काहीतरी दाखवून ती मगर असल्याचे सांगितले. तिथे रहाणारा, रेनकोट व टोपी घातलेला, हॅरीचा मदतनीस व ओळीत उभे असलेले डझनभर छोटे सैनिक त्यांच्या स्वागतासाठी उभे होते. सिम्पसन नाव असलेल्या त्या मदतनिसाची मारियाबरोबर ओळख करून दिली गेली.

“ सर, तुम्ही परत आलात म्हणून मला आनंद झाला आहे. तुमच्याशिवाय इथे सुनेसुने वाटत होते.” तो हॅरीला म्हणाला.

त्या बंगल्याभोवतीच्या बागेत रानटी फुले उमलली होती. बंगला एका टेकाडावर होता व तसा गचाळच होता. थोडे फर्निचर होते पण खोल्या खूप मोठ्या व गार होत्या.

तिला करण्यासारखे फार काही नसले तरी दिवस सहजपणे जात असे. सकाळच्या ताज्या हवेचा आस्वाद घेत ते व्हरांड्यात बसत व एक मुलगा त्याना चहा आणून देई. हॅरी त्याच्या बनियनमध्ये असे व ती गाऊनमध्ये. न्याहारी होईपर्यंत ते तिथे बसत. मग हॅरी ऑफीसला जाई व ती एखाददोन तास स्थानिक भाषा, मले शिके. जेवल्यावर तो परत ऑफीसला जाई व ती झोपे. संध्याकाळी चहा घेतल्यावर ते फिरायला जात किंवा साफ केलेल्या जंगलाच्या भागात हॅरीने नऊ खड्डे पाडले होती तिथे गोल्फ खेळत. सहा वाजताच अंधार होई व मिस्टर सिम्पसन गप्पा मारण्यासाठी येत. उशिरा जेवायची वेळ होईपर्यंत ते कधीकधी दारू घेत किंवा बुद्धिबळ खेळत. तेथील संध्याकाळ जादुई असे. व्हरांड्याच्या खालील झुडुपांवर काजवे उडत. त्यामुळे ती झुडुपे मागेपुढे हलून प्रकाशित दिसत. फुलांनी भरलेल्या झाडांमुळे हवेत मंद सुगंध दरवळत राही. जेवणानंतर ते सहा आठवड्यांपूर्वीचा लंडनचा पेपर वाचत व मग झोपायला जात. मारिया तिचे स्वतःचे घर व लग्नानंतरचे आयुष्य छान उपभोगत होती. त्यांच्या आनंदी व साध्यासुध्या नोकरांवर ती खूष होती. ते घरभर अनवाणी पायांनी शांतपणे फिरत व तिच्याशी मिळूनमिसळून वागत असत. हॅरीची पत्नी असल्याने ते तिला महत्व देत. त्यामुळे तिच्या मनात आनंदी भाव उमलत. भाषेवरील प्रभुत्वामुळे, सालसपणामुळे व लोकांवर हुकुमत चालविण्याच्या दराऱ्यामुळे तिच्यावर हॅरीचा प्रभाव पडे. तो चालवत असलेल्या केसेस ऐकण्यासाठी ती वारंवार कोर्टात जाई. त्याची विविध प्रकारची कामे व ती करण्याचे त्याचे कौशल्य बघून तिला त्याच्याबद्दल आदर वाटे. मिस्टर सिम्पसन तिला सांगत की हॅरीला स्थानिक

लोकांची व बोर्निओमधील कुठल्याही माणसाची भाषा समजे. तेथील स्थानिक लोक भित्रे, संशयी व बदला घेण्यास तत्पर असे लोक होते. त्यांच्याबरोबर काम करण्यासाठी लागणाऱ्या गुणांचा मिलाफ हॅरीमध्ये होता. तो कामाला चोख, चतुर व विनोदी स्वभावाचा होता. तिच्या नवऱ्याबद्दल मारियाचे मत चांगले होऊ लागले होते.

जेव्हा त्यांच्या लग्नाला साधारणपणे एक वर्ष झाले तेव्हा काही दिवसांकरता दोन इंग्लिश निसर्गअभ्यासक रहायला आले. नंतर ते जंगलाच्या आतील भागात जाणार होते. त्यांनी सरकारचे शिफारसपत्र आणले होते. हॅरी त्यांचा मनापासून पाहुणचार करत होता. ते आल्यामुळे छान बदल झाला होता. मारियाने मिस्टर सिम्पसनना जेवणासाठी बोलाविले. (ते किल्ल्यात रहात व फक्त रविवारी रात्री त्यांच्याबरोबर जेवत). जेवणानंतर ते चौघेजण ब्रिज खेळायला बसले व मारिया झोपायला गेली. त्यांच्या आरड्याओरड्यामुळे काही वेळ तिला झोप लागेना. नंतर हॅरी खोलीत आल्यामुळे तिला अर्धवट जाग आली पण किती वाजले ते कळले नाही. ती शांत राहिली. त्याने अंथरुणात शिरण्यापूर्वी स्नान करायचे ठरविले. बाथरूम त्यांच्या झोपायच्या खोलीच्या बरोबर खाली होती. तो जिना उतरून तिथे गेला. अचानक तो घसरला. मोठा आवाज आला व तो स्वतःशीच बडबडू लागला. मग तो खूप आक्रमक झाला असावा. खूप बादल्या डोक्यावर ओतल्याचा आवाज मारियाला आला. मग तो काळजीपूर्वक जिना चढून अंथरुणात शिरला. मारियाने झोपेचे ढोंग केले. हॅरी प्यायलेला होता. तिला शिसारी आली. त्या निसर्गअभ्यासकांना त्याच्याबद्दल काय वाटले असेल असा विचार मारियाने केला.

सकाळी आठ वाजता ती व हॅरी त्यांच्या दोन पाहुण्यांबरोबर न्याहारी घेण्यास बसले तेव्हा हॅरीने टेबलाभोवती बघितले व म्हणाला, “मारिया, पाहुण्यांना कदाचित सॉस हवे असेल. अजून कसली ते मागणी करतील असे मला वाटत नाही. मला मात्र व्हिस्की व सोडा घ्यायला आवडेल.”

निसर्गअभ्यासक लज्जित होऊन हसले. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, “तुझा नवरा भयानक आहे.”

त्याच्या सडेतोड पद्धतीने हॅरी म्हणाला, “तुमच्या येथील भेटीच्या पहिल्याच रात्री मी तुम्हाला नुसतेच झोपायला पाठविले असते तर तुमच्या आदरातिथ्यात उणीव राहिली असे मला वाटले असते.”

दुष्टपणे हसत मारियाला बरे वाटले की पाहुणेही हॅरीइतकीच दारू प्यायले होते. दुसऱ्या दिवशी रात्री ती न झोपता त्यांच्याबरोबर बसून राहिली त्यामुळे बऱ्यापैकी वेळेवर पिणे संपले. पाहुणे त्यांच्या प्रवासासाठी निघून गेले तेव्हा तिला आनंद झाला. नंतर त्यांचे आयुष्य पूर्वीसारखे सुरळीत झाले. काही दिवसांनी जिल्ह्याच्या तपासणीसाठी हॅरी गावाला गेला व मलेरियाचा जोरदार ताप घेऊनच परतला. मलेरियाबद्दल तिने पूर्वी बरेच ऐकले होते.पण आता तिने तो रोग प्रथमच पाहिला. जेव्हा हॅरी त्यातून बरा झाला तेव्हा तो फार हादरलेला बघून तिला फारसे आश्चर्य वाटले नाही. पण तिला त्याचे वागणे जरा वेगळेच वाटले. तो ऑफीसमधून घरी येई व मलूल डोळयांनी तिला न्याहाळत राही. व्हरांड्यात थोडा झुलत उभा राही व इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीवर भाषणबाजी करत राही. त्याचा नेहमीचा रुबाबदारपणा सोडून तो थकल्यासारखा दिसे व म्हणे, “ या भिकारड्या मलेरियाने माझी पार वाट लावली आहे. अग माझ्या राणी, साम्राज्य उभे करण्यासाठी एका माणसावर किती ताण पडतो याची तुला काहीच कल्पना नाही. ”

मारियाने मिस्टर सिम्पसनना काळजीत पडलेले पाहीले. एकदोनदा ते दोघेच असताना, ते तिला काहीतरी सांगायला बघत आहेत, पण वरमून शेवटच्या क्षणी माघार घेत आहेत असे तिला जाणवले. हे असे जाणवणे वाढत चालल्याने ती उदास झाली. एकदा का कुणास ठाऊक पण हॅरीला ऑफीसमधून यायला खूप उशीर झाला तेव्हा तिने त्यांना छेडले. “मिस्टर सिम्पसन, तुम्हाला मला काय सांगायचे आहे? ” अचानक तिने विचारले.

ते काही सांगायला कांकू करू लागले. “काही नाही मला तुम्हाला विशेष काही सांगायचे आहे असे तुम्हाला का वाटले?” मिस्टर सिम्पसन बेचाळीस वर्षांचे, बारीक दात व केसांच्या लाटा असणारे गृहस्थ होते. त्यांची मनगटे सुजलेली होती व त्यावर डास चावल्याचा खुणा होत्या. मारियाने स्थिर नजरेने त्यांच्याकडे पाहिले.

“जर ते काही हॅरीबद्दल असेल तर तुम्ही मला मोकळेपणे सांगितलेत तर बरे होईल, नाही का? ”

ते गोरेमोरे झाले. त्यांच्या वेताच्या खुर्चीत चुळबुळ करू लागले. तिने आग्रह धरला. शेवटी ते बोलते झाले,

“तुम्हाला हा कदाचित उद्धटपणा वाटेल की काय अशी मला भीती वाटते. माझ्या वरिष्ठांबद्दल त्यांच्या पाठीवर असे बोलणे मला शोभत नाही. मलेरिया ही फार भयानक गोष्ट आहे आणि एखाद्याला तो झाल्यावर तो माणूस खालावून अगदी खलासच होतो.” परत तो गप्प झाला. रडायच्या बेतात आल्यासारखे त्याचे तोंड वाकडे झाले.

मारियाला तो एखाद्या लहान मुलासारखा वाटला. तिची भीती लपवायचा प्रयत्न करत, ती हसून म्हणाली, “मला सांगाच. मी अगदी गप्प बसेन.”

तो बोलला, “ मला वाटते की ही अगदी दयनीय गोष्ट आहे की तुमचा नवरा ऑफीसमध्ये जवळ दारूची बाटली ठेवतो. एकसारखे तिचे घुटके घेण्याकडे त्याचा कल वाढला आहे. ”

मिस्टर सिम्पसनचा आवाज व्याकुळतेने घोगरा झाला. मारियाच्या सर्वांगातून एक शिरशिरी उठली. तिने स्वतःला सावरले. त्याला जे काही सांगायचे आहे ते सांगण्यास तो कचरता कामा नये याची तिला जाणीव होती. तो बोलायला

नाराज होता. त्याच्या कर्तव्यबुद्धीला तिने आवाहन केले, थोडे दटावले, थोडे चुचकारले आणि शेवटी तिला रडू कोसळले. मग तो बोलला की गेले जवळजवळ पंधरा दिवस हॅरी दारू प्यायलेल्या अवस्थेत असतो. स्थानिक लोकदेखील त्याच्याबद्दल कुजबुजू लागले आहेत. लग्नापूर्वी तो जसा सतत प्यायचा तसे परत सुरु झाले आहे असे ते म्हणू लागले आहेत. पूर्वी तो खूपच प्यायचा, पण त्यावेळेची सर्व हकीगत सांगायला, मारियाची अवस्था पाहून, मिस्टर सिम्पसन धजावत नव्हते.

“आताही तो तशीच पितो आहे का? ” तिने विचारले.

“ मला माहिती नाही. ”

लज्जा आणि रागाने मारिया कावरीबावरी झाली. बंदुका व दारुगोळा तिथे ठेवत असत म्हणून त्याला किल्ला म्हणत पण ते हॅरीचे ऑफीसही होते. ते बंगल्यासमोरच असून त्याच्याही कडेला बाग होती. सूर्यास्त व्हायला आला होता त्यामुळे तिला टोपीची गरज नव्हती. ती उठून चालू लागली. न्यायकक्षाच्या मोठ्या हॉलमागे असलेल्या ऑफीसमध्ये हॅरी बसलेला होता. त्याच्यासमोर व्हिस्कीची बाटली होती व चार स्थानिक लोक उभे होते. सिगरेटी ओढताओढता तो त्यांचाशी बोलत होता. ते तत्परतेने त्याचे बोलणे ऐकत होते व त्याच वेळी तिरस्काराने हसतही होते. हॅरीचा चेहरा लाल झाला होता. ते लोक गेले.

“तू काय करतो आहेस बघायला मी आले.” ती म्हणाली. तो उठून उभा राहिला. तो नेहमी तिच्याशी सभ्यपणे व नम्रपणे वागे. पण आज तो चांगलाच अडचणीत सापडला. आपण थोडे लटपटत आहोत असे वाटल्याने त्याने अदबशीर वाटायचा प्रयत्न केला.

“बस ना, बस. कामाच्या ताणामुळे मी अजून इथेच आहे. ”

तिने चिडक्या नजरेने त्याच्याकडे पाहिले व म्हणाली, “तू तर पिऊन तर्र झाला आहेस ”.

त्याच्या बटबटीत डोळयांनी त्याने तिच्याकडे पाहिले. त्याच्या मोठ्या मांसल चेहऱ्यावर हळूहळू तुच्छतादर्शक भाव उमटले. तो म्हणाला, “तुला काय म्हणायचे आहे कुणास ठाऊक? ”

शिव्यांची लाखोली वहावी असे तिला वाटले पण अचानक तिला हुंदकाच फुटला. ती मटकन खुर्चीत बसली व चेहरा लपविला. हॅरीने क्षणभर तिच्याकडे पाहिले व मग त्याच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. तो हात पसरून तिच्याकडे आला व दणकन गुडघे टेकून बसला. हुंदके देत त्याने तिला आलिंगन दिले व पुटपुटला, “मला क्षमा कर. पुन्हा असे होणार नाही असे मी तुला वचन देतो. हे त्या भिकारड्या मलेरियामुळे होते आहे. ”

ती शोक प्रगट करत म्हणाली, “हे इतके लाजिरवाणे आहे. ”

तो एखाद्या मुलाप्रमाणे रडू लागला. त्या मोठ्या उच्चपदस्थ माणसाची स्व-मानहानी फार मनाला लागणारी होती. मारियाने वर पाहिले. क्षमायाचना करणारे त्याचे पश्चात्तापदग्ध असे डोळे तिचाकडे बघत होते.

“परत कधीही दारूला स्पर्श करणार नाही असे वचन मला देशील का? ”

“हो मला दारूचा तिटकारा वाटतो.”

नंतर तिने स्वतःला दिवस गेल्याचे सांगितले. तो खूपच खूष झाला.

“हेच मला हवे होते. यामुळे मी आता नक्की सरळ वागेन.”

ते बंगल्यावर परतले. हॅरीने अंघोळ करून डुलकी काढली. जेवणानंतर ते बराच वेळ शांतपणे बोलत बसले. लग्नापूर्वी काही प्रसंगी तो इतकी जास्त दारू प्यायचा हे त्याने कबूल केले. दौऱ्यावर असताना वाईट सवयी लागणे सोपे होते. मारियाने विचारलेली प्रत्येक गोष्ट त्याने कबूल केली. मारिया कुआलासोलरला बाळंतपणाला जाण्याच्या आधीचे काही महीने हॅरी एकदम चांगला नवरा बनला. विचारी, हळुवार व प्रेमळ!

अगदी निर्दोष! एक बोट तिला न्यायला आली. आता सहा आठवडे तिला त्याला सोडून रहावे लागणार होते.

ती नसताना तो अजिबात मद्यपान करणार नाही असे अगदी विश्वासाने त्याने तिला सांगितले. तसे वचनच दिले. तिच्या खांद्यांवर हात ठेवत तो म्हणाला, "मी दिलेले वचन कधीच मोडत नाही. तू इतका त्रास घेत असताना तुला अजून तसदी मी कशी काय देईन ? तू अशी कल्पना तरी करू शकतेस का?"

जोनचा जन्म झाला. तेथील रहिवाशांबरोबर मारिया राहिली. मध्यमवयीन, दयाळू मिसेस ग्रेने तिची खूप काळजी घेतली. त्या काळात दोघींनी एकमेकींशी खूप गप्पा मारल्या. दुसरे काही करण्यासारखे नव्हतेच. तिच्या दारूबाज नवऱ्याचा भूतकाळ मारियाला तेव्हा समजला. हॅरीला असे सांगण्यात आले होते की त्याला त्याचा हुद्दा टिकवायचा असेल तर त्याने परत येताना लग्न करून बायकोला बरोबर आणले पाहिजे.

हे समजून घेणे तिला फार जड गेले. त्यामुळे भयंकर चिडून ती उदास झाली. जेव्हा तो सतत पिणारा पक्का दारुडा असल्याचे समजले तेव्हा ती अस्वस्थ झाली. पण त्याचा काय उपयोग होता? तिच्या गैरहजेरीत दारू पिण्याच्या तीव्र लालसेपासून तो स्वतःला रोखू शकणार नाही अशी भीती तिला वाटू लागली. एका दाईला व छोट्या बाळाला घेऊन ती घरी निघाली. नदीच्या मुखाशी तिने एक रात्र काढली आणि तिने ती परत आल्याचा निरोप पाठविला. तिला नेण्यासाठी बोट

येईपर्यंतचा मधला काळ खूप काळजी वाटून व अधीरतेने तिने काढला. हॅरी व मिस्टर सिम्पसन उभे असलेले तिला दिसले.

एखाद्या हेंदकाळणाऱ्या जहाजावर तोल सावरायचा प्रयत्न करावा तसा हॅरी झुलत होता. तो प्यायलेला आहे हे बघून तिचे अवसानच गळाले. ही घरपरतीची घटना काही सुखकारक नव्हती. तिचे आईवडील, बहीण हे तिच्या खुशालीची वाट बघत असतील हे सर्व ती विसरलीच होती. पण भावना उचंबळून येऊन तिला एकदम त्यांची आठवण आली आणि नंतर ती जे काही बोलली ते बोलताना ती जणू या जगातील नव्हतीच. ती म्हणाली, “नंतर मी त्याचा द्वेष करू लागले. त्याला ठार करावे असे मला वाटू लागले”.

“अग मारिया, असं काय म्हणतेस ? आता तो बिचारा मृत व्यक्ती आहे हे विसरू नकोस. ” तिची आई किंचाळली.

क्षणभर मारियाने तिच्या आईकडे पाहिले. तिचा भावनाशून्य चेहरा काळवंडला.

मिस्टर लॉकवूडनी अस्वस्थ हालचाल केली.

केया म्हणाली, “पुढे सांग. ”

जेव्हा त्याला कळले की त्याच्या दारूच्या व्यसनाचा सर्व भूतकाळ मला ठाऊक झाला आहे तेव्हाही त्याने त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. तीन महिन्यात त्याला दारू सोडल्यामुळे शारीरिक / मानसिक त्रास परत होऊ लागला. केया म्हणाली, “तू त्याला सोडून का दिले नाहीस? ”

“त्यातून काय साध्य झाले असते? दोन आठवड्यात त्याला नोकरीवरून काढून टाकले असते. मग माझे व जोनचे काय झाले असते? मला रहावेच लागले. आणि जेव्हा तो ठीक असे तेव्हा माझी काहीच तक्रार नसे. तो माझ्या जराही प्रेमात

नव्हता. पण त्याला माझा लळा लागला होता. मला लग्न करायचे होते म्हणून मी लग्न केले. त्याच्यावर प्रेम जडले म्हणून नव्हे. त्याचे व्यसन सुटावे म्हणून मी हरप्रकारे प्रयत्न केले. कुआलासोलरपासून व्हिस्की पाठवायला मी बंदी केली. पण त्याने ती चीनहून मिळविली. मांजर उंदरावर पाळत ठेवते तशी मी त्याच्यावर ठेवली. तो मला फसवे. थोडेच दिवसात मला अजून एक धक्का बसला. आता तो त्याचे कामही नीट करेनासा झाला. आता तक्रारी येऊ लागतील अशी भीती मला वाटू लागली. कुआलासोलरपासून आम्ही दोन दिवसाच्या अंतरावर होतो ते बरे होते पण काहीतरी कुरबुरी सुरु झाल्या व मिस्टर ग्रेने मला एक तंबी देणारे खासगी पत्र लिहिले. मी ते हॅरीला दाखविले. त्याने खवळून आकांडतांडव केले पण तो घाबरला होता. दोनतीन महिने अगदी ठीक गेले आणि मग पुन्हा पहिले पाढे पंचावन्न! आणि मग आमची रजा मंजूर होईपर्यंत ते चालूच राहिले.

आम्ही इथे रहायला येण्यापूर्वी मी त्याला काळजी घेण्याची विनंती केली. मी कुठल्या प्रकारच्या माणसाशी लग्न केले हे तुम्हाला कुणालाच कळायला नको असे मला वाटत होते. आम्ही निघण्यापूर्वी तो इंग्लंडला होता व तेव्हाही मी त्याला तंबी दिली होती. त्याला जोनचा फार लळा लागला होता. तिच्याबद्दल त्याला फार अभिमान वाटे व तीही त्याला खूप मानत असे. तिला माझ्यापेक्षाही तोच जास्त आवडे. आपला बाप दारुडा आहे हे कळणे तिच्या वाढीच्या वयासाठी योग्य आहे का असा त्याला निरुत्तर करणारा प्रश्न विचारून मी त्याचावर वचक ठेऊ शकले. तो विचारसुद्धा त्याच्यासाठी असह्य होता. असे मी होऊ देणार नाही आणि जर तो जोनच्या देखत पिऊ लागला तर मी जोनला घेऊन लगेच निघून जाईन असे त्याला सांगितले होते. तुम्हाला माहिती आहे का? मी हे सांगितल्यावर तो पांढराफटक पडला होता. मी त्या दिवशी गुडघ्यावर बसून देवाला दुवा दिला कारण माझ्या नवऱ्याला वाचवायचा एक उपाय मला सापडला होता.

तो म्हणाला की मी त्याच्यामागे खंबीरपणे उभी राहिले तर तो परत व्यसनमुक्तीचा प्रयोग करेल. आम्ही एकत्र त्याविरुद्ध सामना करायचे ठरविले. त्याने

खरच कसून प्रयत्न केला. जेव्हा त्याला पिण्याची तीव्र इच्छा होई, तेव्हा तो माझ्याकडे येई. माझ्याशी तो प्रामाणिक होता. एखाद्या मुलासारखा तो माझ्यावर अवलंबून होता. खरे तर त्याचा कल जास्त डामडौल दाखविण्याकडे होता. कदाचित आमचे लग्न झाले तेव्हा तो माझ्यावर प्रेम करत नव्हता. पण नंतर तो मी व जोन दोघींवरही प्रेम करू लागला. लाजिरवाणे वाटण्यासारखा तो वागे त्यामुळे मी त्याचा द्वेष करत असे. प्याल्यावरही तो रुबाब दाखवून छाप पाडण्याचा प्रयत्न करे तेव्हा तो कंटाळवाणा वाटे. पण आता माझ्यात एक वेगळीच भावना उमलू लागली. ते प्रेम नव्हते. पण ती मृदू हळुवार कोवळीक होती. तो नवऱ्यापेक्षा काहीतरी जास्त होता. खूप काळ तो मला एखाद्या मुलासारखाच वाटे. त्याला माझा इतका अभिमान होता आणि मलाही त्याच्याबद्दल अभिमान वाटे. त्याच्या भाषणबाजीने मी चिडेनाशी झाले आणि त्याचा रुबाब मला गोड व हसविणारा वाटू लागला. शेवटी आम्ही जिंकलो होतो. दोन वर्षे त्याने दारुच्या थेंबालाही स्पर्श केला नाही. त्याची त्याबद्दलची तीव्र ओढ गेली. तो त्याबद्दल विनोदही करू लागला होता.

मिस्टर सिम्पसन जाऊन त्याच्या जागी आता फ्रान्सिस नावाचा तरुण मनुष्य आला होता. एकदा त्याला हॅरी म्हणाला, “मी सुधारलेला दारुडा आहे, बरं का फ्रान्सिस! जर माझी बायको नसती तर माझी केव्हाच गच्छन्ति झाली असती. मला जगातील सर्वात चांगली बायको मिळाली आहे. ”

“त्याला असे बोलताना ऐकून मला काय वाटे ते मला सांगता येणार नाही. मला वाटे की मी पूर्वी जे भोगले ते सर्व आता भरून पावले. मी खूप आनंदी होते. ”

ती गप्प झाली. ती इतका दीर्घ काळ ज्या भव्य, पिवळसर, गढूळ नदीच्या किनाऱ्यावर राहिली, तिची आठवण तिला आली. शुभ्र इग्रेट पक्षी थरथरणाऱ्या सूर्यास्ताच्या वेळी चमकत असत व थव्याने खालच्या दिशेने ह्ळुवारपणे नाहीसे होत असत. बर्फाळलेल्या सुरांच्या हिंदोळयासारखे ते भासत. खूप गोड व सच्चे! एखाद्या अनामिक हातासारखे ते पुढे आणले जात, स्वर्गीय सुरावटीसारखे! अदृष्य

वाद्यावरील सुरावटीसारखे ते रेंगाळत रहात. संध्याकाळच्या सावल्यांमध्ये हरवत. जणू आनंदी मनातले समाधानी विचार!

“नंतर जोन आजारी पडली. तीन आठवडे आम्ही काळजीत होतो. कुआलासोलर सोडून जवळ कुणीही डॉक्टर नव्हता. आम्हाला तेथील स्थानिक दवाखान्यातील उपचारांवरच अवलंबून रहावे लागले. जेव्हा तिची तब्येत सुधारली, तेव्हा तिला समुद्रावरची हवा मिळावी म्हणून आम्ही नदीच्या मुखाशी तिला घेऊन गेलो. तिथे आम्ही आठवडाभर राहिलो. जोनच्या वेळी बाळंतपणाला गेल्यापासून प्रथमच मी हॅरीपासून लांब राहिले. मासेमारीचे एक गाव आमच्यापासून फार लांब नव्हते पण खरे तर आम्ही एकाकीच होतो. मी हॅरीसंबंधी हळूवारपणे एकसारखा विचार करत होते आणि अचानक मी त्याच्यावर प्रेम करत असल्याचे मला जाणवले. जेव्हा आम्हाला परत न्यायला बोट आली तेव्हा मी इतकी आनंदी झाले कारण मला माझा नवीन शोध त्याला सांगायचा होता. त्यालां त्याचे खूप अप्रूप वाटेल असे मला वाटले. मी कधी नव्हे इतकी खूष होते. जसे आम्ही वरच्या प्रवाहाला लागलो तसे मला बोटीवरील मुख्य माणसाने सांगितले की एका नवऱ्याचा खून केलेल्या बाईला अटक करण्यासाठी मिस्टर फ्रान्सिस बरेच दिवस बाहेर गेलेले आहेत.

धक्क्यावर हॅरी न आलेला पाहून मला नवल वाटले. अशा वेळी तो नेहमीच हजर असे. जसे आपण ओळखीच्या लोकांशी वागतो तसेच नवराबायकोने एकमेकांशी वागायला हवे असे तो म्हणत असे आणि कुठल्या कारणाने तो आला नसेल याची मला कल्पना करवेना. मी आमच्या बंगल्याच्या टेकाडावर आले. माझ्या मागे आया जोनला घेऊन आली. बंगल्यात नीरव शांतता होती. नोकरचाकरही दिसत नव्हते. मला कळेना की मी इतक्या लवकर परतेन अशी अपेक्षा नसल्याने हॅरी बाहेर गेला की काय? मी पायऱ्या चढून वर गेले. जोनला तहान लागली होती. तिला काहीतरी प्यायला देण्यासाठी आया नोकरांच्या खोलीत गेली. हॉलमध्ये हॅरी नव्हता. मी त्याला हाका मारल्या पण काही उत्तर आले नाही.

त्याला तिथे न बघून मी नाराज झाले. मी आमच्या झोपायच्या खोलीत गेले. तो बाहेर गेलेला नव्हता तर! तो पलंगावर गाढ झोपला होता. तो तर दुपारी कधीच झोपत नसल्याचे नेहमी सांगे त्यामुळे त्याला झोपलेला बघून मला हसूच आले. आपल्या लोकांची ही अनावश्यक सवय आहे असे त्याचे मत होते. मला वाटले त्याची फिरकी घ्यावी. मी मच्छरदाणी उघडली. तो पाठीवर झोपला होता व शेजारी रिकामी व्हिस्कीची बाटली पडली होती तो प्यायलेला होता.

ते परत सुरु झाले. एवढे वर्षांची माझी मेहनत वाया गेली. माझे स्वप्न भंगले. सर्व आशा संपल्या. मी चवताळून उठले. "

मारियाचा चेहरा परत लालभडक झाला. ती बसलेल्या खुर्चीचे हात तिने जोराने दाबले.

"मी त्याच्या खांद्याला धरून गदागदा हलविले व ओरडले, 'अरे राक्षसा, अरे नादान माणसा' मी इतकी चिडले होते. मी काय बोलले व काय केले कुणास ठाऊक! मी त्याला हलवत राहिले. तो जाडा, अंगावर धड कपडे नसलेला मनुष्य, इतका किळसवाणा दिसत होता. त्याने अनेक दिवसात दाढी केलेली नव्हती.त्याचा चेहरा काळानिळा पडला होता. तो धापा टाकत होता. मी त्याच्या अंगावर ओरडत होते पण त्याची काहीच प्रतिक्रिया नव्हती. मी त्याला अंथरुणातून बाहेर खेचायचा प्रयत्न केला पण तो फारच जड होता. एखाद्या ओंडक्यासारखा तो तिथे पडला होता. 'डोळे उघड' मी जोरात किंचाळले. परत त्याला हलविले. मला त्याची घृणा आली. आठवड्यापूर्वीच मला त्याच्यावरील माझ्या प्रेमाचा साक्षात्कार झाला होता. त्यामुळे मला त्याची जास्तच चीड आली. त्याने मला मान खाली घालायला लावली. माझा अपमान केला. तो एक पशू होता, नराधम होता, हे मला त्याला सांगायचे होते. पण काहीच करता येईना. 'तुला डोळे उघडावेच लागतील.' मी ओरडले. त्यांनी माझ्याकडे पाहिलेच पाहिजे असे मी ठामपणे ठरविले. "

त्या विधवेने ओठांवरून जीभ फिरविली. तिचा श्वास जोरात चालू झाला. ती शांत होती.

केया म्हणाली, “तो अशा अवस्थेत असता तर त्याला झोपू देणेच उत्तम असा विचार मी केला असता. ”

“पलंगाच्या बाजूच्या भिंतीवर परँग लावलेली होती. तुम्हाला माहिती आहे का की त्याबद्दल त्याला खूपच प्रेम होते.”

मिसेस सोफियांनी विचारले, “परँग म्हणजे काय ? ”

त्यांच्या नवऱ्याने चिडून म्हटले, “मूर्खासारखे विचारू नकोस. तुझ्यामागील भिंतीवरसुद्धा एक आहे.” त्यांनी हॅरीने मालेहून आणलेल्या तलवारीकडे निर्देश केला आणि कुठल्या कारणाने कुणास ठाऊक पण नकळत त्यांची नजर त्या तलवारीवर स्थिरावली. मिसेस सोफिया घाबऱ्याघुबऱ्या होऊन झटकन सोफ्याच्या कोपऱ्यात गेल्या जसे काही त्यांच्या शेजारी वेटोळे घातलेला सापच होता.

“अचानक हॅरीच्या घशातून रक्त येऊ लागले. खूपच लालभडक रक्त वाहू लागले.”

केया उडी मारून जवळजवळ मारियाच्या अंगावर ओणवत म्हणाली, “मारिया, काय म्हणते आहेस तरी काय?”

डोळे विस्फारलेले व तोंड उघडे, अशा मिसेस सोफिया मारियाला निरखीत राहिल्या.

“तलवार भिंतीवर नव्हती. ती पलंगावर होती. मग हॅरीने डोळे उघडले. ते अगदी जोनसारखे होते. ”

मिसेस सोफिया म्हणाल्या, “मला समजत नाही. तू म्हणालीस त्या अवस्थेत तो असेल तर तो आत्महत्त्या कशी करेल? ”

केयाने तिचा बहिणीचा दंडाला धरून रागाने हलविले व म्हटले, “मारिया, कृपा करून खुलासा कर.”

मारियाने सुस्कारा टाकला. “मी तुम्हाला सांगितले की तलवार भिंतीवर होती. मला माहिती नाही काय झाले. सगळीकडे रक्तच रक्त होते व मग हॅरीने डोळे उघडले. तो लगेचच मरण पावला. तो बोलला नाहीच पण धाप लागल्यासारखा काहीतरी आवाज आला.”

शेवटी मिस्टर वूडवर्डना कंठ फुटला, “अग कैदाशिणी, अधम स्त्रिये, तो खून होता.”

लाल झालेल्या चेहऱ्याने मारियाने कपाळाला आठ्या घालत, अशा खुनशी नजरेने त्यांच्याकडे पाहीले की ते दचकलेच. मिसेस सोफिया किंचाळल्या, “मारिया, तू ते केले नाहीस ना, की केलेस?”

नंतर मारियाने असे काही केले की सर्वांच्या रक्तवाहिन्यांमधील रक्त थिजले आहे अशी जाणीव त्यांना झाली.

ती हसली व म्हणाली, “दुसऱ्या कोणी केले मला माहित नाही.”

मिस्टर वूडवर्ड पुटपुटले, “अरे देवा!”

केया तिचे हात छातीवर ठेऊन ताठ उभी होती, जसे काही हृदयाची धडधड तिला सहन होत नव्हती.

“आणि मग काय झाले?” ती म्हणाली.

“मी किंचाळले. मी खिडकीशी गेले व ती सताड उघडली. मी आयाला हाक मारली. ती कुंपणावरून जोनला घेऊन आली.

“जोनला नको.” मी ओरडले. “तिला येऊ देऊ नको.”

तिने स्वयंपाक्याला हाक मारुन जोनला घ्यायला सांगितले. मी तिला घाई कर असे ओरडले आणि ती आल्यावर मी तिला हॅरीकडे बघायला सांगितले. ‘याने तर स्वतःला मारून घेतले आहे.’ ती ओरडली. मी किंचाळले. ती जोराने ओरडत घराबाहेर गेली”.

कोणीच जवळ येईना. ते कमालीचे घाबरले होते. मी मिस्टर फ्रान्सिसना एक पत्र लिहून त्यात काय घडले ते लिहिले व त्याना ताबडतोब इथे यायला सांगितले.”

“काय घडले ते तू त्यांना लिहिलेस, याचा अर्थ काय ? ”

“मी असे लिहिले की मी नदीच्या मुखाकडून परत आल्यावर मी त्याला त्याचा गळा चिरलेल्या अवस्थेत पाहीले. उष्ण प्रदेशामध्ये व्यक्तीला लगेच पुरावे लागते. एक चिनी कफन मला मिळाले व सैनिकांनी किल्ल्यामागील स्मशानात खड्डा खणला. जेव्हा मिस्टर फ्रान्सिस आले तव्हा हॅरीला पुरून दोन दिवस झाले होते. फ्रान्सिस काय मुलगाच होता. त्याला मी मला पाहिजे तसे सांगू शकत होते. मी त्याला सांगितले की मला हॅरीच्या हातात तलवार दिसली आणि तापामुळे झालेल्या बुद्धिभ्रमाच्या उन्मादात त्याने स्वतःला मारून घेतले, याबद्दल काहीच संशय नाही. मी त्यांना दारूची रिकामी बाटलीही दाखविली. मी गेल्यापासून तो खूपच पीत असल्याचे नोकरांनी सांगितले. कुआलासोलरला मी हीच गोष्ट सांगितली. सगळयांना माझ्याबद्दल खूप कणव वाटली आणि सरकारने मला पेन्शन चालू केले.”

जरा वेळ कोणीच काही बोलले नाही. शेवटी मिस्टर लॉंकवूडनी अवसान गोळा केले. ते बोलले, “मी कायद्याच्या व्यवसायात आहे. मी वकील आहे. माझी काही कर्तव्ये आहेत. आम्ही नेहमी आमच्याबद्दल खूप आदर वाटेल अशी कामे करतो. तू मला धर्मसंकटात घातले आहेस.” स्वतःच्या न चालणाऱ्या बुध्दीशी लपंडाव करणारे वाक्प्रचार शोधण्यासाठी ते चाचपडत राहीले. मारिया त्यांच्याकडे

कपाळावर आठ्या घालून बघत राहिली व बोलली, “तुम्ही आता काय करणार आहात?”

“तो खून होता. खूनच होता. तुला असं वाटतं का मी कदाचित त्याकडे डोळेझाक करीन?”

केया तीक्ष्णपणे म्हणाली, “डॅडी काहीतरीच बोलू नका. तुम्ही तुमच्या मुलीवर पाणी सोडू शकत नाही.”

“तू मला धर्मसंकटात घातले आहेस.” ते परत म्हणाले.

मारियाने तिचे खांदे उडविले व म्हणाली, “तुम्हीच मला हे सांगायला भाग पाडलेत. मी खूप काळ हे स्वतःजवळच ठेवले होते. आता त्याचा भार तुम्ही सर्वजणदेखील सहन करा.”

त्यावेळी नोकराणीने दरवाजा उघडला व म्हणाली, “सर, डेव्हीड गाडी घेऊन आलेला आहे.”

केयाने प्रसंगावधान राखून तिला काहीतरी सांगितले व ती गेली.

“आपण निघावे ते बरे.” मारिया म्हणाली.

मिसेस सोफिया ओरडल्या, “मी आता मेजवानीसाठी जाऊ शकत नाही. मी फारच नाराज झाले आहे. आपण हेवूडना कसे तोंड देणार आहोत? आणि बिशपला तुझी ओळख करून घ्यायची असेल.”

मारियाने बेपर्वाईचे भाव दाखविले. तिच्या डोळ्यात ठामपणा दिसत होता.

केया म्हणाली, “ममी, आपल्याला गेलेच पाहीजे. आपण गेलो नाही तर ते विचित्र दिसेल.” ती चिडून मारियाकडे वळून बोलली, “अरेरे, मला वाटते या सगळ्याला एक भीतीदायक वलय आहे.”

मिसेस सोफियाने असहाय्यपणे नवऱ्याकडे पाहिले. ते त्यांच्याकडे चालत आले व त्यांना सोफ्यावरून उठायला स्वतःचा हात दिला. ते म्हणाले, “आपल्याला जायलाच हवे.”

त्या शोक करत म्हणाल्या, “हॅरीने स्वतःच्या हाताने दिलेली सुंदर टोपी घालून मला यायला हवे.” ते त्यांना घेऊन खोलीबाहेर गेले. केया त्याच्या मागून संथपणे निघाली व एकदोन पाऊले मागे मारिया आली.

“तुम्हाला त्याची सवय होईल. काय समजलात?” ती शांतपणे म्हणाली. “पहिल्यांदा मीदेखील सतत असा विचार करायची. आता गेले दोनतीन दिवस मी ते सर्व विसरले होते. त्यात आता काहीच धोका उरलेला नाही.”

त्यांनी काही उत्तर दिले नाही. ते हॉलमधून पुढील दाराकडे गेले. तीन स्त्रिया मोटारीत मागे बसल्या. मिस्टर लॉकवूड ड्रायव्हरच्या शेजारी बसले. ती जुनी गाडी असल्यामुळे सुरु होत नसे. डेव्हीडने ती सुरु होण्यासाठी बॉनेट उघडले. मिस्टर लॉकवूडनी मागे वळून, चिडून, मारियाकडे पाहीले. ते म्हणाले, “मला ही हकीगत कधीच कळायला नको होती. मला वाटतं तुझा हा टोकाचा स्वार्थीपणा होता.”

डेव्हीड त्याच्या जागेवर बसला व बागेतील मेजवानीला जाण्यासाठी गाडी चालवू लागला.

# चर्च कामगार



सेंट पीटर येथील नेव्हील चौकातील चर्चमध्ये त्या दिवशी बाप्तिस्मा विधी होता व अल्बर्ट एडवर्ड फोरमनने अजून त्याचा गाऊन अंगावर घातलेला होता. तो घालून त्याला समाधान लाभे, कारण तो त्याच्या ऑफिसचे मानाचे चिन्ह होता. घरी जाताना तो जेव्हा गाऊन काढून ठेवे तेव्हा त्याला चुकल्यासारखे व अपुरे कपडे घातल्यासारखे वाटे. गेली सोळा वर्षे तो इथे चर्च कामगार म्हणून काम करत होता पण जीर्ण झालेले गाऊन देखील त्याने कधी टाकून दिले नाहीत. वापरातील गाऊनची तो अत्यंत काळजी घेई. त्याला स्वतः इस्त्री करे. त्याच्या झोपायच्या खोलीतील कपाटातील सर्वात खालच्या कप्प्यात ब्राऊन पेपरमध्ये बांधलेल्या जुन्या गाऊनची चळत ठेवलेली असे.

चर्चच्या कपडे बदलायच्या खोलीत धर्मगुरूंचे सर्व काम होईपर्यंत अल्बर्ट थांबला होता. ती खोली आवरून मग तो घरी जाणार होता. धर्मगुरूंना त्याने त्या खोलीवरून जाताना पाहीले. ते येशूसमोर नतमस्तक होऊन चर्चच्या बाकांच्या रांगांमधून बाहेर पडले पण अजून त्यांनी त्यांचा पायघोळ झगा घातलेला होता.

अल्बर्ट स्वतःशीच बोलला, “आता ते का थांबले आहेत? त्यांना माझी चहा प्यायची वेळ झालेली माहित नाही का?”

या धर्मगुरूची नुकतीच नेमणूक झालेली होती. तो साधारण पस्तिशीचा, लाल चेहऱ्याचा, उत्साही मनुष्य होता. अल्बर्टला अजून त्याच्या आधीचा धर्मगुरू गेल्याची खंत वाटत होती. तो जुन्या विचारांचा धर्मगुरू होता. तो त्याच्या मुलायम आवाजात सावकाशीने, प्रवचन देई व चर्चमध्ये नेहमी येणाऱ्या उमरावांबरोबर बऱ्याचदा जेवण घेई. चर्चमध्ये गोष्टी आपापल्या पद्धतीने चालू असत. त्याची तो फारशी दखल घेत नसे. पण हा नवीन आलेला धर्मगुरू ज्या त्या गोष्टीत आपले नाक खुपसत असे. पण अल्बर्ट सहनशील होता.

तो म्हणे "याची केवढी घाई! पण त्याला वेळ द्यायला हवा. तो शिकेल."

धर्मगुरू बाकांच्या रांगांतून चालत येऊन अल्बर्टला उद्देशून म्हणाले, "अरे, तू एक मिनिट खोलीत येशील का? मला तुला काही सांगायचे आहे." अल्बर्ट त्याच्या मागोमाग गेला. तिथे बसलेले चर्चचे दोन व्यवस्थापक बघून अल्बर्ट अचंबित झाला. जवळजवळ जेवढी वर्षे अल्बर्ट चर्च कामगार होता, तेवढीच वर्षे ते तेथील व्यवस्थापक होते. मला कशासाठी बोलावले असेल अशा विचाराने अल्बर्ट थोड्या साशंकतेने त्याना सामोरा गेला. पण तसे काही त्याने वरवर दिसू दिले नाही. स्वाभिमान बाळगून पण नम्रपणे त्यांच्यासमोर तो उभा राहीला. या जागेवर काम करण्यापूर्वीदेखील तो चर्चशी संबंधित पण वेगळया कामात होता. त्याची वागणूक एकदम विश्वासार्ह व चारित्र्य निष्कलंक होते. तो एखाद्या उमरावासारखा दिसत नसला तरी नाटकात उमरावाची भूमिका उत्तम वठवणाऱ्या नटासारखा नक्कीच दिसत होता. स्वतःशी ठाम असलेला व आत्मविश्वासपूर्ण असा तो माणूस होता.

धर्मगुरूने लगेच सुरवात केली. "तू इथे बरीच वर्षे काम करतो आहेस. आणि तू तुझ्या कर्तव्यात कुठेच कसूर केलेली नाहीस याबद्दल सर्वांचे एकमत आहे.

दोन्ही व्यवस्थापकांनी मान हलविली.

“परवा अचानक एक वेगळीच गोष्ट माझ्या लक्षात आली आणि ती व्यवस्थापकांच्या लक्षात आणून देणे मला योग्य वाटले. तुला लिहिता व वाचता येत नाही हे कळून मी आश्चर्यचकित झालो”

अल्बर्टच्या चेहऱ्यावर शरमेची जराही भावना दिसली नाही.

तो उत्तरला, “मागच्या धर्मगुरूंना ते माहिती होते. जगात अनौपचारिक रीत्या शिकण्यासारखे खूप असते असे ते नेहमी म्हणत”.

नवीन धर्मगुरू ओरडले, ”मी ऐकलेली ही सर्वात धक्कादायक गोष्ट आहे. तू इथे गेली सोळा वर्षे काम करतोस, तरीही तू लिहायला व वाचायला शिकला नाहीस असे तुला म्हणायचे आहे?”

“मी बारा वर्षांचा असताना नोकरी करू लागलो. आधीच्या चर्चच्या खानसाम्याने एकदा मला शिकवण्याचा प्रयत्न केला, पण ते शिकण्याची खुबी माझ्यात नव्हती. त्याची काही गरज असल्याचेही मला जाणवले नाही. माझी बायको चांगली हुशार आहे. मला कधी पत्र लिहायचे असले तर ती लिहून देते”.

धर्मगुरू म्हणाले, “असं बघ अल्बर्ट, सेंट पीटरसारख्या चर्चमध्ये लिहितावाचता न येणारा कामगार आम्ही ठेऊ शकत नाही. मला तुझ्याविरुद्ध काही तक्रार करायची नाही पण तू मला समजून घे. तुझा कामाचा आवाका व तुझे चारित्र्य याविषयी माझे खूपच चांगले मत आहे. परंतु, तुझ्या निरक्षरतेमुळे कदाचित काही घोडचूक झाली तर तो धोका आम्ही पत्करू शकत नाही. तुझ्या बाबतीत मला कठोर व्हायचे नाही. चर्च व्यवस्थापक व मी मिळून ठरविले आहे की

तुला तीन महिन्यांची मुदत द्यायची. जर तीन महिन्यांच्या शेवटी तुला लिहितावाचता आले नाही तर मात्र तुला इथून जावे लागेल.”

अल्बर्टला नवीन धर्मगुरू कधीच आवडला नव्हता. सुरवातीपासूनच त्याला असे वाटत होते की सेंट पीटर चर्चमध्ये या नवीन धर्मगुरूला नेमून चूक केली आहे. अल्बर्टने थोडे आळोखेपिळोखे दिले. त्याला स्वतःबद्दल आत्मविश्वास होता. त्याने स्वतःचे अवमूल्यन होऊन देण्याचे नाकारले.

“सर, माफ करा. पण हे मला जमणार नाही. नवीन गोष्टी शिकायचे माझे वय आता राहीले नाही. माझ्या जागेवर तुम्हाला योग्य माणूस सापडताच, मी अगदी आनंदाने राजीनामा देईन.” पण जेव्हा धर्मगुरू व व्यवस्थापक गेल्यावर त्याने नेहमीच्या नम्रपणे तेथील दार लावले, तेव्हा त्याच्यावर झालेला आघात त्याने ज्या शांतपणे व उमदेपणे सहन केला तसे आता अजून काळ चालू ठेवणे त्याला जमेना. त्याचे ओठ थरथरू लागले. सावकाशीने चालत तो आतील खोलीत गेला व वरच्या खुंटीवर त्याचा गाऊन अडकवला.

सगळे काही बंद केले. त्याचा कोट घातला. टोपी हातात घेतली व दाराला कुलूप लावून चर्चबाहेर पडला.

नेव्हिल चौकात तो रेंगाळला पण उदासीनतेने घेरल्यामुळे त्याने घरचा रस्ता धरला नाही.

जड हृदयाने तो सावकाश चालत राहिला. आता यापुढे आपण काय करावे हे त्याला समजत नव्हते. त्याच्याकडे काही रक्कम साठली होती पण काही न करता बसून खाण्याइतकी ती पुरेशी नव्हती. अशा गोष्टीचा सामना करावा लागेल याची त्याला सुतराम कल्पना नव्हती. रोमच्या धर्मगुरूंसारखे, सेंट पीटरचे कामगार पण आयुष्यभर एका जागी स्थिर असत.

खरे तर अल्बर्ट सिगरेट ओढत नसे पण दमलेला असेल तर तो सिगरेट ओढणे पसंत करे. त्याने ताण थोडा कमी होईल असे त्याला वाटले. एक पाकीट विकत घेण्यासाठी त्याने रस्त्यात इकडेतिकडे पाहिले. अनेक प्रकारची दुकाने असलेला असा तो लांबच लांब रस्ता होता पण त्याला सिगरेट मिळेल असे त्यातील एकही नव्हते.

“एखाद्याने इथे सिगरेट व गोळयांचे दुकान टाकले तर मला नवल वाटणार नाही.” तो स्वतःशी पुटपुटला व एकदम चमकला.

“चांगली कल्पना आहे. हे विचित्र आहे. अचानक तुम्हाला कशा काय अशा कल्पना सुचतात?” त्याने विचार केला.

घरी जाऊन त्याने चहा घेतला.

त्याच्या बायकोने विचारले,” आज तुम्ही एवढे गप्पगप्प का?”

“ मी विचार करतो आहे.” तो म्हणाला.

दुसऱ्या दिवशी तो परत कालच्या रस्त्याला गेला. नशिबाने त्याला हवे होते तसेच लहानसे दुकान तिथे भाड्याने द्यायचे होते. चोवीस तासानंतर त्याने ते भाड्याने घेतले आणि त्यानंतर महिन्याने त्याने सेंट पीटर येथील नेव्हिल चौकातील चर्च कायमसाठी सोडले. तंबाखूचा व्यापारी व बातम्यांचा प्रतिनिधी म्हणून व्यवसाय सुरु केला. चर्चमधील नोकरीपेक्षा हा व्यवसाय खालच्या दर्जाचा असल्याचे त्याची बायको म्हणाली पण त्याने तिला समजावले की काळानुसार आपल्याला बदलावेच लागते.

अल्बर्टचे छान चालले होते. इतके छान चालले होते की एका वर्षात त्याने दुसरे दुकान घेऊन तिथे एक व्यवस्थापक नेमला. मग त्याला असे वाटू लागले की मी

दोन दुकाने चालवू शकतो तर मग डझनभर का नाही? त्याने लंडनभर फिरायची मोहीम सुरु केली व जिथे जिथे त्याला एखाद्या लांबलचक रस्त्यावर दुकान भाड्याने द्यायचे आहे अशी पाटी दिसली ते ते दुकान त्याने भाड्याने घेऊन टाकले. दहा वर्षात त्याच्याकडे दहापेक्षा कमी दुकाने नव्हती. दर सोमवारी तो सर्व दुकानांत चक्कर मारून आठवड्याचा गल्ला गोळा करून बँकेत भरे.

एका सकाळी बँकेतील कॅशियर त्याला म्हणाला की बँक व्यवस्थापकाला त्याला भेटायचे आहे. तो तिथे गेल्यावर बँक व्यवस्थापकाने त्याच्याबरोबर हस्तांदोलन करून त्याला म्हटले, “मिस्टर फोरमन, तुम्हाला माहित आहे का की तुमच्या खात्यात किती पैसे जमा झाले आहेत? ३०००० पौंड़ांपेक्षा जास्त! ही फारच मोठी रक्कम असल्याने, तुम्ही तिची योग्य गुंतवणूक करावी.”

“मला कुठलाही धोका पत्करायचा नाही. बँकेत माझे पैसे सुरक्षित आहेत.”

“तुम्ही काही काळजी करू नका. अजिबात धोका नसलेल्या योजनांची माहिती आम्ही तुम्हाला देतो. त्यात तुम्हाला आत्तापेक्षा नक्कीच जास्त व्याजदर मिळेल.”

अल्बर्ट फोरमनच्या चेहऱ्यावर त्रासिक भाव उमटले. “मी कधी शेअर वगैरेमध्ये गुंतवणूक केली नाही. ते सर्व मग मला तुमच्या हाती सोपवावे लागेल.” तो म्हणाला.

व्यवस्थापक हसला. “आम्ही सर्व काही करतो. पुढच्या वेळी याल तेव्हा तुम्हाला फक्त सह्या कराव्या लागतील.”

अल्बर्ट साशंकतेने म्हणाला," ठीक आहे. ते मी करीन पण मी कशावर सही केली आहे हे मला कसे कळणार?"

"मला वाटते तुम्ही ते वाचू शकता." व्यवस्थापक अगदी क्षुल्लक गोष्ट असल्याच्या थाटात म्हणाला. फोरमन गोडसे हसून म्हणाला, "सर, खरे तर तोच प्रश्न आहे. मी वाचू शकत नाही. तुम्हाला हे विनोदी वाटेल पण ते तसेच आहे. मी लिहू वाचू शकत नाही. फक्त माझे नाव — म्हणजे सही, तेवढी मी करू शकतो. ते सुद्धा मी व्यवसायात पडल्यावर शिकलो."

व्यवस्थापक इतका आश्चर्यचकीत झाला की त्याने जवळजवळ खुर्चीवरून उडीच मारली. "म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे की तुम्हाला लिहितावाचता येत नसताना तुम्ही एवढा मोठा व्यवसाय उभारून तुमचे भविष्य घडवलेत. अरे देवा, जर तुम्ही सुशिक्षित असतात तर काय झाला असतात?"

त्याच्या अभिमानी चेहऱ्यावर हसू आणत मिस्टर फोरमन बोलले, "नेव्हील चौकातील सेंट पीटर चर्चमध्ये कामगार झालो असतो."

# लॉर्ड मार्क



डॉ. ऑडीन यांनी त्यांच्या टेबलावरील घड्याळाकडे पहिले. सहाला वीस मिनिटे होती. त्यांना नवल वाटले. त्यांचा पेशंट लॉर्ड मार्क याला आज उशीर झाला होता. वेळेचा शिस्तशीरपणा हा तुमच्या बुद्धिमत्तेला पूरक असतो व मूर्खाला एक फटकारा देण्यासाठीपण तो उपयोगी ठरू शकतो असे लॉर्ड मार्क नेहमी म्हणे. तो वक्तशीर असल्याचा त्याला फारच अभिमान होता. साडेपाच वाजता डॉ ऑडीनला भेटायचे ठरले होते.

डॉ. ऑडीनचे व्यक्तिमत्व काही फार लक्षवेधी नव्हते. तो उंच व थोडा वाकलेला होता. केस विरळ असून पांढुरके झालेले होते. त्याच्या उभट पिवळसर चेहेऱ्यावर सुरकुत्या होत्या. त्याचे वय पन्नासपेक्षा जास्त नसावे पण तो वयस्क वाटत होता. त्याचे डोळे मोठे, फिकट निळे पण निस्तेज होते. त्याच्याशी तुम्ही थोडा वेळ बोललात तरी त्याची नजर तुमच्या चेहेऱ्यावर खिळलेली तुम्हाला जाणवे. पण त्यात काही भाव नसल्याने त्यामुळे बेचैनी येत नसे. त्यामुळे त्याच्या डोक्यात काय विचार चालू आहेत ते काही कळत नसे. आपले बोलणे ऐकताना तुम्हाला जाणवे की त्याची पापणीही लवत नसे. त्याचे हात लांब होते. हाताची बोटेही लांब व निमुळती होती. त्याचे कपडे भडक रंगाचे होते. टाय काळा होता.

त्यामुळे त्याचा चेहेरा व डोळे अधिकच निस्तेज दिसायचे. एखाद्या आजारी माणसासारखाच तो दिसे.

डॉ. ऑडीन हा मानसोपचारतज्ञ होता. हा व्यवसाय त्याने तसा अकस्मातच निवडला. जेव्हा युद्ध सुरु झाले तेव्हा त्याने नुकतीच पदवी मिळविली होती. अनेक दवाखान्यांमध्ये तो अनुभव घेत होता. अनेक अधिकाऱ्यांवर त्याने उपचार केले होते. झोप उडालेल्या लोकांना तो झोप मिळवून देई. काही दुखणी तो त्याच्या घट्ट मऊ हाताच्या स्पर्शाने व दिलासा देणाऱ्या बोलण्याने बरी करे. तो संथपणे बोले. त्याच्या आवाजात चढउतार नसत पण तो शांत, हळुवार व सुस्वर असे. विश्रांती घ्या, काळजी करू नका, आरामात झोपा असे तो सांगे. मग पेशंटच्या थकलेल्या गात्रांमध्ये झोप अलगद शिरे. गुंगीत जाऊन ते चिंता विसरत. एखाद्या गर्दीच्या बाकावर माणसाला बसायला जागा मिळावी तसे त्यांना वाटे. तप्त जमिनीवर पाण्याचा शिडकावा व्हावा तशी त्यांच्या दमलेल्या पापण्यांवर हळुवारपणे झोप उतरे. त्याच्या एकसुरी आवाजात बोलून, शांत, मंद डोळयांनी त्यांच्याकडे बघून, त्यांच्या चिंतायुक्त कपाळावर त्याच्या लांब घट्ट हातानी चेपून त्याच्या पेशंटच्या काळज्या दूर होत, त्यांचे ताणतणाव निवळत, असे डॉ ऑडीनला वाटे. त्यांचे आयुष्य नासविणारी भीती तो पळवून लावे. कधीकधी त्याचे पेशंट तो एखाद्या चमत्कारासारखे बरे करी. विमान दुर्घटनेत, शरीरात लकवा भरलेल्यांच्या बाहूंमध्ये तो परत शक्ती आणे. बॉम्बस्फोटात जमिनीत गाडले जाऊन दातखीळ बसलेल्या माणसास तो बोलते करी. आपल्यात फार काही वेगळी शक्ती आहे असे त्यास वाटत नसे. प्रसंगी तुमचा तुमच्यावर ठाम विश्वास हवा असे म्हटले जाते पण त्याच्या बाबतीत तसेही नव्हते. फक्त तो कुठून कुठून येणाऱ्या पेशंटवर उपचार करत राहीला. अविश्वास दाखविणाऱ्या पेशंटवरदेखील तो कुठल्या जाणीवेने कुणास ठाऊक, पण उपचार करून त्यांना बरे करत असे. युद्ध संपले तेव्हा तो प्रथम

व्हिएन्नाला व नंतर झुरीचला जाऊन पुढे शिकला. इंग्लंडमध्ये पंधरा वर्षे डॉक्टर म्हणून काम करून त्याने चांगले नाव कमावले. त्याची कीर्ती दूरवर पसरली. त्याची फी भरपूर असली तरी त्याच्या उपलब्ध वेळात त्याच्याकडे पेशंटची रीघ असे. त्याच्याबद्दल आश्चर्यकारक गोष्टी लोक इतरांना सांगत. आपण काहीतरी विशेष उपचार करत आहोत हे डॉ. ऑडीनला कळून चुकले होते. त्याने माणसाना आत्महत्येपासून, वेडाच्या झटक्यापासून व जीवघेण्या दुःखाच्या छायेपासून वाचविले होते, बिघडलेले लग्नसंबंध सुधारले होते. विचित्र प्रवृत्तींना आळा घातला होता. द्वेषपूर्ण भावनांचा नाश केला होता. निराशावादी लोकांना आशेचे किरण दाखविले होते. हे सर्व करूनही आपण म्हणजे कोण असा गर्व त्यास वाटत नव्हता. उलट आपण हे कसे काय करू शकलो असा संशयच मनाच्या अबोध पातळीवर त्याला जाणवत होता.

त्याचा स्वतःवरच ठाम विश्वास नव्हता. त्यामुळे त्याच्या पेशंटचा त्याच्यावर असलेल्या विश्वासाचा बाजार मांडण्याचे तो प्रामाणिकपणे टाळत असे. अधिकार गाजविणे तर त्याच्या तत्वांविरुद्धच होते. आता तो पैसे राखून असल्यामुळे फार काम करायचीदेखील त्याला गरज नव्हती. अनेक वेळा अति श्रमांमुळे त्याने डॉंक्टरकी बंद करायचाही विचार केला. फ्रॉंइड, जुंग व इतरांनीही लिहिलेले सगळे त्याला माहिती होते. पण कुठेतरी आत त्याला असे वाटे की ह्या सगळ्या उपपत्ती फसव्या आहेत. आपल्या उपचारांनी लोकांना बरे वाटते हे दिसत असूनही हे सगळे त्याला अतर्क्य वाटे. त्यांच्याकडे येणाऱ्या पेशंटमुळे त्याने मानवी स्वभावाचे अनंत नमुने पहिले होते. त्यांचे पेशंट भडाभडा बोलत. कधी नाराजीने, कधी लाजेने, कधी हातचे राखून व कधी रागाने! कशानेही तो आता हादरून जात नसे. आतापर्यंत त्यांला हे कळून चुकले होते की माणसे खोटे कसे बोलतात, त्यांचा डामडौल कसा पोकळ असतो. अजूनही बरेचसे वाईटसाईट त्याला माहिती असे पण ते चूक की बरोबर याचा निवाडा त्याला करायचा नसे. वर्षानुवर्षे असली विचित्र

गुपिते ऐकून त्याचा चेहरा अधिकच करडा झाला होता. डोळे अधिकच निस्तेज झाले होते व सुरकुत्या अधिकच गहिऱ्या झाल्या होत्या. तो क्वचितच हसे पण थोडा आराम म्हणून पुस्तक वाचताना तो हसे. पुस्तकात वर्णन केलेले स्त्रीपुरुष खरेच तसे असतात का? कुठले दुर्वर्तनी गुण त्यांच्या अंगी वसत असतात? कुठली गुंतागुंत त्यांच्या ठायी निर्माण झालेली असते? त्यांच्या मनात कुठल्या बदलता न येणाऱ्या गोष्टी साठलेल्या असतात?

पावणेसहा वाजले. लॉर्ड मार्कची केस त्याने आत्तापर्यंत उपचार केलेल्या सर्व केसेसमध्ये विचित्र होती.

डॉ. ऑडीनना वाटले लॉर्ड मार्क हा हुशार व बऱ्यापैकी नावाजलेला मनुष्य होता. वयाचा चाळीशीच्या आतच तो परराष्ट्र धोरण विभागाचा सचिव म्हणून काम करत होता. आता तीन वर्षांनीदेखील त्याची धोरणे सुसंगत ठरत होती. पुराणमतवादी पक्षातील सर्वात हुशार राजकीय नेता म्हणून तो ओळखला जात होता. लॉर्ड मार्कमध्ये खूप चांगले गुण होते. तो उद्योगी व बुद्धिमान होता, खूप जग फिरला होता व खूप भाषा उत्तम बोलू शकत असे. तरुणपणापासूनच परराष्ट्र धोरणाचा त्याच विशेष अभ्यास होता. इतर देशांच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीची त्याने जाणीवपूर्वक माहिती करून घेतली होती. तो सभांमध्ये व अधिवेशनांमध्ये उत्तम वक्ता म्हणून ओळखला जाई. मुद्देसूद, स्पष्ट व नर्म विनोदी असे त्याचे भाषण असे. तो चाणाक्ष वादविवादपटू होता व आयत्या वेळेच्या प्रश्नांची उत्तरे देण्यात त्याचा हात कोणी धरू शकत नसे. तो उंच, देखणा व बघताक्षणी चांगले मत होईल असा माणूस होता. थोडे टक्कल असलेला व धष्टपुष्ट असा हा माणूस, परिपक्व वाटे. ते त्याच्या कामामध्ये त्याला उपयोगी पडे. तरुणपणी तो खेळाडू होता. ऑक्सफर्ड बोटींच्या शर्यतीत तो चांगले नाव कमावून होता. सरदारपुत्री असलेल्या अठरा वर्षीय मुलीशी त्याने चोविसाव्या वर्षी लग्न केले. तिची

आई उच्च अमेरिकन घराण्यातील होती. त्यांना दोन मुले झाली. अनेक वर्षे ते खाजगी रित्या वेगळे रहात पण समाजात वावरताना एकत्र असत. दोघांची इतर कुठेही प्रेमप्रकरणे नसल्याने कुणी त्यांच्याबद्दल कुजबुज करत नसे किंवा काही वावड्या उठणेही घडत नसे. लॉर्ड मार्क खरोखर फार महत्त्वाकांक्षी होता. फारच कष्टाळू व देशाभिमानी असून त्याच्या कार्यक्षेत्रात अडथळा येऊ शकेल अशा सुखलोलुप गोष्टींपासून तो नेहमीच लांब रहात असे. थोडक्यात, प्रसिद्ध, यशस्वी पुरुष अशीच त्याची प्रतिमा होती पण दुर्दैवाने त्याच्यात काही अवगुणही होते.

तो वरीष्ठांची हांजी हांजी करणारा व कनिष्ठांना तुच्छ लेखणारा होता. एखाद्या वकिलाच्या, उद्योजकाच्या मुलाने त्याच्या अनुवांशिक वारशाबद्दल अभिमान बाळगावा हे समजण्यासारखे आहे पण लॉर्ड मार्कचे वडील हे फारसे उच्च घराण्यातले नसूनही अनेक वर्षे उमरावांबरोबर राहिल्यामुळे मार्कला उच्च घराण्यातील रीतीरिवाज पूर्णपणे अंगवळणी पडलेले होते व ते दाखविण्याची संधी तो कधीच सोडत नसे. पण हे तो फक्त बरोबरीच्या लोकांशी वागताना करे. सामाजिक दृष्ट्या निम्न स्तरातील लोकांबरोबर तो थंड डोक्याने व अतिशय उद्धटपणे वागे. त्याच्या हाताखालचे लोक त्यामुळेच त्याला घाबरत व त्याचा द्वेष करत. तो अति अरेरावीने वागे. त्याच्या नोकरांशी खुनशीपणे वागताना किंवा त्याच्या सहाय्यकाशी अपमानकारक रित्या वागताना त्याला काहीच वाटत नसे. तो ज्यांच्याबरोबर काम करत असे त्यांच्यापेक्षा तो खूपच हुशार होता व तसे तो त्यांना सतत जाणवू देई. मानवी स्वभावाचा कमकुवतपणा त्याला सहन होत नसे. त्याचा जन्म लोकांवर हुकमत गाजविण्यासाठीच झाला आहे, असे त्यास वाटे. लोकांच्या तक्रारी ऐकून घेण्यास तो तयार नसे. त्याने सांगितलेल्या बाबतीत कोणी काही उलटेसुलटे बोलल्यास तो भयंकर चिडे. तो कमालीचा स्वार्थी होता. त्याच्या हुद्द्यामुले त्याला मिळणारे मानसन्मान त्याला अगदी हक्काचे वाटत. त्याबद्दल त्याला कधी कृतज्ञता वाटत नसे. इतरांसाठी काहीतरी करण्यासाठी त्याला हे पद देऊ केले आहे हे त्याच्या डोक्यात शिरत नसे. त्याला अनेक शत्रू होते. तो त्यांना

कःपदार्थ समजे. त्याची मदत, सहानुभूती किंवा अनुकंपा त्याच्याबरोबरील लायक लोकांनाही मिळत नसे. त्याला कुणी मित्र नव्हते. त्याचे वरिष्ठ त्याच्या इमानीपणाबद्दल शंका घेत म्हणून तो नाराज असे. तो त्याच्या पक्षामध्ये लोकप्रिय नव्हता. कारण तो उद्धट व शिष्ट होता. तरीही त्याचे देशप्रेम, गुणवत्ता, बुद्धिमत्ता व परदेशीय धोरणांची समज इतकी पराकोटीची चांगली होती की सगळयांना त्याच्याशी जमवून घ्यावे लागे आणि असे करणे शक्य होई कारण काही प्रसंगी तो खरच जादूमयी भासे. विशेषतः त्याच्या बरोबरीच्या लोकांशी वागताना किंवा त्याला कुणाला प्रभावित करायचे असे त्यावेळी! प्रसिद्ध स्त्रियांशी किंवा परदेशी उच्चपदस्थ व्यक्तींशी संवाद साधताना तो आनंदी, नर्मविनोदी व चांगल्या स्वभावाचा भासे. त्यावेळी त्याच्या अंगात उमरावांचे रक्त वाहते आहे असे वाटे. तो मुद्देसूदपणे बोले, सहजतेने वागे. दूरदृष्टी व योग्य हावभाव दृगोचर होत. त्याच्या ज्ञानाची खोली व त्याच्या अभिरुचीची जाणीव बघून आश्चर्य वाटे. तो जगातील सर्वोत्कृष्ट साथीदार भासे. मग त्याने केलेले अपमानही विसरायला होत. तरीही उद्यादेखील तो तुमचा गळा कापायला मागेपुढे पहाणार नाही याची आठवण ठेवणे आवश्यक असे.

डॉ. ऑडीनचा पेशंट होण्यासाठी लॉर्ड मार्क तसा राजी नव्हताच. त्याच्या सहाय्यकाने डॉक्टरांना फोन केला व दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता डॉक्टरांनी लॉर्ड मार्कच्या घरी यावे असे सुचविले. पण डॉ. ऑडीन म्हणाले की ते कुणाला घरी जाऊन भेटत नाहीत व परवा पाच वाजताची वेळ ते निश्चित करू शकतात. सहाय्यकाने निरोप घेतला व पुन्हा फोन करून डॉक्टरांना घरी येण्याचा आग्रह धरला. फी जास्त घेतलीत तरी चालेल असे सांगितले. मी माझ्या पेशंटना फक्त दवाखान्यातच भेटतो व लॉर्ड मार्क जर दवाखान्यात आला तरच ते त्याच्याशी संवाद साधू शकतील असे स्पष्ट शब्दात सुनावल्यावर थोड्या वेळाने त्यांना त्रोटक निरोप मिळाला की परवा पाच वाजता लॉर्ड मार्क दवाखान्यात येतील.

जेव्हा लॉर्ड मार्क दवाखान्यात आला तेव्हाही तो दारात उभा राहून विचित्रपणे डॉक्टरांना पायांपासून डोक्यापर्यंत न्याहाळत राहिला. डॉक्टरांनी जाणले की तो रागावलेला आहे. त्यांनी स्थिर नजरेने शांतपणे त्याच्याकडे पाहिले. त्यांना एक मोठा जाडजूड, केस करडे झालेला माणूस दिसला. कपाळावर आलेल्या केसांमुळे तो उमदा दिसत होता. शिकाऱ्याप्रमाणे धारदार नजर, थोडा फुगलेला चेहरा व धीट भासणारे सामान्य नाकडोळे असा तो दिसत होता.

“पंतप्रधानाला भेटण्याइतकेच तुम्हाला भेटणे हे मुष्कील दिसते आहे. मी कामात व्यग्र असलेला माणूस आहे.“

“तू बसणार नाहीस काय?”डॉक्टर म्हणाले.

लॉर्ड मार्कच्या बोलण्यामुळे डॉक्टरांवर काही परिणाम झाल्याचे जाणवले नाही. त्यांच्या टेबलाशेजारील खुर्चीवर डॉक्टर बसले होते. लॉर्ड मार्क अजून थोड्या घुश्यातच उभा होता.

तो कटुतेने म्हणाला, ”मला वाटते मी परराष्ट्र धोरण मंत्री आहे हे तुम्हाला सांगणे गरजेचे आहे”.

“तू बसणार नाहीस का?”डॉक्टर परत म्हणाले.

त्याच्या आविर्भावांवरून असे वाटले की तो आता वळून बाहेर पडणार, पण बसलेले बरे असे वाटून बहुधा तो बसला. डॉ. ऑडीननी त्यांचे मोठे रजिस्टर काढून त्यांचे पेन हातात घेतले व लॉर्ड मार्ककडे न बघता ते लिहू लागले.

“तुझे वय काय?”.

“बेचाळीस“.

“विवाहित आहेस?“.

“हो“.

“लग्नाला किती वर्षे झाली?“.

“अठरा वर्षे”.

“मुले आहेत?”.

“दोन मुलगे”.

डॉ. ऑडीननी सर्व गोष्टी लिहिल्या. लॉर्ड मार्क थोड्या बेफिकीरीनेच उत्तरे देत होता. खुर्चीत मागे रेलून डॉक्टरांनी लॉर्ड मार्ककडे पाहिले. फिकट थंड डोळयांनी एकटक बघताना ते अवाक्षरही बोलले नाहीत.

शेवटी त्यांनी विचारले, “मला भेटायला यायचे कारण काय?”.

“मी तुमच्याबद्दल ऐकले आहे. मला वाटते, लेडी कम्यून तुमची पेशंट आहे व तिला तुमच्या उपचाराने बरे वाटले असे ती सांगत होती.”

डॉ. ऑडीननी प्रत्युत्तर केले नाही. त्यांचे डोळे लॉर्ड मार्कवर खिळलेले राहिले. पण त्यात भाव काहीच नव्हते, त्यावरून ते लॉर्ड मार्ककडे बघत तरी आहेत की नाही अशी शंका येत होती.

बऱ्याच वेळाने ते म्हणाले, “मी काही चमत्कार करू शकत नाही.”हसू नाही तरी हास्याची सावली त्यांच्या डोळयात उमटली. “ज्या रॉयल कॉलेजमधून मी शिकलो, त्यांचा चमत्कारांना पाठिंबा नाही.”

लॉर्ड मार्क मंद हसला. त्याचा राग थोडा निवळलेला दिसला. तो थोड्या नरमाईने बोलू लागला.

“तुमचे चांगलेच नाव आहे. लोकांचा तुमच्यावर विश्वास आहे.”

“तू माझ्याकडे का आला आहेस?”डॉ. ऑडीननी परत विचारले.

आता शांततेची पाळी लॉर्ड मार्कची होती. बोलणे कठिण असल्याचे वाटत होते. डॉ. ऑडीन शांत होते. शेवटी मनाचा हिय्या करून लॉर्ड मार्कने तोंड उघडले. “मी चांगला ठणठणीत आहें. मी नुकतीच माझ्या नेहमीच्या डॉंक्टरकडून तपासणी करून घेतली आहे. डॉ एडवर्ड हे नाव तुम्हा ऐकले असेल. तिशीच्या माणसाची असेल तशी माझी तब्येत आहे. मी खूप काम करतो पण दमत नाही. मी अगदी कमी सिगरेट ओढतो व अल्कोहोलही अगदी माफक प्रमाणात घेतो. मी पुरेसा व्यायाम करतो व सर्वसामान्य जीवन जगतो. मी अगदी पूर्णपणे सुदृढ, सामान्य व सशक्त माणूस आहे. मी तुमचा सल्ला मागायला येणे हे तुम्हाला अगदी पोरकट व मूर्खपणाचे वाटायची शक्यता आहे.”

त्याला मदतीची गरज आहे हे डॉ ऑडीनना कळले.

“मी तुला मदत करायचा प्रयत्न करतो. तुला काही त्रास आहे का? “

लॉर्ड मार्कच्या कपाळावर आठ्या दिसू लागल्या. “मी जे काम करतो ते महत्वाचे आहे. देशाच्या कल्याणावर माझ्या निर्णयाने सहज फरक पडू शकतो व

जगाच्या शांततेवरही. माझे डोके ठिकाणावर असावे लागते व माझी धोरणे सुसंगत असावी लागतात. माझ्या कामाच्या झपाट्यावर परिणाम करणारी कुठलीही काळजी दूर करणे हे माझे कर्तव्य आहे."

डॉ ऑडीन त्याच्याकडे एकटक पहात होते. त्यांना खूप काही दृगोचर झाले. त्यांच्या पेशंटच्या अहंकारी उद्दामपणामागे व भपकेबाजपणामागे असलेली चिंता लपत नव्हती.

"ते बरे झाले कारण माझा असा अनुभव आहे की एखाद्या डॉक्टरच्या दवाखान्यात मनमोकळेपणे बोलणे हे तुमच्या रोजच्या सवयीच्या वातावरणात बोलण्यापेक्षा नक्कीच सोपे जाते."

इतका स्वाभिमानी व स्वतःला शहाणा समजणारा माणूस त्या क्षणी थोडा खजिल झालेला वाटला. आपण अगदी नेहमीसारखेच आहोत असे दाखविण्यासाठी तो डॉक्टरांकडे बघून हसला पण त्याच्या डोळ्यात खरे काय ते दिसून येत होते. तो मनापासून पण कृत्रिम रीतीने बोलू लागला.

"सगळे इतके सहज व सामान्यपणे घडणारे आहे की ते सांगून तुम्हाला त्रास देणे मला कठीण जाते आहे. तुम्ही नक्की मला मूर्ख ठरवालं. मी तुमचा अमूल्य वेळ फुकट घालवितो आहे असेही तुम्हाला वाटेल."

"अगदी सामान्य गोष्टी सुद्धा कधीकधी खूप महत्वाच्या ठरतात. खोल रुतलेल्या उदासीची लक्षणे त्यात दिसू शकतात आणि माझा वेळ मी तुम्हाला दिलेलाच आहे."डॉक्टरांचा आवाज शांत, खर्जातील होता. दिलासा देणारा होता. लॉर्ड मार्कने शेवटी मोकळेपणाने बोलायचे ठरविले.

“अलीकडे मला अगदी दमवून टाकणारी स्वप्ने पडतात. त्यांच्याकडे लक्ष देणे निरर्थक आहे हे मला कळते आहे पण तरीही प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर त्यामुळे मी खूप अस्वस्थ होतो.”

“त्यातील एखाद्या स्वप्नाचे वर्णन तुला करता येईल? “

लॉर्ड मार्क हसला. ते हसणे खेदजनक होते पण तरीही आपण निष्काळजी असल्याचा आव तो आणीत होता.

“ती इतकी वेड्यासारखी आहेत की ती कशी सांगावी हेच मला कळत नाही.”

“बोल. मोकळेपणे बोल.”

“ठीक आहे. साधारण महिन्यापूर्वी मला पहिले स्वप्न पडले. मी एका ठिकाणी मेजवानीसाठी गेलो होतो. ती ऑफीसतर्फे होती. राजा राणी येणार होते. त्यामुळे बरीच रोषणाई केली होती. मी माझा बो व बिल्ला लावला होता. मी माझा कोट काढण्यासाठीच्या खोलीत गेलो. तिथे ओवेन नावाचा एक छोटा मनुष्य होता. तो राज्यसभेचा सदस्य आहे आणि खरे सांगायचे तर त्याला तिथे बघून मी चकित झालो. तो तर अति सामान्य आहे असे मी स्वतःशी म्हणालो. तो माझ्याकडेच बघत होता पण मी लक्ष नाही असेच दाखविले. मी वरच्या मजल्यावर चालत गेलो. मला वाटतं तुम्ही कधी तिथे गेला नसाल. “

“कधीच नाही.”

“नाही. अशा ठिकाणी तुम्ही जायची शक्यता नाहीच. ते जरा असेतसेच घर आहे पण त्याचा जिना छान संगमरवरी आहे. तिथे सर्वात वरच्या मजल्यावर

पाहुण्यांचे स्वागत केले जात होते. घराची मालकीण माझ्याकडे आश्चर्याने बघत होती. तिला मी हात केला. ती गालातल्या गालात हसू लागली. चार्ल्स दुसरा याने ज्या बाईशी लग्न केले त्या घराण्यातील ती असून जरा चक्रम आहे म्हणून मी काही लक्ष दिले नाही. त्या घरातील खोल्या प्रशस्त आहेत. त्यातून मी फिरत होतो. ओळखीच्या लोकांना अभिवादन करत होतो. नंतर मी एका जर्मन राजदूताला ऑस्ट्रेलिअन उमरावाशी बोलताना पहिले. मला त्याच्याशी बोलायचे असल्यामुळे मी त्याला हात केला. मला बघितल्याबरोबर तो ऑस्ट्रेलिअन उमराव जोरात हसू लागला. मला खोलवर अपमान झाल्यासारखे वाटले. मी त्याच्याकडे एकटक बघत राहिलो. पण तो अधिकाधिक हसत  राहीला. मी त्याला कडक शब्दात काहीतरी सुनावणार होतो तेवढ्यात गडबड सुरु झाली. राजा व राणी आल्याचे मला कळले. मी त्याच्याकडे पाठ करून एक पाऊल पुढे टाकले आणि अचानक मला जाणवले की मी पँन्टच घातलेली नाही. मी फक्त एक लहानशी चड्डी घातली होती. मला सगळे का हसत होते ते कळले. त्या क्षणीं मी इतका खजिल झालो व शरमेने काळा ठिक्कर पडलो. थंडीतही मला घाम फुटला. आणि ओहो, हे सगळे स्वप्न होते हे समजल्यावर मी सुटकेचा निःश्वास टाकला."

डॉ ऑडीन म्हणाले, "अशी स्वप्ने पडणे अगदी सर्वसाधारण घटना आहे."

"मला नाही तसे वाटत. आणि दुसऱ्या दिवशी एक चमत्कारिक घटना घडली. मी राज्यसभेच्या गॅलरीत होतो तेव्हा तो ओवेन मला ओलांडून गेला. त्याने मुद्दाम माझ्या पायाकडे पहिले. मग माझ्या चेहेऱ्याकडे पाहून त्याने खात्रीपूर्वक डोळा मारला. माझ्या मनात एक वेगळाच विचार आला. त्याने नक्की मला आदल्या रात्री विचित्र वेषात पहिले व ते आठवून त्याला बहुधा गुदगुल्या होत होत्या. पण ते तर स्वप्न होते. मग हे कसे शक्य होते? मी त्याच्याकडे एक थंड कटाक्ष टाकला व तो निघून गेला. पण तो पाठ वळवूनही नक्की मला वाकुल्या दाखवित होता."

लॉर्ड मार्कने खिशातून त्याचा हातरुमाल काढला व त्याचे तळहात पुसले. आता तो त्याची अस्वस्थता लपविण्याचा प्रयत्न करत होता. डॉ ऑडीनचे त्याच्याकडे सतत लक्ष होते.

“दुसऱ्या स्वप्नासंबंधी सांग.”

“ते पुढच्या रात्री पडले आणि ते पहिल्यापेक्षाही अतर्क्य होते. मी राज्यसभेत होतो. परराष्ट्रधोरणासंबंधी चर्चा चालू होती. फक्त देशाचे नव्हे तर जगाचे डोळे त्यावर खिळले होते. साम्राज्याच्या भविष्यावर परिणाम करणारे असे धोरणातील बदल सरकारने करायचे ठरविले होते. हा ऐतिहासिक प्रसंग होता. राज्यसभा खचून भरली होती. सगळे राजदूत उपस्थित होते. गॅलरीदेखील गच्च भरली होती. संध्याकाळचे महत्वाचे भाषण मला करायचे होते. मी ते काळजीपूर्वक तयार केले होते. मला अनेक शत्रू होते. जेव्हा तुलनेने इतर माणसांच्या दृष्टीने जे पद मिळण्याची शक्यता अगदी धूसर असते त्या पदावर मी केव्हाच आरूढ झालो होतो व माझ्या भाषणाने अशा लोकांची बोलतीच बंद करायचे मी ठरविले होते. सर्व जग माझ्या ओठांवर झुलत असल्याचे जाणवून मी फारच प्रभवित झालो होतो. मी उभा राहिलो. तुम्ही कधी राज्यसभेत आला असाल तर तुम्हाला माहिती असेल की सभासद चर्चा चालू असताना कसे एकमेकांशी गप्पा मारत असतात, कसे कागदांची चाळवाचाळव करत असतात व कसे निवेदनांची पाने उलटत असतात. मी बोलायला उठलो तेव्हा टाचणी पडली तरी ऐकू येईल इतकी शांतता होती. अचानक मला तो छोटा मनुष्य, ओवेन, एका बाकावर बसलेला दिसला. त्याने मला जीभ बाहेर काढून वेडावून दाखविले. फार वर्षांपूर्वीचे एक भिकार गाणे मी गुणगुणायला सुरवात केली. जेणेकरून मी ओवेनकडे बघतच नसल्याचे भासवू शकलो.

मी पहिले कडवे गाईले. क्षणभर आश्चर्य पसरले व बाकावर थापट्या मारून सभासद हुल्लडबाजी करू लागले. मी त्यांना हातवारे करून शांत बसण्याची विनंती केली व दुसरे कडवे म्हणू लागलो. सर्वांनी मनावर दगड ठेऊन ते ऐकले आणि गाणे फार चांगले होत नसल्याचे मला कळले. मी रागावलो कारण माझा खर्जातला आवाज चांगला होता व त्यांनी मला न्याय द्यायलाच हवा असे मी ठरविलेले होते. जेव्हा मी तिसरे कडवे सुरु केले तेव्हा सगळे हसू लागले. क्षणार्धात हास्याचा सागर उसळला. राजदूत, महिला, पुरुष सर्वांची हसता हसता पुरेवाट झाली. फक्त माझ्यापुढे पहिल्या रांगेत बसलेले लोक शांत होते. त्या विचित्र अनपेक्षित गोंधळात ते दिग्मूढ झाले. मी त्यांच्याकडे नजर टाकली आणि अचानक मला मी काय करून बसलो ते जाणवले. मी सर्व जगाचा हास्यविषय ठरलो होतो. खेदाने मला कळून चुकले की मला राजीनामा द्यावा लागणार. मी जागा झालो व मला हे सर्व स्वप्न असल्याचे लक्षात आले."

हे सांगून झाल्यावर लॉर्ड मार्कचा डौलदारपणा नाहीसा झाला व तो फिकट दिसायला लागून थरथरू लागला. त्याने कसेबसे अवसान गोळा केले व त्याच्या ओठांवर बळेबळे हसू आणले.

"सर्व काही इतके वेड्यासारखे होते की माझे मनोरंजनच झाले. मी त्याचा विचार करणेच सोडून दिले व नेहमीच्या विश्वासाने दुसऱ्या दिवशी लोकसभेत गेलो. माझ्या जरुरीचे काही कागदपत्र मी नजरेखालून घातले. चर्चा तशी थंडपणेच चालली होती. पण मी तिथे असणे गरजेचे होते. काहीतरी कारणाने मी वर पाहीले तर ओवेन बोलत होता. त्याचे उच्चार काहीतरी विचित्र होते व कपडेही गबाळे होते. मी ऐकावे अशा लायकीचे काही तो बोलत नव्हता. मी माझ्या हातातील कागद परत करणार तोच त्याने मी स्वप्नात म्हटलेल्या त्या भिकार गाण्यातील दोन ओळी म्हटल्या. मी त्याच्याकडे बघतच राहिलो. त्याचे डोळे टर उडवित माझ्यावर खिळलेले होते. मी माझे खांदे उडविले. त्या फडतूस माणसाने माझ्याकडे असे पहावे

हे विनोदीच होते व त्याने त्या भिकार गाण्यातील दोन ओळी म्हणाव्या हा विचित्र योगायोग होता. मी परत फाईल चाळायला लागलो पण मला हे तुम्हाला सांगितलेच पाहिजे की माझे त्यात लक्ष लागत नव्हते. मी गोंधळलो होतो. ओवेन माझ्या पहील्या स्वप्नात आला होता व माझी फजिती झाल्याचेही त्याने पाहीले होते. आता त्याने त्या दोन ओळी म्हटल्या हा निव्वळ योगायोग समजायचा? मी पाहिलेले स्वप्न तोही बघत होता का? पण तसे कसे होईल? मग मी तो विचार सोडून दिला."

तिथे शांतता पसरली. डॉ ऑडीनने लॉर्ड मार्ककडे बघितले व लॉर्ड मार्कने डॉ ऑडीनकडे बघितले.

"दुसऱ्या लोकांची स्वप्ने म्हणजे वैतागच असतो. माझ्या बायकोला कधीकधीच स्वप्ने पडतात आणि दुसऱ्या दिवशी ती साद्यंत हकीगत मला सांगत बसते. ते मला वेड्यासारखेच वाटते.".

डॉ ऑडीन थोडेसे हसले.

"मला तुमची स्वप्ने वैताग वाटत नाहीत."

"मला थोडे दिवसानंतर पडलेले अजून एक स्वप्न सांगतो. मी दुसऱ्या एका लोकसभेत गेलो होतो. ऑक्सफर्डला असल्यापासून कधीही तिथे गेलो नव्हतो व पुढेही जाणार नाही. पण तरीही ती जागा, ते रस्ते मला ओळखीचे वाटत होते. मी अगदी माहीतगार माणसाप्रमाणे एका खोलीत गेलो. ती बहुधा केस कापायची जागा होती, की पेयपान करायची खोली होती. तिथे गरम शेगडी व चामड्याचे हात असलेली खुर्ची होती. दाराजवळ संगमरवरी टेबल व दोन खुर्चा होत्या. ती शनिवार रात्र होती व खूप गर्दी होती. तिथे झगमगाट होता व धुरकट

वातावरणामुळे मला डोळे फाडून बघावे लागत होते. मी डोक्यावर टोपी घातली होती. गळयाभोवती रुमाल बांधला होता. एखाद्या मवाल्यासारखा वेष मी घातला होता. बहुतेक लोकांनी अति दारू प्यायली होती. मला मजा वाटत होती. रेडिओवर गाणे लागले होते, कुठले कुणास ठाऊक! शेगडीसमोर दोन बायका नाच करत होत्या. त्यांच्याभोवती जमून लोक गात होते, आरडाओरडा करत होते, खिदळत होते. मी वर जाऊन पहायचे ठरविले. एक मनुष्य मला म्हणाला, बिल, एक पेला मद्य घे. टेबलावर मद्याचे चषक भरलेले होते. त्याने मला एक दिला व उगीच कशाला आढेवेढे घ्या म्हणून मी तो पिऊन टाकला. नाचणाऱ्या बाईने येऊन तो पेला पकडला. “तू माझे पेय का पीत आहेस?” असे ती म्हणाली. “माफ कर” मी म्हणालो. “त्या माणसाने दिले म्हणून मी ते प्यायलो.”“ठीक आहे मित्रा, ये. माझ्याबरोबर नाच कर” ती बोलली. मी काही विरोध करायच्या आत तिने मला ओढले व आम्ही दोघे नाचू लागलो. मग मी एका खुर्चीवर बसलो आहे व ती माझ्या मांडीवर बसून आम्ही दोघे एकाच पेल्यातून मद्य पित आहोत असे मला आढळले. मला हे सांगितले पहिजे की कामक्रीडेला माझ्या आयुष्यात कधीच विशेष स्थान नव्हते. माझ्या हुद्द्यासाठी मी विवाहित असणे चांगले असल्यामुळे मी लग्न केले आणि एकदाचा कामसुखाचा प्रश्न सोडवून टाकून स्थिरस्थावर व्हावे, म्हणूनही मला ते हवे होते. तसे दोन मुलगे झाल्यावर मग मी वैवहिक आयुष्याकडे पाठच फिरविली. माझ्या कामाचा व्याप इतका प्रचंड होता की असल्या गोष्टींकडे लक्ष द्यायला मला वेळच नव्हता. शिवाय मी इतका लोकांच्या सतत नजरेसमोर होतो की काही प्रेमप्रकरणे करणे म्हणजे शुद्ध वेडेपणाच ठरला असता. बायांच्या भानगडी न करता निर्मळ चारित्र्य असणे ही एका राजकीय माणसासाठी मोठी जमेची बाजू होती. स्त्रियांकरता स्वतःच्या कार्यकर्तृत्वावर पाणी सोडणाऱ्या लोकांची मी कीव करतो. त्यांना क्षुद्र समजतो. माझ्या पायावर बसलेली बाई प्यायलेली होती. ती तरुणही नव्हती व सुंदरही नव्हती. खरे तर ती एक चारित्र्यहीन वयस्क वेश्या होती. मला

तिची किळस आली. तिने जेव्हा तिच्या ओठांशी माझे ओठ भिडविले तेव्हा दारूचा वास आला व तिचे किडके दात दिसले. जरी मी तिला झटकून टाकत होतो तरी मला ती हवी होती. अगदी मनापासून हवी होती. एकदम मला एक आवाज ऐकू आला. “चांगले आहे. अरे माणसा, छान आनंदात वेळ घालव.” मी पाहिले तर तो ओवेन होता. मी खुर्चीतून उठायला बघू लागलो पण ती रानटी बाई मला उठू देईना. “तू चालू ठेव. अरे, ती तुला तुझ्या पैशांचा पुरेपूर मोबदला देईल.” ओवेन छद्मीपणे बोलला. तुम्हाला महिती आहे का की मला त्याने त्या विचित्र परिस्थितीत बघितल्यामुळे त्याचा इतका राग आला की त्या बाईला ढकलून मी त्याच्यासमोर उभा राहिलो व म्हणालो, “तू कोण आहेस मला माहिती नाही व माहिती करून घ्यायची इच्छाही नाही.” तो म्हणाला, “मी तुला ओळखतो व मी तुला असा सल्ला देईन की तुझे पैसे वसूल कर. फसू नकोस.” जवळच टेबलावर दारूची बाटली पडली होती. अवाक्षरही न काढता, मी, ती पकडली व जोराने त्याच्या डोक्यावर आदळली. मी इतक्या आक्रमक हालचाली केल्या की मी जागा झालो.”

“अशा प्रकारचे स्वप्न अनाकलनीय नाही. निष्कलंक चारित्र्याच्या व्यक्तीवर निसर्ग असा सूड उगवतो.”

“या गोष्टी मूर्खपणाच्या आहेत. मी त्या तुम्हाला काही उगीच सांगितल्या नाहीत. मी त्याच्या दुसऱ्या दिवशी काय झाले तेही सांगतो. मला घाईने काहीतरी महत्वाचे संदर्भ शोधायचे होते म्हणून मी लोकसभेच्या वाचनालयात गेलो. मला हवे ते पुस्तक घेऊन वाचू लागलो. मी बसताना हे बघितले नाही की ओवेन माझ्या शेजारचा खुर्चीत बसलेला होता. दुसरा असाच एक फालतू मनुष्य येऊन ओवेंनशी बोलू लागला, ‘अरे ओवेन, तू आज थोडा मलूल दिसतो आहेस.’ ओवेन उत्तरला,

“माझे डोके दुखते आहे. डोक्यावर बाटलीने जोरात प्रहार केल्यासारखे मला वाटते आहे.”

आता लॉर्ड मार्कचा चेहरा रागाने लाल झाला होता.

“मला कळले की मी ज्या गोष्टी काल्पनिक समजत होतो, त्या खऱ्याच होत्या. नव्हे, तशी माझी खात्रीच पटली. मला पडलेली स्वप्ने ओवेनलादेखील पडत होती. मला ती जशी आठवतात तशीच त्यालाही आठवत होती“

“ती बोलाफुलाला गाठही असू शकेल.“

“जेव्हा तो बोलला तेव्हा त्याच्या मित्राशी नव्हे तर मुद्दाम माझ्याशी बोलला. त्याने माझ्याकडे थोड्या त्रासदायक नजरेने पाहिले.”

“तोच तो मनुष्य सारखा तुझ्या स्वप्नात का येत असावा याबद्दल तू काही सांगू शकशील का?”

“नाही”.

डॉ ऑडीनचे डोळे अजूनही त्याच्या पेशंटवर स्थिर होते. तो खोटे बोलतो आहे हे त्यांना कळत होते. त्यांच्या हातात पेन्सिल होती व त्यानी टिपकागदावर एकदोन रेघोट्या मारल्या. नेहमीच लोकांना खरे बोलायला फार वेळ लागतो आणि तरीही त्यांना माहिती असते की त्यांनी काय ते सर्व खरेखुरे डॉक्टरांना सांगितल्याशिवाय त्यांना आपल्याला काही मदत करणे शक्य नाही.

“तुम्ही आत्ता मला सांगितलेली स्वप्ने तीन आठवड्यापूर्वी पडली. त्यानंतर काही स्वप्ने पडली का? ”

“रोज रात्री ”.

“त्या सगळया स्वप्नात ओवेन आला का? ”.

“हो ”.

डॉक्टरांनी टिपकागदावर अजून रेघोट्या मारल्या. शांतता, खिन्नता व अगदी मंद उजेड असलेल्या खोलीमुळे त्यांना लॉर्ड मार्कच्या जाणीवांवर परिणाम व्हयायला हवा होता. लॉर्ड मार्कने खुर्चीच्या पाठीवर रेलून बसत त्याचे डोके मागे झुकविले. डाँक्टरांच्या थंड नजरेला नजर द्यायचे तो टाळत होता.

“ डॉक्टर ऑडीन, तुम्ही माझ्यासाठी काहीतरी केले पाहिजे. मी अगदी हताश झालो आहे. असेच चालू राहिल्यास मी वेडा होईन. मी झोपायलाही घाबरतो. दोनतीन रात्री मी झोपलोच नाही. मी वाचत बसतो किंवा पेंग यायला लागली की माझा कोट घालून दम लागेपर्यंत फिरत बसतो. पण मला झोप हवी आहे. माझ्या कामासाठी मला माझ्या सर्व इंद्रियांवर काबू पाहिजे व लोकांसमोर मला व्यवस्थित उभे रहाता यायला हवे. मला विश्रांती हवी आहे. झोपेत तर ती मिळत नाही. मी झोपलो रे झोपलो की स्वप्नमालिका सुरु होते व त्यात तो भिकारडा असतोच. तो माझ्याकडे टक लाऊन बघत असतो. मला चिडवत असतो. मला पाण्यात बघत असतो. हा राक्षसी छळ आहे. डॉक्टर, मी तुम्हाला सांगतो, मी काही स्वप्नाळू मनुष्य नाही. माझ्या स्वप्नांवरून तुम्ही मला जोखू नका. कोणालाही विचारा. मी प्रामाणिक, तटस्थ व सभ्य मनुष्य आहे. खासगी किंवा सार्वजनिक रित्या माझे चारित्र्य आरशासारखे लखलखीत असल्याचे कोणीही सांगेल. आपल्या देशाची सेवा करून त्याचे नाव राखणे हेच माझ्या आयुष्याचे ध्येय आहे. माझ्याकडे पैसा आहे, मानमरातब आहे. क्षुद्र लोकांसारखा मोहाला बळी पडणारा मी नाही. लाचलुचपत घेण्याची मला गरज नाही. व्यक्तिगत फायदा, स्वार्थीपणा किंवा

मानापमान यापैकी कुठलीच गोष्ट मला माझ्या उद्दिष्टापासून दूर नेऊ शकत नाही. मी आता जो कुणी आहे त्याकरता मी खूपच त्याग केलेला आहे. मी महत्वाकांक्षी आहे. तो भंपक ओवेन मला समजतो तसा टाकाऊ, हीन अभिरुचीचा व भित्रा मनुष्य मी नाही. मी माझे ध्येय गाठण्यासाठी जीव टाकत असताना माझ्या मार्गात अडथळा आणणाऱ्याचा मी नक्कीच रागराग करणार. मी तुम्हाला माझी तीन स्वप्ने सांगितली. ती काहीच नाहीत. त्या माणसाने मला पशुतुल्य, भयानक लज्जास्पद गोष्टी करताना पहिले आहे. त्या मी जीव गेला तरी सांगणार नाही. त्या सगळया त्याला आठवतात. माझ्याबद्दलची घृणा व तिरस्कार त्याच्या डोळयात मला दिसतात. मी त्याच्याबद्दल बोलायलाही नाखूष असतो कारण मी बोललेले त्याला मूर्खपणाचे वाटते. स्वाभिमान असलेल्या माणसाबद्दलच्या ज्या गोष्टी पाहू नयेत, त्या त्याने खऱ्या असल्याप्रमाणे पाहील्या आहेत. मित्रांकडून, समाजाकडून बहिष्कृत करून दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासासाठी पाठवावे अशा त्या गोष्टी आहेत. त्याने माझे चुकीचे भाषण ऐकले आहे. त्याने माझा फक्त मूर्खपणाच नाही तर सूडबुद्धी पण पहिली आहे. तो मला हीन समजतो. ते सर्व खोटे आहे असे म्हणण्याचा ढोंगीपणाही तो करत नाही. खरच तुम्ही माझ्याकरता काही केले नाहीत तर मी त्याला तरी किंवा स्वतःला तरी मारेन."

डॉक्टर ऑडीन म्हणाले, "मी तुझ्या जागी असतो तर त्याला मारणार नाही. या देशात माणसाला मारण्याचे परिणाम चांगले होत नाहीत."

"पण तुम्हाला मला फाशी देतील असे म्हणायचे असेल तर ते खरे नाही. मी त्याला मारले हे कोणाला कळणार आहे? ते कसे ते मी स्वप्नात पाहिले आहे. मी बिअरच्या बाटलीने त्याच्या डोक्यात मारल्याचे मी तुम्हाला सांगितले व त्याचे डोके इतके दुखत होते की त्याला सरळ पाहताही येत नव्हते. तो स्वतःच तसे

म्हणाला. झोपेत त्याचे शरीर जे पाहते ते जागेपणी त्याच्या शरीराला जाणवते. पुढच्या वेळी मी त्याला बाटलीने मारणार नाही. एखद्या रात्री स्वप्नात माझ्या हातात सुरा असेल किंवा खिशात पिस्तुल असेल. ते तसे असणार कारण मला अगदी मनापासून तसे करायचे आहे. मग मी संधी शोधत राहीन. मी एखद्या डुकराप्रमाणे त्याला टिपून काढीन आणि मग मी त्याच्या भयंकर ससेमिऱ्यातून मुक्त होईन. ”

काही लोकांना असे वाटेल की लॉर्ड मार्क वेडा होता. इतकी वर्षे वेगवेगळया पेशंटवर उपचार करून डॉक्टर ऑडीनना माहिती झाले होते की शहाणपणा व वेडेपणा यातील सीमारेषा अगदी पुसट असू शकते. सर्वथैव सुदृढ व सामान्य असणारी माणसे, त्यांच्या आयुष्यातील कर्तव्ये पार पाडून स्वतःला कृतकृत्य समजतात, समाजाचे भले करतात. पण तुम्ही एकदा त्यांचा विश्वास संपादन केलात व त्यांचा जगासमोरचा मुखवटा फाडून काढलात की तुम्हाला भयानक विचित्रपणा, मनाचे वेडेवाकडे खेळ व जगावेगळे चाळे दृष्टीस पडतात. व मग त्यांना वेडेच ठरवावे लागते. अशा वेड्यांसाठी जगातील वेड्यांचे दवाखाने सुद्धा कमी पडतील. तसेही हा मनुष्य ठीक वाटत नव्हता कारण त्याला विचित्र स्वप्ने पडत होती व त्याचा रागाचा पारा चढत होता. डॉक्टर ऑडीनच्या निरीक्षणाप्रमाणे हा काहीतरी अति फुगवून सांगण्याचा प्रकार होता. लॉर्ड मार्क थोडा एककल्ली वाटत होता. उपचाराची कुठली पद्धत वापरावी याचा डॉ. ऑडीनना थोडा संभ्रम पडला होता.

“तू आणखी कुठल्या मानसोपचार तज्ञाकडे गेला होतास का? ”

“ फक्त सर ऑगस्टस यांच्याकडे. मी त्यांना एवढेच सांगितले की मला रात्री स्वप्ने पडतात व त्याचा त्रास होतो. त्यांनी मला सांगितले की अति कामाने असे होते. तुम्ही थोडे दिवस दुसऱ्या गावी फिरायला जाऊन या. हे सांगणे काहीतरीच होते. आता आंतरराष्ट्रीय परिस्थिती जरा तंग आहे तेव्हा मी माझे

परराष्ट्र धोरणाचे काम थांबवू शकत नाही. मी महत्वाचे पद सांभाळतो व त्याची जाणीव मला आहे. माझ्या आताच्या  कार्यक्षमतेवर माझे भविष्य ठरणार आहे. त्यांनी मला गुंगीची औषधे दिली. त्यांचा काही परिणाम झाला नाही. त्यांनी मला शक्तीवर्धके दिली. ती तर अति भिकार होती. तो डॉंक्टर अगदीच मूर्ख होता. ”

“तो एक विशिष्ट माणूसच सारखा स्वप्नात का येत असावा याचे काही कारण तू सांगू शकशील का? ”

“तुम्ही मला पूर्वीदेखील हे विचारले होते व मी त्याचे उत्तर दिले होते. ”

ते खरे होते पण त्या उत्तराने डॉक्टर ऑडीनचे समाधान झाले नव्हते.

“आत्ताच तू छळाबद्दल बोललास. ओवेनला तुझा छळ करावा असे का वाटत असेल? ”

“मला माहिती नाही ”

लॉर्ड मार्कचे डोळे थोडे बदलले. तो खरे बोलत नाही याबद्दल डॉ. ऑडीनची खात्री झाली.

“तू त्याला कधी दुखावले होतेस? ”

“कधीच नाही.”

लॉर्ड मार्क अगदी स्वस्थ बसून होता. पण डॉ. ऑडीनला असे वाटले की तो आतल्या आत शहारतो आहे. मोठा गर्विष्ठ असा हा लॉर्ड मार्क असे समजत होता की त्याला विचारलेले प्रश्न उद्धटपणाचे आहेत. एखादे  जाळयात अडकलेले, घाबरलेले जनावर असावे त्याप्रमाणे तो मुखवट्याच्या आत असावा असे डॉ.

ऑडीनला वाटले. डॉ. ऑडीन पुढे झुकला व लॉर्ड मार्कला त्याने त्याच्या नजरेला नजर भिडविण्यास भाग पाडले.

“अगदी खात्रीपूर्वक? ”

“अगदी नक्की. मला वाटतं तुम्हाला हे समजत नाही आहे का की आमचे रस्ते अगदी वेगळे आहेत. मला हे पुन्हापुन्हा सांगायचे नाही. मी उच्चपदस्थ मंत्री आहे व ओवेन हा पक्षाचा एक फालतू सदस्य आहे. अर्थातच सामाजिक दृष्ट्या आमच्यात खूपच मोठी दरी आहे. तो एक अगदी हीन स्तरातील माणूस आहे. मी ज्या उच्चपदस्थ व्यक्तींच्या जगात वावरतो तिथे अशा प्रकारच्या माणसाना मी कधीच भेटत नाही. आम्ही राजकीय दृष्ट्याही इतक्या वेगळ्या प्रवाहात आहोत की आमच्यात कुठल्याच गोष्टी एकमेकांशी संबंधित नाहीत.”

“तू मला पूर्ण सत्य सांगितल्याशिवाय मी तुला काहीही मदत करू शकणार नाही. ”

लॉर्ड मार्कने त्याच्या भुवया उंचावल्या. त्याचा आवाज घोगरा व तुटकतुटक येत होता.

“डॉ. ऑडीन, तुम्ही माझ्या शब्दांवर अविश्वास दाखवीत आहात. याची मला सवय नाही. जर तुम्ही असेच करणार असाल तर तुमच्याशी अजून काही बोलणे म्हणजे माझा वेळ फुकट घालविणे आहे. जर माझ्या मदतनीसाला तुम्ही कृपया तुमची फी सांगितलीत तर तो त्या रकमेचा चेक तुम्हाला द्यायची व्यवस्था करेल.”

लॉर्ड मार्क काय म्हणतो आहे हे जणू न ऐकल्यासारखाच डॉ. ऑडीनचा चेहरा कोरा असल्यासारखा वाटत होता. पण तो सतत त्याच्या पेशंटवर नजर रोखून होता. त्यांचा आवाज कडक खर्जातील होता.

“ज्याला जखम म्हणता येईल असे काही तू त्या माणसाला केले होतेस का? ”

लॉर्ड मार्क कां कू करू लागला लांब कुठेतरी बघत राहीला. तो विरोध करू शकणार नाही अशी जरब

डॉ. ऑडीनच्या डोळयात दिसल्यावर तो गुळमुळीतपणे म्हणाला, “तो घाणेरडा भिकार डुक्कर छाप असेल तरच फक्त. ”

“पण तो तसा आहेच असेच तर त्याचे वर्णन तू केलेस.“

लॉर्ड मार्कने एक सुस्कारा टाकला. घाव त्याच्या वर्मी बसला होता. सुस्कारा टाकण्याचा अर्थ आता तो आत्तापर्यंत त्याने जे दडवून ठेवले ते सत्य सांगणार होता, हे डॉ. ऑडीनच्या लक्षात आले. आता काही बळजोरी करायची जरुरी नव्हती. त्यांनी आता त्यांच्या पेशंटवरची नजर वळविली व रेघोट्या काढू लागले. दोनतीन मिनिटे शांतता पसरली.

“तुम्हाला उपयोग होईल अशी प्रत्येक गोष्ट मी सांगायला तयार आहे. जर मी हे यापूर्वी बोललो नसेन तर ते केवळ माझ्या दृष्टीने इतके गौण आहे की त्यामुळे माझ्या ह्कीकतीत काही फरक पडेल असे मला वाटत नाही. मागच्या निवडणुकीत ओवेन निवडून आला व लगेच त्याने त्रास द्यायला सुरवात केली. त्याचे वडील खाणकामगार आहेत व लहानपणी तो देखील तेच काम करत होता. नंतर तो शाळेत शिक्षक व पत्रकार झाला. तो म्हणजे अर्धकच्चं मडक आहे, पोकळ बुद्धिमत्ता असलेला

आहे. त्याचे ज्ञान तोकडे आहे. त्याचे कल्पनाविश्वही फार दरिद्री आहे. त्याची धोरणे प्रत्यक्षात आणण्यासारखी नाहीत. सक्तीच्या शिक्षणामुले तो तळागाळातून वर आलेला आहे. तो अगदी हडकुळा, काळसर रंगाचा असून भुकेकंगाल वाटतो. अत्यंत गबाळा दिसतो. तो लोकसभेच्या इभ्रतीला न शोभेसे कपडे घालून येतो. मळलेली कॉलर, नीट न बांधलेला टाय, अशा अवतारात तो असतो. महिन्याभरात अंघोळ न केल्यासारखा पारोसा दिसतो. त्याच्या पार्टीतले दोनतीन लोक सोडले तर सगळी मंडळी म्हणजे असलीच सोंगे आहेत. वासरात लंगडी गाय शहाणी ठरावी तसा तो त्याच्या पार्टीतील मूकस्तंभांपेक्षा वरचढ ठरतो इतकेच. बऱ्याच विषयात अगदी वरवरची माहिती असणारा व विचार न करता ठोकमठोक बोलणारा असा तो आहे. त्याला असे वाटते की परराष्ट्र धोरणातले त्याला खूप काही कळते. तो मला मूर्खासारखे प्रश्न विचारून भंडावून सोडतो. अशा नालायक माणसाशी मी तशाच पद्धतीने वागतो आणि हे तुम्हाला सांगायला मी मुळीच कचरत नाही. तो ज्या पद्धतीने बोलतो, ते मला अजिबात आवडत नाही. त्याचा तारस्वरातील आवाज, विचित्र उच्चार व त्याचे बेमुर्वतखोर हावभाव, मला अगदी चीड आणतात. तो लाजत, चाचरत, मोठ्या कष्टाने पण तळमळीने बोलतो. अर्थात ते बहुधा मुद्याला सोडून असते. मला कबूल आहे की तो सतत भावनेला हात घालणारे बोलतो. त्यामुळे त्याच्या पार्टीतले अडाणी लोक त्याला उचलून धरतात. त्याचे मनापासूनचे बोलणे ऐकून काही लोक दिपतात. पण मी त्यातला नव्हे. असे बोलणे हे राजकीय खेळीतील चलनी नाणे आहे. देशाचे भवितव्य लोकांनी आपण होऊन प्रत्येक गोष्टीत रस घेण्याने ठरते. कल्याणकारी, स्वार्थत्यागी अशी त्यांची उद्दिष्टे आहेत असे ते समजतात व मोठेमोठे वाक्प्रचार वापरून, आपण देशाचा कसा फायदा करून देणार आहोत व कसे मानवतेचे भले होणार आहे अशा बढाया ते भाषणातून मारत असतात. एखादा उमराव वर्षानुवर्षे आम्हाला जशी भाषणे सुनावत असतो तशी ती आहेत. तशी वाटणारी, पण अत्यंत रटाळ, अशी मूर्खासारखी भाषणे तो करतो.

प्रतिकार न करणे, बंधुभाव असे अतिशय रटाळ, बुळबुळीत झालेले शब्द वापरून तो भाषणे करतो. त्याने त्याच्या पार्टीतले लोक प्रभवित झाले आहेतच पण आमच्या पार्टीतले काही हलक्या कानाचे लोक त्याला फार भजू लागले आहेत. जेव्हा त्यांच्या पार्टीचे सरकार बनेल तेव्हा कदाचित ओवेनला म्हणे परराष्ट्र धोरण खाते मिळेल अशी अफवा उठलेली मी ऐकली. बातमी मनोरंजक पण अशक्य कोटीतली आहे. एकदा ओवेनने सुरु केलेल्या परराष्ट्र धोरणाच्या चर्चेचा समारोप करायचा प्रसंग माझ्यावर आला. तो एक तास बोलला होता आता याला डावलायची चांगली संधी आहे असे जाणून मी खरे तर त्याचे नाकच कापले. मी त्याच्या भाषणाच्या चिंध्याच उडविल्या. मी त्याच्या विचारपद्धतीतील चुका दाखवून दिल्या व त्याच्या ज्ञानातील उणीवांवर बोट ठेवले. मी त्याची चांगलीच खिल्ली उडविली. सर्वजण त्याला हसले. त्या हसण्याने मला आणखीनच चेव आला व मी टर उडविणे चालू ठेवले. त्यांच्या पार्टीतले लोक चूप बसले होते. पण त्यापैकी काहीजणांना एकदोनदा हसू आवरेना. आणि असे पहा आपला सहकारी, खरे तर प्रतिस्पर्धी, असा हास्यविषय झालेला पहाणे मला तसे फारसे रुचत  नव्हते. मी ओवेनला पार मामाच बनविला. चेहरा गोरामोरा होऊन तो त्याच्या खुर्चीत मटकन बसला व चेहरा हाताने झाकून घेतला. मी बसलो तेव्हा मी त्याला पूर्णपणे नामोहरम झालेले पाहिले. त्याचे नाक मी कायमचेच ठेचले. आता त्याची पार्टी निवडून आली तरी त्यात फार तर चपराशाची जागा सोडून त्याला काहीच संधी मिळाली नसती. त्याच्या भाषणाचा अपेक्षित परिणाम बघण्यासाठी त्याचे आईवडील आणि बरेच समर्थक घेऊन आल्याचे मी ऐकले. त्यांनी त्यांच्या मुलाचे केवळ लज्जित मुखच बघितले. आता त्याचे काहीही होवो. मला त्याच्याशी काही कर्तव्य नव्हते. ”

“तू त्याचे राजकीय आयुष्यच बरबाद केलेस असे म्हणणे सय्युक्तिक ठरेल ना? ”

“मला नाही तसे वाटत. ”

“ही तर फारच गंभीर जखम तू त्याला केलीस. ”

“त्यानेच ती ओढवून घेतली. ”

“तुला त्याबद्दल काही पश्चात्ताप झाला का? ”

“त्याचे आईवडील आलेले आहेत हे मला माहिती असते तर कदाचित मी त्याला इतके झोडपले नसते. ”

डॉ. ऑडीनला यावर अजून पुढे काहीच बोलायचे नव्हते. त्याच्या पेशंटला उपयोगी पडेल अशा पद्धतीने त्याच्यावर उपचार करायचे त्याने मनाशी ठरविले. जागे झाल्यावर स्वप्नासंबंधी विचारच करायचा नाही किंवा इतकी गाढ झोप लागली पाहिजे की स्वप्ने पडणारच नाहीत. असेच करावे लागेल. एका तासानंतर ती भेट संपली. त्यानंतर तो लॉर्ड मार्कला सहा वेळा तरी भेटला. पण काही निष्पन्न झाले नाही. त्या दुर्दैवी मनुष्याला ती वाईट स्वप्ने पडणे सुरूच राहिले. त्यामुळे अर्थातच त्याची तब्येत ढासळू लागली. तो मोडून पडला. त्याची चिडचिड काबूत येईना. डॉ ऑडीनकडे जाऊन काहीही फायदा न झाल्याने तो अधिकच चिडला. पण त्याने डॉ. ऑडीनचे उपचार व भेटी चालू ठेवल्या. कारण बहुधा त्याला तेवढाच आशेचा किरण उरला होता. ज्याच्याशी मोकळेपणे बोलता येईल अशी व्यक्ती फक्त तेवढीच उरली होती. शेवटी डॉ. ऑडीन अशा निष्कर्षांप्रत आले की फक्त एकाच प्रकारे त्याला बरे वाटू शकेल पण ते स्वतःच्या मर्जीने लॉर्ड मार्क कधीच करणार नाही. जर त्याला नर्व्हस ब्रेकडाऊनपासून वाचवायचे असेल तर त्याचा स्वतःबद्दलचा दुराभिमान, अरेरावी व अति शहाणपणा यांना प्रथम हद्दपार करावे लागेल. डॉ ऑडीनची खात्रीच होती की या गोष्टीना उशीर करून चालणार नाही. पेशंटला सल्ला देणे हा उपचाराचाच भाग होता. बऱ्याच भेटीनंतर पेशंट बहुधा या

गोष्टीला तयार होईल असे त्यांना वाटत होते. शेवटी त्याला गुंगीमध्ये नेण्यात ते यशस्वी झाले. त्यांच्या खर्जातील, हळूवार, एकसुरी आवाजाने त्यानी पेशंटचे टोचणारे मज्जातंतू शिथिल केले. लॉर्ड मार्क शांत व स्वस्थ झाला. डोळे मिटून पडून राहिला. त्याचा श्वासोच्छवास नेहमीप्रमाणे चालू होता व अवयव अगदी ताणरहित सैलावलेले होते. नंतर डॉ. ऑडीनने त्याच सुरात ठरविलेले शब्द उच्चारले.

“तू ओवेनकडे जाऊन त्याला दुखविल्याब्द्द्ल त्याची माफी मागणार आहेस. तुझ्या हातात आहे ते सर्व प्रयत्न करून तू त्याचे झालेले नुकसान भरून देशील ”

हे शब्द लॉर्ड मार्कच्या चेहे्ऱ्यावर आसूड फेकल्याप्रमाणे फटकारले गेले. त्याच्या मोहित अवस्थेतून बाहेर येऊन तो उभा राहिला. त्याचे डोळे सूडाने पेटल्यासारखे दिसत होते. कधी दिल्या नसतील अशा घाणेरड्या शिव्यांची, त्याने डाँ ऑडीनवर बरसात सुरु केली. अपशब्द बोलला. वेश्यांच्या तोंडी शोभेल अशी भाषा ऐकून डॉ. ऑडीन तर गारच पडले.

“त्या गबाळया ध्यानाची मी माफी मागू ? त्यापेक्षा मी स्वतःला ठार करीन.“

“तुझा समतोल परत मिळविण्यासाठी तेवढाच मार्ग उरला आहे असे मला वाटते.“

खरे पहाता विचारी असलेला पण रागाचा इतका पारा चढलेला मनुष्य डॉ. ऑडीनने पहिला नव्हता. तो रागाने लाल झाला होता व त्याचे डोळे जणू फुटून बाहेर पडायला बघत होते. तोंडाला फेस आला होता. डॉ. ऑडीन त्याच्याकडे

शांतपणे बघत होता. रागाची वाफ एकदाची बाहेर पडूदे असा विचार तो करत होता. इतके आठवडे ताण सहन करून लॉर्ड मार्क कमालीचा थकला होता.

"खाली बस." डॉ. ऑडीन करड्या आवाजात ओरडला.

लॉर्ड मार्क कसाबसा खुर्चीत कोसळला. "देवा, मला काय होते आहे? मी क्षणभर विश्रांती घेऊन निघून जातो."

पाच मिनिटे दोघेही शांत होते. लॉर्ड मार्क माजलेल्या बैलासारखा फुरफुरत होता. पण खरे तर तो सभ्य गृहस्थ असल्याने भानावर येऊन त्याने स्वतःला सावरले व शांततेचा भंग करत बोलला, "मला वाटते, मी तुमच्याशी फारच उद्धटपणे वागलो. मी तुमच्याशी ज्या तऱ्हेने बोललो त्याबद्दल मला लाज वाटते. आता तुम्ही माझ्यासाठी अधिक काही करायची तसदी घेऊ नका. मला आशा आहे तुम्ही हे ऐकाल. मला वाटते तुम्हाला भेटून मला फायदा झाला. मला एक तुमचीच तेवढी आशा उरली होती. "

"तू माझे ऐक. बाकी कशाचाही काहीही उपयोग होणार नाही. "

"तुम्ही मला ओवेनची  माफी मागायचे सोडून काहीही सांगा. "

"मी तुझ्या सांगण्यावर खूप विचार केला. मला पूर्ण काही समजले असे मी म्हणत नाही पण मी सांगितले त्याहून दुसऱ्या कुठल्याही उपायाने तुला आराम पडणार नाही. माझी अशी धारणा आहे की आपल्यामध्ये एकच मी नसून अनेक मी असतात. त्यातल्या तुझ्या एका 'मी'ने ओवेनला शाब्दिक जखमा केल्या. या दुष्टपणाच्या वर्तनाची शिक्षा तुला मिळते आहे. मी धर्मगुरू असतो तर तुला सांगितले असते की तुझ्या सद्सदविवेकबुद्धीला सारखा ओवेंनचा आकार दिसत रहातो. त्यामुळे तुला पश्चात्तापदग्धतेची शिक्षा होते व चूक सुधारायची संधी

तुझ्यासमोर उभी ठाकते. तू कितीही नाकबूल केलेस तरी तुझे मनोव्यापार असेच होतात. ”

“माझी सद्सदविवेकबुद्धी अगदी जागृत आहे. त्या माणसाच्या भवितव्याचा चुराडा मी केला ही काही माझी चूक नाही. मी त्याला माझ्या बागेतल्या गांडूळासारखा चिरडला. मला त्याचा मुळीच पश्चात्ताप होत नाही.”

असे बोलून लॉर्ड मार्क निघून गेला.

मध्ये काही दिवस गेले. त्याच्या लांबलचक बोलण्यावरून डॉ. ऑडीनने काढलेली टिपणे वाचताना त्यांना असे वाटले की काहीतरी वेगळी पद्धत वापरून आपल्या या पेशंटवर उपचार करायला हवेत. त्यांनी घड्याळात पहिले तर सहा वाजले होते. लॉर्ड मार्क आला नाही. हे जरा विचित्रच होते कारण सकाळीच त्याच्या मदतनीसाचा फोन आला होता की लॉर्ड मार्क ठीक वेळेवर तुमच्याकडे येतील. ‘काही कामाच्या रामरगाड्यामुळे त्याला वेळेवर येणे जमले नसावे. राज्याच्या महत्वाच्या बाबींसंबंधी काही काम करून निर्णय घेण्याच्या अवस्थेत तो खरे तर नाही. त्यामुळे त्याच्या बाबतीत काय उपाययोजना करावी बरे ? खरे पहाता कुणीतरी अधिकारी व्यक्तीला, पंतप्रधान किंवा परराष्ट्र धोरणासंबंधीच्या उपसचिवाला कळविणे जरुरीचे आहे की लॉर्ड मार्कचे मन अस्थिर असल्यामुळे त्याच्या हातून सध्या हे महत्वाचे अधिकारपद काढून घ्यावे. हे मला केलेच पाहिजे. नाहीतर तो नको तो त्रास ओढवून घेईल व त्याची मनस्थिती अधिकच वाईट होईल.’ डॉ. ऑडीनचे विचारचक्र चालू होते. त्यानी आपले खांदे उडविले व ताशेरे झाडले, ‘तसेही गेल्या पंचवीस वर्षात या राजकीय अधिकारी मंडळींनी देशाचे इतके वाटोळे केले आहे की ते शहाणे असले काय किंवा वेडे असले काय त्याने फारसा फरक पडत नाही.’

त्याने घंटी वाजविली. नोकर आला.

“आता जर लॉर्ड मार्क आला तर त्याला सांग की मी आता त्याला भेटू शकणार नाही कारण सव्वासहाची माझी दुसऱ्या एकाला भेटायची वेळ ठरलेली आहे. ”

“ठीक आहे, सर.”

“संध्याकाळचा पेपर आला का? ”

“मी जाऊन बघतो. ”

लगेच त्या नोकराने पेपर आणून दिला. पहिल्याच पानावर मोठ्या अक्षरात ठळक बातमी छापली होती, ‘ ‘परराष्ट्र धोरण खात्याच्या मंत्र्याचे दुःखद निधन’.

डॉ. ऑडीन ओरडले, “अरे बापरे! ” त्यांच्या नेहमीच्या शांतपणातून ते बाहेर आले. त्यांना जबरदस्त धक्का बसला होता. पण तरीही अगदी टोकाचे आश्चर्य वाटले नाही. असे होण्याची शक्यता त्यांनी मनोमन अजमावलेली होती. ही नक्कीच आत्महत्त्या असणार असा त्यांनी अंदाज केला. बातमीत असे म्हटले होते की लॉर्ड मार्क रेल्वे स्टेशनच्या प्लँटफाँर्मवर अगदी रुळाच्या बाजूच्या कडेला उभे होते आणि गाडी येताच ते रुळावर पडलेले दिसले. त्यांना अकस्मात चक्कर आली असावी असे पेपरमध्ये म्हटले होते. पुढे असेही लिहिले होते की गेले काही दिवस त्यांना कामाचा अति ताण होता. पण काम इतके महत्वाचे व प्रचंड होते की त्यांना ते टाळणे शक्यच नव्हते. आधुनिक राजकारणामधील अति महत्वाच्या व्यक्तींना ज्या ताणतणावाना सामोरे जावे लागते त्याचाच लॉर्ड मार्क बळी ठरले. पुढे मृत पुढाऱ्याची गुणवत्ता, उद्योगीपण, देशभक्ती व दूरदृष्टीचे वर्णन केले होते. पंतप्रधानानी आता त्यांच्या

जागी कुणाला नेमायची शक्यता आहे याची नामावली दिली होती. डॉ. ऑडीननी हे सर्व वाचले. त्यांना लॉर्ड मार्क आवडला नव्हता. डॉ. ऑडीनच्या मनातील मुख्य भावना असमाधानाची होती की आपण या पेशंटच्या बाबतीत काही करू शकलो नाही. लॉर्ड मार्कच्या नेहमीच्या डॉक्टरांशी संपर्क न साधून आपण कदाचित चूक केली. डॉ. ऑडीनचे धैर्य खचल्यासारखे झाले. प्रयत्न करूनही यश न आल्यास असे होणे स्वाभाविक होते. निरीक्षण करून काढलेल्या निष्कर्षांवर आधारित असा त्यांचा व्यवसाय होता ते मनात विचार करू लागले, “या पेशंटच्या बाबतीत आपण काढलेली टिपणे व त्याला सुचविलेले उपाय चुकले की काय ? मानवी मन अगम्य असून त्याचे गूढ जाणणे हे अंधारात चाचपडण्यासारखेच. कुठल्या शक्ती मनाचे कारभार नियंत्रित करतात कोण जाणे? ” निर्हेतुकपणे परत पेपर चाळताना तळाशी असलेल्या एका परिच्छेदाकडे त्यांचे लक्ष गेले. ‘कामगार पक्षाच्या सदस्याचे आकस्मिक निधन! ओवेन हे कामगार पक्षाचे सदस्य होते. जॉर्डन रस्त्यावर अचानक ते खाली पडले. चेरिंग क्रॉस दवाखान्यात नेईपर्यंत त्यांचा मृत्यु झालेला होता. नैसर्गिक कारणानेच त्यांचा मृत्यु झाला असावा पण तरीही या बाबीची दखल घेऊन चौकशी केली जाईल.‘ डॉ. ऑडीनचा डोळयांवर विश्वासच बसेना. आदल्या रात्री लॉर्ड मार्कने त्याला त्रास देणाऱ्या ओवेनला जसे स्वप्नात बाटलीने मारले होते व दुसऱ्या दिवशी ओवेनचे डोके दुखले होते तसे हातात सुरा किंवा पिस्तुल घेऊन त्याने ओवेनला ठार मारले असेल का? त्यामुळे रस्त्यातून चालताना ओवेन मेला असेल का? किंवा याहून भीतीदायक व चमत्कारीक असे असू शकेल की त्याने क्रूरपणे वाट लावलेला त्याचा शत्रू जिवंत असलेला बघून मरणानंतरच्या वेगळयाच जगात जाऊन त्याने ओवेनला भयंकर जखमी केले असेल? सगळा प्रकार विचित्र आहे. चमत्कारीक प्रकारची अशी ही बोलाफुलाची गाठ असावी, झाले.

डॉ. ऑडीनने घंटी वाजविली व म्हणाले, “ मी मिस्टर मिल्टन यांच्याकडे जाणार होतो. त्यांना फोन करून सांग की माझी तब्येत बरी नसल्याने मी येऊ शकत नाही. ”. ताप चढल्याप्रमाणे त्यांचे अंग शहारत होते. कुठल्यातरी आध्यत्मिक जाणिवेने ते हवेत विरून जाणारे मानसिक चित्र काढत राहिले. भयंकर पोकळी! मृत आत्म्यांची अंधारी रात्र त्यांच्या अंगावरून वहात होती. आणि मग एका विचित्र, पुरातन, अज्ञात भीतीच्या जाणिवेने त्यांना घेरून टाकले.

# श्रीयुत सर्वज्ञ



श्रीयुत काळे यांना मी ओळखत नव्हतो. तरीही माझे त्यांच्याबद्दलचे मत प्रतिकूल बनू लागले होते. मी सॅनफ्रॅनसिस्कोहून टोकियोला बोटीने प्रवास करत होतो. युद्धानंतरच्या त्या काळात बोटींमधील जागांचे इतके भरमसाठ आरक्षण झालेले असे की मला स्वतंत्र केबिन मिळण्याची आशा करणे शक्यच नव्हते. दोन बर्थ असलेले एक केबिन मला मिळाले हेच नशीब! पण जेव्हा श्री काळे यांचे सामान तिथे आधीच पडलेले मी पाहिले, तेव्हा ते दृष्य मला आवडले नाही. त्या बॅगांवर खूपच लेबले दिसत होती. आतले कपडे, दाढीचे सामान इकडेतिकडे विखुरलेले होते. ब्रशला तर एखाद्या घासणीचीच अवकळा आली होती.

मी सिगरेट ओढत, त्यासाठी असलेल्या खोलीत शिरलो व माझ्यासाठी पत्त्यांचा कॅट मागवला. मी पेशन्सची पाने लावायला सुरवात करणार तोच त्यांनी मला शोधून काढले व ‘मी श्रीयुत काळे’ असे म्हणत माझ्यासमोर बैठक मारली.

“हो. आपण दोघे एकाच केबिनमध्ये आहोत.”

“हा नशिबाचा भाग आहे असे मी समजतो. तुमची जोडी कुणाबरोबर बांधली जाणार आहे हे आपल्याला कधीच माहित नसते.” “तुमची तिर्री त्या चव्वीवर लावा.” ते म्हणाले. तुम्ही हातात घेतलेला पत्ता आता कुठे लावायचा हे तुम्ही बघण्यापूर्वीच कुणीतरी सांगण्याइतके संतापजनक दुसरे काहीही नाही.

“ती दश्शी त्या गुलामावर लागते आहे बघा.” ते ओरडले. माझा संताप गिळत मी डाव संपवला व असे म्हटले की मी खाली जेवणघरात जाऊन माझी जागा नक्की करतो.

“मी तुमच्यासाठी जागा आधीच नक्की केली आहे.” ते म्हणाले. “आपण एकाच केबिनमध्ये रहात आहोत म्हणून म्हटले आपण जेवायलाही एकाच टेबलावर बसू”.

मला श्री काळे यांचा रागच आला.

डेकवर मला त्यांच्याशिवाय एकटे फिरताच येईना. आपला सहवास कुणाला तरी आवडत नाही आहे याची गंधवार्ताही त्यांना नव्हती. ते एक बोलघेवडे गृहस्थ होते आणि तीन दिवसात ते बोटीवरील सगळयांना ओळखू लागले. ते सदैव सगळीकडे असत. स्पर्धांचे नियोजन करत, लिलाव घडवून आणत. फॅन्सीड्रेससारख्या कार्यक्रमात नृत्याने धमाल आणत. नक्कीच ते बोटीवरील सर्वात तिरस्करणीय व्यक्ती होते. आम्ही त्याना श्रीयुत सर्वज्ञ असे नाव ठेवले होते. ते त्यांनी खेळीमेळीने स्विकारले होते. श्री काळे यांचे सर्व त्यांच्या पद्धतीप्रमाणे चाललेले असे, फक्त श्री गोरे सोडून! श्री गोरे हे श्री काळयांइतकेच दुराग्रही होते व दुसऱ्यांच्या खात्रीलायकपणाबद्दल टोकाचे रागावत असत. त्यांच्या चर्चा भांडणाच्या सुरात अखंडपणे चालू असत.

श्री गोरे हे टोकियो येथे अमेरिकन सरकारी नोकरीत होते. न्यूयॉर्कला धावती भेट देऊन, वर्षभर एकट्या रहाणाऱ्या त्यांच्या बायकोला घेऊन, ते आता परत नोकरीवर रुजू व्हायला चालले होते. श्रीमती गोरे या सुंदर, ठेंगण्याठुसक्या, वागायला उत्तम व विनोदी स्वभावाच्या होत्या. त्यांचा नम्र स्वभाव डोळयात भरत असे. कोटावर लावलेल्या टवटवीत फुलासारख्या त्या शोभून दिसत.

एकदा रात्रीच्या जेवणाच्या वेळी संभाषणाची गाडी मोत्यांवर घसरली. जपानी लोक विकत असत त्या कल्चर्ड मोत्यांबद्दल पेपरात बरेच छापून आले होते. या कल्चर्ड मोत्यांमुळे खऱ्या मोत्यांची किंमत नक्कीच कमी होणार असे कोणीतरी

म्हणाले. श्री काळे यांनी त्यांच्या सवयीप्रमाणे मोत्यांबद्दलची सगळी माहिती आम्हाला दिली. श्री गोरे यांना मोत्यातील काही कळत होते असे मला वाटत नव्हते पण श्री काळे यांना विरोध करून तडाखा द्यायची संधी ते बरी सोडतील.

"मी जे बोलतो आहे त्याबद्दल मी ठाम आहे." श्री काळे म्हणाले. "मी मोत्यांचा व्ययसाय बघण्यासाठीच जपानला जात आहे. मी त्या व्यापारात आहे व मोत्यांसंबंधी मला इत्यंभूत माहिती आहे."

त्यांनी विजयी मुद्रेने टेबलाभोवती पाहीले. "मी अर्ध्या रात्री झोपेतून उठून सुद्धा ओळखू शकतो की अमुक एक हा खरा मोती नसून कल्चर्ड मोती आहे." श्रीमती गोरे यांनी घातलेल्या माळेकडे त्यांनी निर्देश केला. "श्रीमती गोरे, मी अगदी ठामपणे सांगतो की मी तुमच्या माळेची जी किमत सांगीन ती त्यापेक्षा एक डॉलरनेही कमी नसेल."

श्रीमती गोरे त्यांच्या नेहमीच्या नम्रपणे थोड्या लाजल्या व त्यांच्या ड्रेसमध्ये त्यांनी त्यांची माळ लपविली. श्री गोरे पुढे झुकले. त्यांनी आम्हा सर्वांकडे बघितले व त्यांच्या डोळयात हसू उमटले.

"माझ्या बायकोने गळयात घातलेली माळ मी स्वतः विकत घेतलेली नाही. पण मला जाणून घ्यायला आवडेल की तिची किमत काय असेल."

एवढेच ना! माझ्या अंदाजाप्रमाणे डॉलर १५०००. पण ती एखाद्या मॉलमधून घेतली असेल तर कदाचित

डॉलर ३०००० सुद्धा असू शकेल." श्री काळे म्हणाले.

श्री गोरे खुनशीपणे हसले. "तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल की श्रीमती गोरे यांनी ती माळ, आम्ही

न्यूयॉर्क सोडायच्या आधी एक दिवस एका साध्याशा दुकानातून फक्त १८ डॉलरला घेतली."

“साफ खोटे! हे फक्त खरे मोती आहेत एवढेच नव्हे तर या आकाराच्या मी पाहिलेल्या मोत्यांच्या माळेत ही माळ अतिशय सरस आहे.”

“चला. पैज लाऊया. ही खोटी माळ आहे. १०० डॉलरची पैज ठरली.”

“कबूल”

“अहो महाशय, तुम्ही एवढ्या घाईने अशी पैज लाऊ शकत नाही.” श्रीमती गोरे म्हणाल्या. त्यांच्या ओठावर हसू होते, पण स्वर मात्र तीव्र नापसंतीचा होता.

“का नाही? जर मला काही न करता फुकट पैसे मिळणार असतील तर अशी संधी मी का गमवावी?” श्री गोरे इरेला पेटल्यासारखे बोलले.

“मला ती माळ बघू दे. जर ती खोटी असेल तर मी तुम्हाला दोन सेकंदात सांगू शकेन. मला माझे १०० डॉलर गमवायचे नाहीत.” श्री काळे उद्गारले.

“काढ ग ती माळ! त्यांना किती वेळ ती बघायची आहे तेवढा वेळ बघूदे.”

श्रीमती गोरे क्षणभर घुटमळल्या. त्यांनी माळेच्या फाशाला हात घातला. “मला ती निघत नाही. मी म्हणते त्यावरच श्री काळे याना विश्वास ठेवावा लागेल.” त्या म्हणाल्या.

काहीतरी नको ते घडणार असल्याचा संशय मला आला, पण काय बोलावे ते मला कळेना. श्री गोरे पुढे सरसावले व म्हणाले, “मी काढतो.” त्यांनी ती माळ काढून श्री काळे यांच्याकडे सुपूर्द केली. खिशातून सूक्ष्मदर्शक भिंग काढून श्री काळे यांनी त्या माळेची परीक्षा केली. त्यांच्या नितळ, सावळया चेहऱ्यावर विजयाचे हास्य झळकले. त्यांनी माळ परत केली. ते बोलणार तोच त्यांचे लक्ष श्रीमती गोरे यांच्या चेहऱ्याकडे गेले. त्या श्री काळयांकडे भ्यायलेल्या, विस्फारलेल्या नजरेने रोखून बघत होत्या. त्यात अगतिकता व काकुळतीचे भाव होते. ते इतके स्पष्ट होते की ते त्यांच्या नवऱ्याला कसे दिसले नाहीत याचे मला आश्चर्य वाटले.

श्री काळे अवाक् होऊन न बोलता थांबले. त्यांनी खोलवर उसासा टाकला. त्याना तसे करायला प्रयास पडत असल्याचे स्पष्ट दिसत होते. “माझा गैरसमज झाला. ती खूपच छान पण खोटी माळ आहे. अर्थात मी भिंगातून पाहिल्यावरच मला समजले की ती खऱ्या मोत्यांची नाही.” ते म्हणाले.

त्यांनी १०० डॉलरची नोट काढून काही न बोलता, श्री गोरे यांच्या हातात ठेवली.

“माझ्या मित्रा, पुढच्या वेळी इतके ठामपणे न बोलण्याचा धडा तुला यातून मिळेल.” नोट घेताना श्री गोरे म्हणाले.

माझ्या लक्षात आले की श्री काळयांचे हात थरथरत होते.

गोष्टी जशा पसरतात तशी ही गोष्टदेखील बोटीवर पसरली. त्या संध्याकाळी त्यांना भरपूर चेष्टेला तोंड द्यावे लागले. श्रीयुत सर्वज्ञ चांगलेच पकडले गेले, हा मोठा विनोदच होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून मी दाढी करत होतो. श्री काळे त्यांच्या अंथरुणावर सिगरेट ओढत पडले होते.

एकदम काहीतरी आवाज झाला आणि एक पत्र दाराखालच्या फटीतून सरकवलेले मी पाहीले. त्यावर श्री काळे यांचे नाव होते.

त्यांनी ते पाकीट फोडले. त्यात पत्र नव्हते तर १०० डॉलरची नोट होती. त्यांनी माझ्याकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर पैज जिंकल्याचे भाव स्पष्टपणे दिसत होते.

“कोणालाही आपल्याला मूर्ख ठरवलेले आवडत नाही.” ते म्हणाले.

“ मोती खरे होते का?”

“ मी एवढेच म्हणेन, की जर मला तरुण, सुंदर बायको असती तर तिला वर्षभर न्यूयॉर्कला एकटीला ठेऊन मी टोकियोला राहिलोच नसतो.” ते उद्गारले

त्या क्षणी मला श्री काळे थोडे का होईना पण आवडले.

# अनोळखी प्रदेशात



मी भटक्या मनुष्य आहे, पण मी अफलातून प्रेक्षणीय स्थळे पहाण्यासाठी हिंडत नाही. सुंदर निसर्गदृष्ये बघूनही मला फारसे समाधान मिळत नाही. मला माणसे वाचायला आवडतात. कुणी राजा, पंतप्रधान अशी महान माणसे नव्हे, कुणी प्रसिध्द लेखक किंवा चित्रकार नव्हे, तर ज्यांच्याबद्दल मी विक्षिप्त गोष्टी ऐकल्या आहेत असा एखादा मिशनरी, किंवा बिलीयर्डचे गुण नोंदणाऱ्याबरोबर ओळख वाढवण्यासाठी मी दोन आठवडे टुकार हॉटेलात रहाणेही पसंत केले असेल. अशा गोष्टींसाठी मी शेकडो मैल प्रवास करू शकतो. मला थोडा धक्का देणारी व त्यायोगे माझे साश्र्चर्य मनोरंजन करणारी माणसे आवडतात. जगाच्या कानाकोपऱ्यात अनपेक्षित ठिकाणी एकट्या, व्यवस्थितपणे चरितार्थ चालविणाऱ्या मध्यमवयीन इंग्लिश स्त्रिया मला माहिती आहेत. इटालीमधील एका लहान शहराबाहेरील टेकडीच्या शेजारील घरात अनेक वर्षे रहाणाऱ्या एका इंग्लिश स्त्रीबद्दल मी तुम्हाला सांगितले तर आश्चर्य वाटून घेऊ नका. एवढ्या मोठ्या इस्टेटीमध्ये आसपास कुणी इंग्लिश शेजार नसताना ती रहाते. ती मिशनरी नाही. त्या चिनी भागात ती एकटी का रहाते कुणास ठाऊक! दक्षिणेकडील समुद्रातील बेटावर अशीच एकजण रहाते. इंडोनेशियातील जावा बेटाच्या मध्यभागी एका खेड्याच्या बाहेरील बाजूस एका मोठ्या बंगल्यात अशीच एकजण रहाते. त्यांना कोणी मित्रमैत्रिणी नाहीत व अनोळखी लोकाना त्या थारा देत नाहीत. असे स्वतःचे आयुष्य त्या जगत असतात. जरी माझ्यासारखा एखादा इंग्लिश मनुष्य अनेक महिन्यांनी त्यांना रस्त्यात दिसला तरी त्या तुमच्याकडे न बघितल्यासारखे करून पुढे जातील. तुम्ही ‘आपण एकाच देशाचे‘ अशी जवळीक दाखवलीत तरी फार तर एक कप चहा, चांदीच्या कपातून तुम्हाला देण्यापलीकडे त्यांची मजल जाणार नाही. नम्रपणे बोलल्या तरी ओळख वाढवण्याची इच्छा त्या चुकूनही दाखविणार नाहीत. आपल्या आप्तस्वकीयांपासून लांब ठेवणारी अशी कुठली ऊर्मी त्यांच्यामध्ये असेल? इतक्या लांबच्या प्रदेशात राहताना त्याना त्यांची आठवण येत नसेल? हे त्यांचे स्वातंत्र्याचे प्रेम म्हणायचे की अद्भुतरम्यतेचे? पण या सर्व इंग्लिश स्त्रिया, ज्यांना मी भेटलो किंवा नुसते

त्यांच्याबद्दल ऐकले (कारण मी म्हटले त्याप्रमाणे त्याना भेटणे सोपे नाही) त्यापैकी ठळकपणे माझ्या लक्षात राहिलेली, एशिया मायनरमध्ये राहणारी एक मध्यमवयीन स्त्री आहे.

खूप लांबचा प्रवास करून मी एका लहानशा गावात आलो. इथून मला एका प्रसिद्ध पर्वतावर जायचे होते. त्याच्या पायथ्याशी असलेले एक हॉटेल मला दिसले. मी रात्री उशिरा तिथे जाऊन रजिस्टरमध्ये माझे नाव लिहिले. वर माझ्या खोलीत गेलो. कपडे बदलताना मी थंडीने काकडू लागलो. पण त्याच क्षणी दारावर टकटक करून एक वेटर आला. “मिस्टर निकोलिनीतर्फे तुमचे स्वागत आहे.” तो म्हणाला.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याने माझ्या हातात गरम पाण्याची बाटली दिली. मी आभार मानून ती घेतली.

“मिस्टर निकोलिनी कोण आहेत?” मी विचारले. “ती या हॉटेलची मालक आहे.” तो उत्तरला. “स्वतःला मिस्टर निकोलिनी म्हणवणारी महिला?” असे मनाशी पुटपुटत मी आश्चर्यचकित झालो.

तिचे माझ्यातर्फे आभार माना असे मी म्हटल्यावर तो गेला. एशिया मायनरमधील अशा लहानशा हॉटेलात एका वयस्क इटालीयन बाईकडून सुंदर गरम पाण्याच्या बाटलीची मी अपेक्षा केली नव्हती. यापेक्षा अजून काय मला हवे होते? ( फ्रान्समधील युद्धाच्या वेळी, सुनसान जागी, गोळयांचा वर्षाव होत असताना, भयानक रित्या सहा माणसांनी जीव धोक्यात घालून गरम पाण्याची बाटली आणली ती कथा मी तुम्हाला सांगेन.) दुसऱ्या दिवशी तिचे आभार मानावे या हेतूने मी मिस्टर निकोलिनीला भेटू शकतो का असे विचारले. मी तिची वाट बघत थांबलेलो असताना विचार करत होतो की इटालियन भाषेत गरम पाण्याच्या बाटलीला काय म्हणत असतील, इतक्यात ती आलीच. ती एक छोटीशी, मजबूत व नीटनेटकी स्त्री होती. तिने झालरवाला चुणीदार, काळा, लांब झगा व लहानशी

झालरवाली काळी टोपी घातली होती. ती हाताची घडी घालून उभी होती. एखाद्या इंग्लिश घरातील गृहिणीसारखी ती दिसत असल्याचे बघून मी आश्चर्यचकित झालो.

“सर, तुम्हाला माझ्याशी काही बोलायचे होते का ? ”

त्या एका वाक्यावरुन मी ती इंग्लिश असल्याचे ओळखले व उच्चारांवरून ती लंडनची असल्याचेही ताडले.

मी गोंधळून म्हणालो, “गरम पाण्याच्या बाटलीबद्दल तुमचे आभार मानायचे होते.”

“मी रजिस्टरमध्ये तुम्ही इंग्लिश असल्याचे पाहीले आणि मी नेहमीच इंग्लिश लोकांना गरम पाण्याची बाटली पाठवते”.

“खरच त्यामुळे मला खूप छान वाटले”.

“दिवंगत लॉर्ड ऑमसकर्ककडे मी खूप वर्षे कामाला होते. त्यांच्याकडे प्रवासात नेहमी गरम पाण्याची बाटली असे. सर, अजून काही?”.

“आत्ता तरी काही नाही. आभारी आहे”.

तिने मान झुकवून मला अभिवादन केले व ती गेली. एशिया मायनरमधील हॉटेलची मालक एक वयस्क इंग्लिश स्त्री असावी हे कसे शक्य आहे असे मी मनाशी आश्चर्य करत होतो. तिने इंग्लिश असल्याची ओळख जरी स्वतःहून दिली तरी ती ज्या अदबीने एक अंतर राखून वागत होती, त्यावरून तिची ओळख वाढविणे शक्य होईल असे मला वाटले नाही. एका इंग्लिश उमराव कुटुंबात ती काम करत होती त्याचे काहीतरी कारण असेलच. बरेच प्रयत्न करून मी शेवटी तिच्या घरी चहासाठी जाण्यात यशस्वी झालो. मिस्टर ऑमसकर्क यांच्याकडे ती नोकरांणी म्हणून कामाला होती असे मला कळले. मिस्टर निकोलिनी (तिच्या या जगात नसलेल्या नवऱ्याचा उल्लेख ती नेहमी असाच करत असे व तो गेल्यांनतर

स्वतःला मालक म्हणून मिस्टर मिकोलिनी असेच म्हणवून घेई.) मुख्य स्वयंपाकी म्हणून काम करत असत. तो एकदम देखणा मनुष्य होता व काही वर्ष त्यांच्यामध्ये एक 'सामंजस्य करार' होता. जेव्हा त्यांच्याकडे ठराविक रक्कम साठली, तेव्हा त्यांनी लग्न केले, नोकरी सोडली व स्वतः चालविण्यासाठी एखादे हॉटेल शोधू लागले. एका जाहिरातीनुसार, त्यांनी हे विकत घेतले. मिस्टर निकोलिनीनी असा विचार केला की त्या निमित्ताने आपण थोडे जग बघू. ही साधारण तीस वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. मिस्टर निकोलिनी पंधरा वर्षांपूर्वी वारले. त्यानंतर ती विधवा बाई एकदाही इंग्लंडला गेली नाही. तिला कधी जावेसे वाटले नाही का असे मी विचारले.

"जरी खूप बदल झालेले दिसले असते तरी नुसते भेटायला जाणे मला आवडले नसते असे नाही. पण मी एका परदेशी माणसाशी लग्न केलेले माझ्या कुटुंबाला आवडले नव्हते. तेव्हापासून मी त्यांच्याशी बोलणेच टाकले होते. अर्थात घरच्यापेक्षा इथे खूप गोष्टी वेगळ्या आहेत पण आता मला त्यांची सवय झाली आहे. मी खूप आयुष्य पाहिले. लंडनसारख्या शहरात ज्या संथ गतीने ते आयुष्य जगतात, तसे मी परत जगावे का असा माझ्यासमोर प्रश्न होता".

मी हसलो. कारण ती जे काही बोलली, ते तिच्या वागण्याच्या पद्धतीशी सुसंगत वाटत नव्हते. असल्या मागासलेल्या देशात आवडल्यावाचून ती तीस वर्षे राहिली हे जरा जगावेगळेच होते. मला इटालियन भाषा येत नाही पण ती ज्या प्रकारे इटालियन बोलत होती त्यावरून माझी खात्रीच झाली की ती नक्कीच चुकीचे व इंग्लिश वळणाने इटालियन बोलत असणार. अचानक उदभवलेल्या बदलानंतरही ती तशीच इंग्लिश उमराव बाईची नोकरांणीच राहिली असणार. पण कुठल्याही परिस्थितीत विचलित न होण्याचा तिचा स्वभाव होता. जशी येईल तशी वेळ ती स्विकारत गेली. जो कुणी इंग्लिश नाही तो परदेशी असेच ती समजत असे व ते मूर्ख आहेत असे समजून त्यांना संभाळून घेई. उमराव घरातील वरिष्ठ नोकर, कनिष्ठ नोकरांना, त्यांचा अधिकार मोठा असल्याची जाणीव करणारी वागणूक देत हे तिने

पाहिलेले असल्यामुळे ती मालक असल्याच्या तोऱ्यातच तिच्या हाताखालील मंडळींना वागवी आणि हॉटेल अगदी व्यवस्थित चालले होते.

मी तिच्या या कर्तृत्वाबद्दल तिचे अभिनंदन केले. नेहमीप्रमाणे हाताची घडी घातलेली ती म्हणाली, "माझ्याकडून मी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अर्थात परदेशी लोकांच्या कल्पना आपल्यासारख्या असतीलच असे नाही. आमचा इंग्लंडचा उमराव मला म्हणायचा की आपल्यातील सुप्त गुणांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन आपण आपले आयुष्य जगायचे असते."

पण मी जाण्याच्या संध्याकाळी तिने सर्वात मोठा आश्चर्याचा धक्का मला दिला. ती बोलली "माझ्या दोन मुलांना पाहिल्याशिवाय तुम्ही जाऊ नका."

"तुम्हाला मुले आहेत?"

"ते नेहमीच कामानिमित्त दूर असतात पण आत्ताच परत आले आहेत. तुम्ही त्याना बघून नक्कीच खूष व्हाल. तसे पाहीले तर मीच त्यांना सर्व शिकविले आहे आणि माझ्यांनंतर पण ते नक्कीच हॉटेल चांगले चालवतील."

तेवढ्यात दोन उंच, काळसर, कमरेला पट्टा लावलेले तरूण आत आले. तिचे डोळे उजळले. त्यांनी येऊन, तिला मिठी मारून तिचे गालावर चुंबन घेतले.

"त्यांना इंग्लिश येत नाही पण बोललेले थोडे समजते. अर्थात त्यांना इटालियन उत्तम येते, अगदी त्यांची मातृभाषा असल्यासारखे, ग्रीक व इटालियन लोकांसारखे!"

मी त्या जोडीबरोबर हस्तांदोलन केले. मग मिसेस निकोलिनी त्यांच्याशी काहीतरी बोलली व ते गेले.

"ते देखणे आहेत. मिस्टर निकोलिनी, तुम्हाला नक्कीच त्यांचा अभिमान वाटत असेल." मी म्हणालो.

“ नक्कीच. सर, ती दोन्ही चांगली मुले आहेत. जन्मल्यापासून त्यांनी कधीही मला त्रास दिला नाही. ते दोघे म्हणजे मिस्टर निकोलिनीची प्रतिकृतीच आहेत. “

त्यांची आई इंग्लिश आहे असे कुणालाही वाटणार नाही असे मला म्हणावेसे वाटते. “

“मी खरे तर त्यांची आई नाहीच आहे. मी आताच त्यांना त्यांच्या आईची विचारपूस करण्यासाठी तिच्याकडे पाठविले आहे.” मी गोंधळून गेलो.

तिने स्प्ष्टीकरण दिले. “एक ग्रीक मुलगी हॉटेल मध्ये काम करायची. तिच्यापासून मिस्टर निकोलिनीना झालेली ही मुले आहेत. मला स्वतःला मुले झाली नाहीत. त्यामुळे मी त्यांना दत्तक घेतले”.

मला काय बोलावे ते कळेना.

“मिस्टर निकोलिनीवर मी काही आरोप करते आहे असे कृपया समजू नका. थोडी खजिल होऊन ती  म्ह्णाल्यासारखे मला वाटले.

“मिस्टर निकोलिनी, म्हणजे मी, चांगली खंबीर आहे”. हाताची घडी घालून अभिमानाने, समाधानाने व ठामपणे उच्चारलेले हे आमच्या संभाषणातील शेवटचे शब्द होते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.